जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
जळगाव, रविवार, १८ जानेवारी २०२६। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३१। अंक : १६२। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८ + ६ = १४ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध



# जळगाव महानगरपालिका प्रभागनिहाय उर्वरीत निकाल

| प्रभाग क्र. १७ (अ) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते | पक्ष |
| १ | हिना इनुस पिंजारी | ४०४९ | काँग्रेस |
| २ | जरीना शब्बीर शाह | ६०९३ | शिवसेना (उबाठा) |
| ३ | चेतना कोल्हे | ५२३ | स्वराज्य शक्ती सेना |
| ४ | जयश्री वंजारी | ११७० | अपक्ष |
| ५ | मेहमुदा बी मोहम्मद शेख | ३२९८ | अपक्ष |
| ६ | नोटा | ३१२ | |

| प्रभाग क्र. १७ (ब) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते | पक्ष |
| १ | हिनाबी शाकीर खान | ५०२५ | शिवसेना (उबाठा) |
| २ | सुमैय्या वसीम पटेल | २५६३ | राष्ट्रवादी (श.प.) |
| ३ | सईदा बी शेख युसुफ | १७२८ | काँग्रेस |
| ४ | जैनाब पटेल | ३८९६ | एमआयएम |
| ५ | मुमताज बी शे.उस्मान | ४१२ | समाजवादी पार्टी |
| ६ | सालेहा तस्लिम पटेल | २१५ | अपक्ष |
| ७ | पुनम सोनवणे | १२९९ | अपक्ष |
| ८ | नोटा | ३०९ | |

| प्रभाग क्र. १७ (क) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते | पक्ष |
| १ | सैफुउल्लाह ईनामदार | ४१२२ | काँग्रेस |
| २ | इब्राहीम मुसा पटेल | ४१४५ | शिवसेना (उबाठा) |
| ३ | इकबालोद्दीन पिरजादे | २५४ | राष्ट्रवादी (श.प.) |
| ४ | खालिद खाटीक | १९९७ | एमआयएम |
| ५ | शिबान फाईज | २३७ | समाजवादी पार्टी |
| ६ | खान निजाम मासुम | ५६८ | अपक्ष |
| ७ | उज्वल पाटील | ९६९ | अपक्ष |
| ८ | शेख शाहिद सादीक | १३६ | अपक्ष |
| ९ | शेख सोहेल आरिफ | ५४३ | अपक्ष |
| १० | नोटा | २०५ | |

| प्रभाग क्र. १७ (ड) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते | पक्ष |
| १ | प्रशांत नाईक | ३७५० | राष्ट्रवादी (श.प.) |
| २ | मुजीब पटेल | १३५९ | काँग्रेस |
| ३ | अक्षय वंजारी | ४१७५ | शिवसेना (उबाठा) |
| ४ | अलफैज अमीर पटेल | ४६६ | समाजवादी पार्टी |
| ५ | रियाज करीम बागवान | २८५१ | एमआयएम |
| ६ | अकरम राजु देशमुख | ४२६ | अपक्ष |
| ७ | अनिस शाह | २१२२ | अपक्ष |
| ८ | शाह आरीफ इस्माईल | १७२ | अपक्ष |
| ९ | नोटा | १२६ | |

| प्रभाग क्र. १८ (ब) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते | पक्ष |
| १ | तापीबाई राठोड | १६१७ | शिवसेना (उबाठा) |
| २ | वैशाली राठोड | २५३ | मनसे |
| ३ | नलुबाई सोनवणे | ३६०१ | शिवसेना |
| ४ | यास्मीन खाटीक | १३६५ | अपक्ष |
| ५ | उज्वला घुगे | ३०३ | अपक्ष |
| ६ | ज्योती पाटील | ११७७ | अपक्ष |
| ७ | नोटा | १८४ | |

| प्रभाग क्र. १८ (क) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते | पक्ष |
| १ | कुसुम आठरे | ३३३ | मनसे |
| २ | प्रमिलाबाई चव्हाण | २०९ | काँग्रेस |
| ३ | अनिता भापसे | २७०६ | शिवसेना |
| ४ | सोनम सोनवणे | ७८२ | शिवसेना (उबाठा) |
| ५ | शबनम पटेल | १७५२ | एमआयएम |
| ६ | अर्चना कोळी | ८६३ | अपक्ष |
| ७ | सुनिता भापसे | १६९८ | अपक्ष |
| ८ | नोटा | १५७ | |

| प्रभाग क्र. १९ (क) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते | पक्ष |
| १ | निकिता वंजारी | ७५३३ | शिवसेना |
| २ | अलका सपकाळ | १९५४ | राष्ट्रवादी (श.प.) |
| ३ | कोकिळा मोरे | २५४ | अपक्ष |
| ४ | नोटा | ४३३ | |

| प्रभाग क्र. १९ (ड) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते | पक्ष |
| १ | विशाल पवार | २९५ | काँग्रेस |
| २ | राजेंद्र घुगे-पाटील | ५०८४ | भाजपा |
| ३ | संग्रामसिंह सुर्यवंशी | ४१९ | राष्ट्रवादी (श.प.) |
| ४ | किरण गव्हाण | १४८ | अपक्ष |
| ५ | दिनेश ढाकणे | ४८५ | अपक्ष |
| ६ | गणेश पाटील | २१० | अपक्ष |
| ७ | श्रीकृष्ण वाघ | ९२ | अपक्ष |
| ८ | उमेश सोनवणे | ३२०० | अपक्ष |
| ९ | नोटा | २४० | |

# उबाठाचे गुलाबराव वाघांसह कुलभूषण पाटील, कापसे, मालपुरेवर गुन्हा

## वखार महामंडळाजवळ दगडफेक; पीआयसह तीन पोलीस जखमी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ जानेवारी**

ईव्हीएम मशीनमध्ये घोळ आहे, असा आरोप करत मुख्य मतमोजणी केंद्रात जाण्याचा समर्थक प्रयत्न करत होते. याठिकाणी कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांच्या कामात अडथळा आला होता. अचानक दगडफेक केल्याने यात पोलीस निरीक्षकांसह तीन पोलीस कर्मचारी जखमी झाले. याप्रकरणी तक्रारीनुसार उमेदवार कुलभूषण पाटील, पंकज पाटील, उबाठाचे नेते गुलाबराव वाघ, आबा कापसे, गजानन मालपुरे, भाऊसाहेब पाटील यांच्यासह २५० समर्थकांवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

**ईव्हीएम मशीन मॅनेज केल्याचा आरोप**

मतमोजणी प्रक्रिया राबविण्यासाठी पोलिसांनी याठिकाणी चोख बंदोबस्त लावला होता. हवालदार प्रदीप पाटील यांच्या तक्रारीनुसार, वखार महामंडळाच्या गेट क्रमांक दोन येथे मुख्य बॅरेकेट्स लावले होते. शुक्रवारी (१६ जानेवारी) दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास गेट क्रमांक दोन येथे उमेदवार कुलभूषण पाटील यांच्यासह दोनशे ते अडीचशे समर्थकांचा जमाव आला. हा निर्णय मान्य नाही असे म्हणत त्यांनी शासकीय कामात अडथळा आणला. ईव्हीएम मशीनमध्ये घोळ आहे, ईव्हीएम मशीन मॅनेज केल्या आहे. त्या ताब्यात घ्या, असे आरोप करत मुख्य मतमोजणी केंद्राकडे जाण्याचा प्रयत्न केला. पोलीस शांतता राखण्याचे सांगत होते. त्याचवेळी अचानक पोलिसांच्या दिशेने दगडफेक केली.

### ठिय्याप्रकरणी १२ जणांवर गुन्हा

जळगाव महानगर पालिकेच्या निवडणुकीची मतमोजणी शुक्रवारी वखार महामंडळ गोडाउनमध्ये सुरू होती. याठिकाणी फेरमतमोजणीच्या मागणीसाठी उमेदवारासह समर्थकांनी ठिय्या मांडला होता. शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी उबाठाचे उमेदवार कुलभूषण पाटील, त्यांचे बंधू पंकज पाटील यांच्यासह दहा समर्थकांवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रभाग क्रमांक ८, ९, १० ची मतमोजणी मुख्य मतमोजणी कक्षात सुरू होती. कुलभूषण पाटील यांनी फेरमतमोजणीसाठी अर्ज सादर केला होता. तो अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांनी फेटाळला. त्यानंतर थेट मतमोजणी कक्षात येत कुलभूषण पाटील व समर्थकांनी ठिय्या आंदोलन पुकारले होते. आत प्रवेश करत मतमोजणी थांबविली. अधिकाऱ्यांना शिवीगाळ केली. कामकाज बंद पाडुन शासकीय कामात अडथळा आणला, असे तहसीलदार विनोद पाटील यांच्या तक्रारीत नमूद आहे. हवालदार संजीव मोरे हे तपास करीत आहेत.

**अचानक दगडफेक**

हा गोंधळ सुरू असताना अचानक पोलिसांच्या दिशेने समर्थकांनी दगडफेक करण्यास सुरुवात केली. यात कर्तव्य बजावत असलेले यावल पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे तसेच पोलीस मुख्यालयातील पोलीस कॉन्स्टेबल मोहित सोनवणे, पोलीस कॉन्स्टेबल लोकेश रंधे तसेच पोलीस कॉन्स्टेबल अविनाश राजपूत या चौघांना दुखापत झाली.

**उबाठाचे अडकले अनेक नेते**

याप्रकरणी उध्दव ठाकरे शिवसेनेचे कुलभूषण पाटील, पंकज पाटील, गुलाबराव वाघ, विकास चौधरी, आबा कापसे, मयुर कापसे, गजानन मालपुरे, भाऊसाहेब पाटील, विकास निकम यांच्यासह २०० ते २५० समर्थकांवर शासकीय कामात अडथळा आणला म्हणून एमआयडीसी पोलीस ठाण्यात शुक्रवारी (१६ जानेवारी) गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक गणेश वाघ हे तपास करीत आहेत.

# ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलणारा विकास हाच केंद्रबिंदू

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,१७ जानेवारी :**

ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलणाऱ्या पायाभूत सुविधा, मूलभूत गरजांना प्राधान्य देत सर्वसामान्यांच्या जीवनात प्रत्यक्ष बदल घडवणारा विकास हाच आपल्या कामाचा केंद्रबिंदू आहे,असे प्रतिपादन पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी धरणगाव तालुक्यातील विविध गावांत कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण प्रसंगी केले.



धरणगाव तालुक्यातील श्यामखेडा, भोणे, बिलखेडा तसेच जांभोरे येथे विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण पालकमंत्री ना.पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. एकूण सुमारे ८ कोटी रुपयांच्या विकास कामांना सुरुवात झाली असून अनेक कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

**या कामांचे झाले भूमिपूजन- लोकार्पण**

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत विवरे - जांभोरे सार्वे खुर्द ते बिलखेडा या १०.५० किमी रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण, धरणगाव ते सार्वे या १ किमी शेतरस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण, श्यामखेडा येथे अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण, शाळा परिसर सुशोभीकरण व पेव्हिंग ब्लॉक बसवणे, बिलखेडा येथे ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम, भोणे येथे स्मशानभूमी पोहोच रस्ता, लक्ष्मीनारायण मंदिर परिसरात कॉंक्रीटीकरण व सभागृह बांधकाम इत्यादी कामांचे भूमिपूजन करण्यात आले. आमदार निधीतून जांभोरे येथे बिलखेडा येथे महानुभव गल्लीतील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण, बिलखेडा येथे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण, सांत्वन शेड बांधकाम,भोणे येथे स्मशाभूमी पोहोच रस्ता या कामांचे लोकार्पण मंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविक युवा नेते तथा जिल्हा परिषदेचे तत्कालीन सदस्य प्रतापराव पाटील यांनी केले. सूत्रसंचालन तालुकाप्रमुख डी. ओ. पाटील यांनी केले, माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे यांनी आभार मानले. यावेळी पालकमंत्र्यांचे महिलांनी औक्षण केले. तसेच मिरवणूक काढण्यात आली. सुरुवातीला एकलव्यांच्या स्मारकाला माल्या अर्पण करण्यात आले. माजी पं. स. सभापती अनिल पाटील, प्रेमराज पाटील, डी. ओ. पाटील, सचिन पाटील, शिवसेना महानगरप्रमुख संतोष पाटील, शहरप्रमुख विलास महाजन, गटविकास अधिकारी के. व्ही. वानखेडे, उपअभियंता जितेंद्र सोनवणे, शाखा अभियंता विशाल पाटील, पोलीस निरीक्षक एस. एच. पवार, पप्पू भावे, मंगलअण्णा पाटील, नाटेश्वर पवार, शेतकी संघ अध्यक्ष गजानन पाटील, माजी सभापती प्रेमराज पाटील, प्रमोद पाटील, समाधान पाटील, सरपंच संगीता पाटील, अनिता गुजर, चंद्रकांत भदाणे यांच्यासह सर्व राष्ट्रवादी शिवसेना कार्यकर्ते ग्रामस्थ उपस्थित होते. युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख भैया मराठे, तालुकाप्रमुख दीपक भदाणे, नितीन पाटील, विभागप्रमुख गणेश भिंगारे व शिवसेना युवा सेना पदाधिकाऱ्यांनी नियोजन केले.

# भरारी फाऊंडेशन, क्रेडाई यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात २३ पासून बहिणाबाई महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ जानेवारी**

खान्देशाच्या सांस्कृतिक चळवळीला बळ देणारा बचत गटाच्या महिलांना व लघू उद्योजकांना आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरलेला बहिणाबाई महोत्सव २०२६ याचे ११ व्या वर्षाचे आयोजन २३ ते २७ जानेवारी दरम्यान बॅ. निकम चौक, सागर पार्क, या ठिकाणी करण्यात आले आहे. खान्देशातील महिला बचत गट व लघू उद्योजकांनी निर्माण केलेल्या वस्तुंना हक्काची बाजार पेठ निर्माण व्हावी, त्यांनी निर्माण केलेल्या वस्तुंना योग्य तो भाव मिळावा व त्यातुन त्यांची आर्थिक उन्नती व विकास व्हावा. हा मूळ उद्देश डोळ्यासमोर ठेवून या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

**खाद्य पदार्थ खास आकर्षण**

बहिणाबाई महोत्सवाचे खास आकर्षण म्हणजे बहिणाबाई खाद्य महोत्सव बचत गटाने तयार केलेल्या विविध खाद्य पदार्थांना जळगाव नागरिकांची विशेष मागणी असते. भरीत भाकरी, शेवभाजी, खापरावरची पुरणपोळी सह खान्देशातील विविध खाद्य पदार्थांचा या महोत्सवाच्या निमित्ताने जळगावकर नागरिक आस्वाद घेत असतात. यावर्षीच्या बहिणाबाई महोत्सवात विशेष आकर्षण म्हणजे बाबा सत्यनारायण मौर्य यांचा 'भारत माता की आरती' हा कार्यक्रम होणार आहे. तसेच 'ही लावणी महाराष्ट्राची' सुप्रसिद्ध लावणी कलावंत शशिकांत सरवदे बीड सादर करणार आहे. तर दोंडाईचा येथील प्रसिद्ध कीर्तनकार रविकिरण महाराज यांच्या कीर्तनाच्या कार्यक्रमाचे या महोत्सवात विशेष आकर्षण असणार आहे. दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी साज मेकअप स्टुडिओ यांच्या वतीने 'मराठी संस्कृतीचा फॅशन शो' चे आयोजन या महोत्सवात करण्यात आलेले आहे.

**लोककलावंतांना संधी**

खान्देशातील विविध लोककला शाहिरी, भारूड, लोकगीते, लोकनृत्य, वहीगायन, आदी लोककलांबरोबरच शालेय व महाविद्यालयीन युवा कलावंतांना आपली कला सादर करण्यासाठी बहिणाबाई महोत्सवाचा सांस्कृतिक मंच खुला ठेवण्यात आला आहे. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैद्यकीय, उद्योग व महिला विकासाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी बहिणाबाई पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. खान्देशासह राज्यभरात विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना बहिणाबाई पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

**एक लाख नागरिक अपेक्षित**

गत दहा वर्षात शहरातील नागरिकांसह जिल्हाभरातुन मोठ्या संख्येने नागरिकांनी हजेरी लावली आहे. यावर्षी देखील अंदाजे १ लाख नागरिक या महोत्सवाला भेट देतील, असा अंदाज असून त्यानुसार संपूर्ण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बहिणाबाई महोत्सवाच्या अकराव्या वर्षाचे आयोजन विविध कार्यक्रमांसह खाद्य संस्कृती व लोककलेच्या जागराने रंगणार असून जळगावकर नागरिकांनी मोठ्या संख्येने या महोत्सवात हजेरी लावून जळगावच्या सर्वात मोठ्या लोक उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकाच्यावतीने करण्यात आले आहे.

# मनपा निवडणुकीत ३१ हजार मतदारांकडून 'नोटा' पर्यायाचा वापर

**जळगाव :** जळगाव शहर महापालिकेच्या निवडणुकीत ५३.७७ टक्के मतदान झाले होते. मतमोजणी अंती शहरातील ३१ हजार ५२५ मतदारांनी 'नोटा'चा पर्याय स्विकारला असल्याची माहिती समोर आली आहे. महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची धामधुम आटोपली आहे. या निवडणुकीत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी महायुतीने ७५ पैकी ६९ जागांवर दणदणीत विजय मिळविला. शहरातील ४ लाख ३४ हजार ७५५ पैकी २ लाख ३४ हजार ५२३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला होता. महापालिकेच्या निवडणुकीच्या रिंगणात ३३३ उमेदवार उभे होते. यातील ७५ नगरसेवकांना मतदारांनी निवडून दिले. ज्या प्रभागांमध्ये उमेदवार निवडून आले, त्याच प्रभागात 'नोटा' म्हणजेच 'कुठलाही उमेदवार नको' अशा पर्यायाचा वापर देखील मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

**प्रथमच ३१ हजार नागरिकांकडून 'नोटा'चा स्विकार**

जळगाव महापालिकेच्या निवडणुकीत यंदा प्रथमच 'नोटा' या पर्यायाला मोठ्या प्रमाणावर पसंती दिली आहे. शहरातील १९ प्रभागांमध्ये तब्बल ३१ हजार ५२५ मतदारांनी 'नोटा'चा वापर करून उमेदवारांना असहमती दर्शविली आहे. यात सर्वाधिक प्रभाग क्र. ४ अ मध्ये १००२ मतदारांनी 'नोटा' बटन दाबले.

# पालक शाळेतर्फे रंगला पतंगोत्सव

**जळगाव :** पारंपरिक खेळांचे महत्त्व कळावे आणि पालक-पाल्यांमधील नाते अधिक घट्ट व्हावे, या उद्देशाने रिफ्लेक्शन फाउंडेशनच्या 'पालक शाळा' तर्फे मकर संक्रांतीनिमित्त मेहरुण तलावाकाठी अभिनव पतंग उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला मल्हार कम्युनिकेशनचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाला पालक शाळेचे संचालक रत्नाकर पाटील, डॉ. अनंत पाटील, आनंद मल्हारा यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरवातीला डॉ. अनंत पाटील यांनी या उपक्रमाची भूमिका मांडली तर आनंद मल्हारा यांनी अशा प्रकारच्या उपक्रमाची आजच्या काळातील उपयोगिता विशद केली. मेहरुण तलावाच्या परिसरात आयोजित या उत्सवात ६० ते ७० पालक आणि मुलांनी सहभाग नोंदवला. ५ ते १५ वयोगटातील मुलांचा उत्साह यावेळी ओसंडून वाहत होता. कृणाल महाजन यांनी सूत्रसंचालन केले. यशस्वीतेसाठी निलेश पाटील, अश्विनी पटवर्धन, सचिन कोल्हे, कृणाल महाजन व मल्हारा कम्युनिकेशनच्या टीमने विशेष परिश्रम घेतले.

# तालुका युवासेनेतर्फे जल्लोष!

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ जानेवारी :**



जळगाव महानगरपालिका निवडणुकीत शिवसेनेने ऐतिहासिक कामगिरी करत २३ पैकी तब्बल २२ जागांवर विजय मिळविला. जळगाव तालुका युवासेनेतर्फे या विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी जळगाव तालुका युवासेनेतर्फे ना. गुलाबराव पाटील यांचे जल्लोषात सत्कार करत पेढे भरवून अभिनंदन केले. तसेच कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. यावेळी युवासेनेचे उपतालुका प्रमुख स्वप्निल सोनवणे, सेनेचे मुकुंद नन्नवरे, मयूर सोनवणे, नवलराजे पाटील, अभिजित पाटील यांच्यासह सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या दूरदृष्टी नेतृत्वाखाली पक्ष संघटन मजबूत आहे. मनपा निवडणुकीत बूथस्तरापर्यंत केलेले नियोजन, कार्यकर्त्यांची मेहनत आणि जनतेशी संवाद यामुळे हे अभूतपूर्व यश पक्षाला मिळाले, अशी भावना यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

# निवडणुकीत टॉप विजयी उमेदवार

**जळगाव :** जळगाव महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी शुक्रवारी (१६ जानेवारी) पार पडली. या निवडणुकीत विजयी झालेल्या दहा उमदेवारांनी सर्वाधिक मताधिक्य घेतले. अरविंद देशमुख यांना १० हजार ७२२ मते, सुनील खडके १० हजार ६८८ मते, पियुष कोल्हे ९ हजार ५५८ मते, रेश्मा काळे ९ हजार ४७८ मते, प्रकाश बालानी ९ हजार २६० मते, कलाबाई शिरसाळे ८ हजार ९३८ मते, डॉ. चंद्रशेखर पाटील ८ हजार ९०२ मते, नितीन सपके ८ हजार ७४० मते, गायत्री राणे ८ हजार ७२८ मते, प्रवीण कोल्हे ८ हजार ५८१ मते घेत मताधिक्याने विजयी झाले आहेत.

# 'एका भूवैज्ञानिकाची भ्रमणगाथा' पुस्तकाचे आज विमोचन

**जळगाव :** प.पू. श्री बाबा महाराजांचे १७ जानेवारी रोजी नागपुरला आगमन होत आहे प.पू. श्री बाबा महाराजांच्या विज्ञाननिष्ठ व्यक्तीमत्वाच्या अनुषंगाने राजीव हिंगवे लिखीत 'एका भूवैज्ञानिकाची भ्रमणगाथा' या पुस्तकाचे विमोचन १८ रोजी सायंकाळी ५.३० वा. शिवाजी सभागृह, नागपूर येथे होणार आहे. तसेच प. पू. श्री बाबा महाराज भाविकांना २० जानेवारी रोजी सकाळी ८.३० वा. चैतन्यपीठ, शिवाजी नगर , नागपूर येथे अनुग्रह देणार आहेत. तरी जे भाविक अनुग्रहासाठी इच्छुक असतील त्यांनी आपली नावे अनंत मनोहर डबीर- ९६७३१११८२३, नंदकुमार देशमुख- ९४२०४४५७४७, संजय पाठक- ९४२२१४७६७७ वर संपर्क साधावा.

# रेवा डायमंड्सकडून हिऱ्यांच्या किमतीवर २५ टक्के सूट

**पुणे :** लक्झरी जेव्हा परंपरेशी आणि विश्वासाशी एकरूप होते, तेव्हा सौंदर्याला नवा अर्थ मिळतो. १८३२ पासून विश्वासाचं नाव असलेल्या पु. ना. गाडगीळ आणि सन्सच्या घराण्याकडून सादर केलेल्या रेवा डायमंड्स, हिऱ्यांच्या विश्वात एक अनोखी आणि लक्षवेधी ऑफर सादर करत आहेत.

पहिल्यांदाच, रेवा डायमंड्सकडून हिऱ्यांच्या किमतीवर थेट फ्लॅट २५ टक्के सूट देण्यात येत आहे ही ऑफर नेकलेस आणि बांगड्यांवर उपलब्ध असेल. ही मर्यादित कालावधीसाठी असलेली ऑफर म्हणजे दर्जा, सौंदर्य आणि लक्झरीचा परिपूर्ण संगम आहे.

रेवा डायमंड्समधील प्रत्येक दागिना हा उत्कृष्ट कारागिरी, नाजूक डिझाईन आणि निवडक चमकदार हिऱ्यांचा प्रत्यय देतो. खास प्रसंगांसाठी भव्य नेकलेस असो वा रोजच्या लक्झरीसाठी साजेशा बांगड्या प्रत्येक दागिना आयुष्याच्या सुंदर क्षणांना अधिक खास बनवतो.

नववर्ष, लग्नसराई किंवा आपल्या माणसांसाठी परफेक्ट गिफ्ट शोधत असाल, तर ही ऑफर म्हणजे हिऱ्यांच्या आनंदाचा सुवर्णयोग आहे. इथे फक्त किंमत नाही, तर आनंद, आत्मविश्वास आणि आठवणी मोलाच्या ठरतात.

ही खास ऑफर अनुभवता येईल फिनिक्स मॉल ऑफ द मिलेनियम, वाकड येथील एक्सक्लुझिव्ह रेवा डायमंड्स शोरूममध्ये, तसेच पुण्यातील निवडक पु. ना. गाडगीळ अँड सन्स शोरूम्स सिंहगड रोड, सातारा रोड, कोथरूड, लक्ष्मी रोड आणि विमान नगर येथे.

ही ऑफर ३१ जानेवारी २०२६ पर्यंत वैध आहे. आजच रेवा डायमंड्सच्या जगात प्रवेश करा आणि लक्झरीचा खरा अर्थ अनुभवा.

## निधन वार्ता



### रमेश कुळकर्णी

**जळगाव :** येथील सन्मीत्र कॉलनीतील रहिवासी तथा दूरसंचार विभागातील सेवानिवृत्त टेलीफोन सुपरवायझर रमेश दत्तात्रय कुळकणी यांचे (वय ८८) यांचे शनिवारी १७ जानेवारी रोजी रात्री १०.१५ वा. वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा रविवारी १८ जानेवारी रोजी सकाळी ११ वा. राहत्या घरून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. ते संजय कुळकणी व गोदावरी फाउंडेशनचे जनसंपर्क अधिकारी राहुल कुळकर्णी यांचे वडील होत.



### मोहन आदिनाथ जैन (दहीकर)

**सावदा :** येथील स्वामीनारायण नगरातील रहिवासी मोहन आदिनाथ जैन (दहीकर) (वय ७३) यांचे आज दि. १७ जानेवारी रोजी सकाळी ६ वाजता हृदय विकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, जावाई, सुन व नातवंडे असा परिवार आहे. ते किरण जैन (दहीकर) यांचे वडील होत.

**Change In Name**

I Jafar Ali Shaukat Ali Sayyad residing at Jalgaon declare that my old name was **JafarAli Shaukatali Saiyed,** My new name is **Jafar Ali Shaukat Ali Sayyad.**

**Change In Name**

I Sanjida Bi Jafar Ali Sayyad residing at Jalgaon declare that my old name was **Sanjeeda Bi Jafar Ali Saiyed**, My new name is **Sanjida Bi Jafar Ali Sayyad**

थेंब थेंब वाचवा भरपूर पिकवा



ठिबक सिंचन संच
पूर्णतः आधुनिक व वाजवी दरात उपलब्ध.
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'केसर-कस्तुरी' २६,२७ नवीपेठ, जुन्या बस स्टँडसमोर गल्लीत जळगाव
2232641 TO 2232645

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग**, डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com

जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
जळगाव, रविवार, १८ जानेवारी २०२६



# आमदार सुरेश भोळेंच्या नेतृत्वाचे मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून कौतुक



**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ जानेवारी**

महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने आमदार सुरेश भोळे यांच्या नेतृत्वाखाली ऐतिहासिक कामगिरी करत सर्व ४६ जागांवर दणदणीत विजय मिळवला आहे. या अभूतपूर्व यशानंतर आमदार भोळे यांनी आज मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी भोळे यांचा विशेष सत्कार करून जळगावच्या विकासासाठी नवा संकल्प सोडला.

जळगाव महापालिकेच्या ६३ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपने सुरुवातीपासूनच आक्रमक प्रचार केला होता. आमदार राजूमामा भोळे यांनी निवडणुकीची संपूर्ण सूत्रे आपल्या हाती घेतली होती. विकास आणि पारदर्शक प्रशासन या मुद्यांवर त्यांनी मतदारांशी संवाद साधला. निकालाअंती, सर्वच्या सर्व ४६ जागांवर भाजपचे उमेदवार निवडून आल्याने राजकीय वर्तुळात या विजयाची मोठी चर्चा होत आहे. विरोधकांना एकाही जागेवर आपले खाते उघडता आले नाही.

**शहराचा विकास हेच ध्येय**

आमदार भोळे म्हणाले की, हा विजय माझा नसून जळगावातील प्रत्येक कार्यकर्त्याचा आणि जनतेचा आहे. मुख्यमंत्र्यांनी दिलेली साथ आणि केंद्र-राज्य सरकारच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचवल्याचे हे फळ आहे. आता आमचे लक्ष फक्त आणि फक्त जळगावच्या सर्वांगीण विकासावर असेल, असे आ. भोळे म्हणाले.

### आ. भोळेंनी गाठली मुंबई

या मोठ्या विजयाची माहिती देण्यासाठी आणि पुढील नियोजनासाठी आमदार सुरेश भोळे यांनी आज मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मुख्यमंत्र्यांनी आमदार भोळे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि त्यांच्या निवडणूक नियोजनाचे कौतुक केले. मुख्यमंत्री म्हणाले की, जळगावकरांनी भाजपवर जो विश्वास दाखवला आहे, त्याला आम्ही तडा जाऊ देणार नाही. आमदार भोळे यांच्या मार्गदर्शनाखाली जळगाव शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी मदत करेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# विरोधकांची स्थिती, टांगा पलटी घोडे फरार..!



**जळगाव दिनांक**
**चंद्रशेखर जोशी**

उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव आणि धुळे या तिनही महापालिकांमध्ये भाजप आघाडीने निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. हा निकाल एखाद्या राजकीय योगायोगाचा परिणाम नाही तर सातत्यपूर्ण काम, स्पष्ट विचारधारा आणि संघटनशक्तीचा थेट जनतेकडून मिळालेला कौल होय. विरोधक असलेल्या शिवसेना उबाठा गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि काँग्रेस या पक्षांना हा निकाल धक्का वाटतोय. कारण त्यांनी अजूनही आत्मपरिक्षणाऐवजी सबबींचा आधार घेतला असल्याचेच समोर येते आहे. निवडणुकीपूर्वी निष्ठावंत विरूद्ध नवीन कार्यकर्ते असा जो काही सुर सर्वत्र आळविला गेला तो काही काळानंतर थांबला आणि सारेच कामाला लागले. संधी मिळावी ही अपेक्षा करणे चुकीचे अजिबात नाही, पण तेच शेपुट धरून बंडखोरी करणे याला निष्ठा म्हणता येणार नाही. निवडणुकीच्या निकालानंतर भाजपच्या जीएम फाऊंडेशनमधील कार्यालयासमोर एक दृश्य पहायला मिळाले आणि निष्ठा काय असतात याचा दृष्टांत झाला. ऐनवेळी तिकीट नाकारलेले उदय भालेराव व तात्या उर्फ सुभाष शौचे हे पक्षाच्या सदस्यांचा विजय व मिळालेल्या यशाचा आनंद साजरा करत फटाके फोडत होते, यालाच निष्ठा म्हणतात...अशा व्यक्तीमत्वांना सलाम...! या निवडणुकीत शिवसेना (उबाठा), शरद पवारांची राष्ट्रवादी आणि अजित पवारांची राष्ट्रवादी हे पक्ष निवडणूक रिंगणात उतरले खरे पण त्यांची परिस्थिती ‘टांगा पलटी, घोडे फरार’ अशीच झाली आहे. पक्षचिन्ह, विचारधारा, नेतृत्व आणि दिशा या सगळ्याच बाबतीत निर्माण झालेला गोंधळ मतदारांपर्यंत पोहोचला आणि त्याचा थेट परिणाम निकालांवर दिसून आला आहे. शिवसेना उभी ठाकली खरी पण ती कोणत्या मुद्यांवर कोणाच्या नेतृत्वाखाली आणि कोणाच्या विरोधात हे सामान्य मतदारास उमगले नाही. शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस परंपरा आणि वारसा सांगत राहिली तर अजित पवारांचा गट सत्तेचा वास्तववाद सांगत राहीला. या दोघांच्या संघर्षात राष्ट्रवादीचा मूळ चेहरा हरवला आणि मतदार संभ्रमात पडला, दोन्ही गटांना अपेक्षित यश कोठेही मिळाले नाही. या सर्व राजकीय पार्श्वभूमीवर मालेगाव सारख्या शहरातील चित्र विचार करण्याजोगे आहे. संख्येने समान असताना हिंदू उमेदवार केवळ २५ टक्के विजयी झाले. हा राजकीय आत्मपरिक्षणाचा विषय आहे. हिंदू समाजाची मते विखुरली की काय होते याचा साक्षात्कार लोकसभा निवडणुकीच्या वेळी धुळे लोकसभा मतदार संघाच्या क्षेत्रात झालेल्या मतदानावेळी आलाच होता. केवळ या क्षेत्रातील मतदानामुळे निकालाची दिशाच बदलली होती तरी आम्ही जागे व्हायला तयार नाही. या निवडणुकीत काही बंडोबांनाही धडा मिळाला आहे. आपण मोठे की पक्ष मोठा, विचारधारा महत्वाची याचा काही जणांना विसर पडला होता; त्यांनाही त्यांची जागा दिसून आली.

पक्षाने नव्याने संधी दिलेले सुनील महाजन दाम्पत्य, नितीन लढ्ढा, नितीन बरडे यांना अपेक्षित यश मिळाले. शिवसेना शिंदे गटातील उमेदवार विष्णू भंगाळे व अन्य काही जणांनाही चांगले यश लाभले. एकीने लढल्याचे परिणाम या ठिकाणी दिसून आले. संघटीत विचारशक्तीच नेहमी वरचढ ठरते याचाच प्रत्यय येथे आला. राजकीय पक्षांनी केवळ आघाड्या, युती आणि फाटाफुटी यावर लक्ष केंद्रीत न करता स्थानिक प्रश्न, नागरी सुविधा, विकास, सुरक्षा आणि सामाजिक समतोल यावर ठोस भूमिका घेणे अपेक्षित होते. मात्र प्रचारात वैयक्तीक टीका, अंतर्गत संघर्ष आणि सत्तासमिकरणे या मुद्यांनाच प्राधान्य दिले गेले. मतदांनीही याला उत्तर देतांना पारंपरिक निष्ठा बाजुला ठेवून वेगळे निर्णय घेतले.

काही निकाल तर धक्कादायकच ठरले. यात प्रामुख्याने प्रफुल्ल देवकर या नवख्या कार्यकर्त्याने भाजपतून बंडखोरी करणाऱ्या माजी स्थायी समिती सभापती जितेंद्र मराठे यांचा पराभव केला. माजी मंत्री देवकरांची धूर्त रणनिती प्रफुल्ल यांच्या कामी आली. आप्पा शांत पण कुणाचा कसा गेम करतील...(राजकीय) याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला..!
नाशकात संकटमोचक गिरीशभाऊंची शक्ती पुन्हा एकदा दिसून आली. धूर्त रणनितीच्या आधारावर व पक्षातून अनेक नाराजांना अंगावर घेऊन त्यांनी मोठे यश मिळविले. धुळ्यात पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अनुप अग्रवाल यांच्यापुढे मोठे आव्हान होते. राज्यात मित्रपक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गट बरोबर नव्हता. हिंदू मते विखुरल्याने येथे एमआयएमचे १० नगरसेवक निवडून आले. मात्र आमदार अनुप अग्रवाल यांनी धूर्त रणनितीच्या आधारे यश मिळविले. जळगावात आमदार सुरेश भोळे यांनीही अनेक संकटांवर मात करत ‘हम भी कुछ कम नही...’ हेच दाखवून दिले आहे. अनेकांना ‘मामांनी’ प्रेमाने जिंकत पक्षाला यश मिळवून दिले. त्यांना चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण यांची साथही मोलाची ठरली.

विरोधकांना जळगावातील अपयशाची चाहूल पहिल्यापासून होती असेच लक्षात येते. कारण भाजप-शिवसेनेचे नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रत्यक्ष दौरा व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मतदारांशी केलेले मोबाईल संभाषण प्रभावी ठरले. विरोधकांकडून प्रमुख असे कोणीही आले नाही...याचेच परिणाम दिसून आले आहेत. यश तर मिळाले, मात्र आता जबाबदाऱ्या वाढल्या आहेत. त्या दृष्टीने भविष्याचे नियोजन करणेच आता अपेक्षित आहे.

# महायुतीचे आता शहर विकास हेच व्हिजन

## शिंदेसेना जिल्हाध्यक्ष विष्णू भंगाळे यांचे विधान

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,१७ जानेवारी**

जळगाव महानगर पालिकेच्या निवडणुकीत आम्ही २३ जागा लढविल्या होत्या. त्यापैकी २२ जागांवर जनतेने कौल दिला. मनपात सुरू होणाऱ्या कार्यकाळात शहराचा विकास हेच व्हिजन घेऊन महायुती वाटचाल करेल, असे विधान शिंदे शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष तथा नवनिर्वाचित नगरसेवक विष्णू भंगाळे यांनी केले. त्यांच्या निवासस्थानी शनिवारी (१७ जानेवारी) दुपारी माध्यम प्रतिनिधींशी त्यांनी संवाद साधला. यावेळी त्यांचे बंधू सुनील भंगाळे तसेच आकाश भंगाळे उपस्थित होते.



पालिकेत ही पाचवी निवडणूक आपण लढविली. विकासाच्या मुद्यांवर आपण लढलो. त्याला जनतेने आशीर्वाद दिले. या निवडणुकीत महायुतीला जनतेने सत्ता सोपविली, असे सांगुन ते म्हणाले, महायुतीत तालमेल जमला आहे. जुन्या भाजपशी आमचा पक्ष सोबत आहे. महायुतीच्या माध्यमातून शहर विकासाला चालना देऊ.

**म्हणून मतदान कमी**

प्रभागात दुपारी गोंधळ झाला. खऱ्या मतदारावर आरोप करण्यात आला. तो मतदार दुसरीकडे वास्तव्याला आहे. त्याचे मतदान या प्रभागात होते. मतदान करण्यासाठी तो आला होता. मात्र त्यातून गैरसमज होऊन गोंधळ झाला. यामुळे या परिसरातील मतदार कमी निघाले. मतदान कमी झाले. खऱ्या मतदारावर हरकत घेतल्याप्रकरणी पोलिसात तक्रार दिली आहे. निवडणूक झाली. मतभेद संपले आहेत. आता कोणाबद्दल रागरोष नाही, असेही त्यांनी सांगितले.

**भंगाळेंच्या कारची फोडली काच**

शिंदे शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष तसेच प्रभाग पाचमधून विजयी उमेदवार विष्णू भंगाळे यांच्या कारची दगड मारुन काच फोडली. ही घटना मध्यरात्री घडली. शनिवारी सकाळी हा प्रकार उघडकीस आला. यासंदर्भात नगरसेवक विष्णू भंगाळे यांनी सांगितले की, कोणी कारला दगड मारला हे माहित नाही, कोणावर संशयही नाही. याप्रकरणी पोलिसात तक्रार केलेली आहे. पोलीस तपास करतील.



# भाजप ज्येष्ठ नेत्यांसमवेत नगरसेवक विशाल भोळे यांचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ जानेवारी**

जळगाव महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी मतमोजणीत ७५ प्रभागांचा निकाल जाहीर झाला. तसेच पालिकेत महायुतीला प्रचंड यश मिळाले. या विजयाचा आनंद शुक्रवारी (१६ जानेवारी) सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास भाजप कार्यालय जी.एम. फाउंडेशन समोर शिवतीर्थ मैदानावर साजरा करण्यात आला. नवनिर्वाचित नगरसेवक विशाल सुरेश भोळे यांनी भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ कार्यकर्ते माजी अध्यक्ष सुभाष शौचे, माजी नगरसेवक उदय भालेराव, कार्यालय मंत्री प्रकाश पंडित या ज्येष्ठ पदाधिकारी व कार्यकर्त्यांसमवेत जल्लोष केला. आतषबाजी आणि ढोल ताशांच्या गजरात अनेकांनी ठेका ठरला.

याप्रसंगी महिला मोर्चाच्या अध्यक्षा नितू परदेशी, जिल्हा पदाधिकारी रेखा वर्मा, निला चौधरी, मनोज भांडारकर, दिप्ती चिरमाडे, पंकज पाटील, रेखा पाटील, रेखा कुलकर्णी, शोभा कुलकर्णी, सविता बोरसे, युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थेपडे विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात

**म्हसावद :** गुरूवारी (१५ जानेवारी) म्हसावद (ता. जि. जळगाव) येथील स्वा. सै. पं. ध. थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कै. स्वा. सै. पंढरीनाथ धडुराम थेपडे संस्थेचे संस्थापक यांच्या ३१ व्या स्मृती समारोहानिमित्त इ. १० वी व १२ वीतून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हास्तरावर तालुकास्तरावर विविध स्पर्धेत बक्षीस मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा देखील सत्कार करण्यात आला. विचार मंचावर संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. केदार थेपडे, संस्थेचे कोषाध्यक्ष बंकट लढे तसेच म्हसावद नगरीतील वृत्तपत्र प्रतिनिधी समाधान पाटील, गावातील ज्येष्ठ श्रेष्ठ नागरिक व दापोरा येथील सामाजिक कार्यकर्ते नाना सोनवणे, विद्यालयाचे मुख्याध्यापक जी. डी. बच्छाव ,उपमुख्याध्यापक एस. के. भंगाळे , पर्यवेक्षक के. पी. पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे कोषाध्यक्ष बंकट लढे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक जी. डी. बच्छाव यांनी केले.



संस्थेचे अध्यक्ष डॉ. केदार थेपडे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व सांगितले व मुलींसाठी खास शिक्षणाची सुविधा देणार असे सांगितले. या कार्यक्रमात पंधरा हजार रुपयांची रोख पारीतोषिकांचे वितरण यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. जे. पवार, शिक्षक प्रतिनिधी सचिन चव्हाण, पराग पाटील व वाय. पी. चिंचोरे यांनी केले. आभार प्रदर्शन विद्यालयाचे पर्यवेक्षक के. पी. पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर बंधू भगिनी यांचे सहकार्य लाभले.

# योगामुळे मानसिक, शारिरीक संतुलन - अतुल जैन

## अनुभूती निवासी स्कूलमध्ये राष्ट्रीय योगासन स्पर्धेला सुरवात

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ जानेवारी**

योग हे भारतीय संस्कृतीने जगाला दिलेली देण आहे. योगामुळे मानसिक, शारीरिक आरोग्य चांगले राहते. मन:शांती मिळते. आरोग्यदायी जीवनासाठी लहानांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांनी आपल्या जीवनात योगाभ्यास केला पाहिजे. राष्ट्रीय योगासन स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंना मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. योगाच्या विविध प्रकारांचे सादरीकरण करुन आपली प्रतिभा भारतातून आलेले खेळाडू अनुभूती निवासी स्कूलमध्ये दाखवित आहेत, असे अनुभूती स्कूलचे अध्यक्ष अतुल जैन यांनी सांगितले.

अनुभूती निवासी स्कूलमध्ये मुलींची १७ वर्षाखालील ६९ वी नॅशनल स्कूल गेम्स राष्ट्रीय योगासन स्पर्धे चे उद्घाटन शनिवारी झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.चे अध्यक्ष अशोक जैन, अनुभूती स्कूलचे अध्यक्ष अतुल जैन, संचालिका निशा जैन, प्राचार्य देबाशीस दास, सीआयएससीईचे सहसचिव अर्जित बासू, व्यवस्थापक अर्णव शॉ, विभागीय स्पोर्टस समन्वयक सिद्धार्थ किर्लोस्कर, मुख्य पंच डॉ. आरती पाल, एसजीएफआयचे मुख्य निरीक्षक रितू पाठक व्यासपीठावर उपस्थित होते. सुरुवातीला अनुभूती इंग्लिश मिडिअम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत म्हटले. अशोक जैन यांनी सीआयएससीई बोर्डच्या स्पर्धेचा ध्वज फडकवला. त्यानंतर अशोक जैन यांनी स्पर्धेची मशाल राष्ट्रीय योग खेळाडू यशश्री नांद्रे हिच्याकडे सुपर्द केली. यशश्रीने प्रदीप सपकाळेकडे तर प्रदीपने ऋद्राक्ष माळीकडे मशाल दिली. शेवटी अन्मय जैन यांच्याकडे मशाल देण्यात आली. त्याच्यासोबत चौघही खेळाडूंनी स्पर्धेची क्रीडाज्योत प्रज्वलित केली. अर्णव शॉ यांनी स्पर्धकांना शपथ दिली.




### देशभरातील १६७ खेळाडूंचा सहभाग

देशभरातून ३३ संघ राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी अनुभूती निवासी शाळेत आले आहेत. त्यात १६७ खेळाडू सहभागी झाले आहेत. आर्टिस्टिक सिंगल, ट्रेडिशनल सिंगल, आर्टिस्टिक पेअर, रिदमिक पेअर या चार प्रकारात योगासनाची विविध आसने सादर केली जाणार आहेत. सेमी फायनल व फायनल नंतर प्रत्येक प्रकारातील विजयी खेळाडूंना सुवर्ण, रौप्य आणि कांस्य देण्यात येणार आहे.

### देशभरातील ३३ संघाचा सहभाग

आंध्रप्रदेश, बिहार, सीबीएसई वेल्फअर स्पोर्टस, सीबीएसई, चंदीगड, छत्तीसगड, (सीआयएससीई) कौन्सील बोर्ड, दादर व नगर हवेली, दमण व दीप, दिल्ली, गुजरात, हरियाणा, हिमाचल प्रदेश, आंतरराष्ट्रीय बोर्ड शाळा क्रीडा संघटना, आयपीएससी स्कूल, जम्मू काश्मीर, झारखंड, कर्नाटक, केंद्रीय विद्यालय, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मेघालय, नवोदय विद्यालय, ओडिशा, पुदुच्चेरी, पंजाब, राजस्थान, तामिळनाडू, तेलंगणा, त्रिपूरा, उत्तर प्रदेश, विद्याभारती, पश्चिम बंगाल अशा एकूण ३३ संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

**रिंग जगलिंग, रनपा नृत्याने रंगत**

राष्ट्रीय योगासन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी अनुभूती इंग्लीश मिडीयम स्कूलच्या ज्ञानेश्वर सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. रिंग जगलिंगने दमदार सुरवात झाली. रिंगच्या साह्याने सादर केलेल्या सामूहिक कसरतींचे प्रेक्षकांनी कौतुक केले. यानंतर ओडिशातील पारंपारिक काठ्यांवरील रनपा नृत्य सादर केले. तोल सांभाळत काठीवर चालत सादर केलेल्या या थरारक नृत्याने प्रेक्षकांची मने जिंकली. लाठी-काठी या अनोख्या नृत्यप्रकाराला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात भरभरून दाद दिली. सांस्कृतिक कार्यक्रमाचा योग नृत्य खरा कळस ठरला. यशश्री नांद्रे या विद्यार्थिनीने योगासनांचा कलात्मक नृत्याने सादरीकरण केले. शरीर, श्वास आणि साधनेचा अद्वितीय संगम अनुभवत उपस्थितांनी हा क्षण दीर्घकाळ स्मरणात ठेवण्यासारखा ठरवला. सांस्कृतिक कार्यक्रमानंतर अशोक जैन यांनी राष्ट्रीय योगासन स्पर्धा खुली झाल्याचे जाहीर केले. राष्ट्रगीताने समारोप झाला.

**अनुभूती निवासी स्कूलमधील वातावरण स्पर्धेसाठी पोषक - रितू पाठक**

संपूर्ण भारतातून आलेल्या खेळाडूंना अनुभूती निवासी स्कूल मधील नैसर्गीक वातावरण भावले आहे. योग अभ्याससाठी आलेले खेळाडू शारिरीक व मानसिकदृष्ट्या आनंदी असून योगासना स्पर्धे साठी येथील वातावरण पोषक असल्याचे रितू पाठक यांनी म्हटले. सीआयएससीईचे सहसचिव अर्जित बासू म्हणाले की, अनुभूती स्कूलने संपूर्ण भारतासाठी योगासन स्पर्धा यशस्वीपणे आयोजीत केली असून येथील व्यवस्था कौतूकास्पद आहे.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एकदिवसीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ जानेवारी**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि लेवा एज्युकेशनल युनियन संचलित डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय (स्वायत्त), जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम-उषा अंतर्गत नवे शैक्षणिक धोरण या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील तरतुदी, त्यांची अंमलबजावणी आणि त्यातून विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व पालकांना होणारे फायदे याविषयी व्यापक जागरूकता निर्माण करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. कार्यशाळेच्या सुरवातीला प्रा. ऐश्वर्या परदेशी यांनी महाविद्यालयीन गीत सादर केले. उद्घाटन समारंभात प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. पी. एन. तायडे यांनी केले. प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. आर. बी. वाघुळदे यांनी आपल्या मनोगतात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षणात निर्माण होणाऱ्या गुणवत्तापूर्ण, कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख संधींचा सविस्तर आढावा घेतला. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. व्ही. जे. पाटील यांनी एनईपीमुळे शिक्षण व्यवस्थेत होणारे आमूलाग्र बदल, विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धती आणि संशोधनाला मिळणारी चालना यावर प्रकाश टाकला. कार्यशाळेतील पहिल्या सत्रात डॉ. प्रियंका बऱ्हाटे यांनी भारतीय ज्ञानपरंपरा व व्हॅल्यू-बेस्ड स्किल कोर्सेस यांचे शैक्षणिक महत्त्व स्पष्ट केले. दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. केतन नारखेडे यांनी व च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्ये कशी विकसित होतात, याचे सखोल विश्लेषण केले. तिसऱ्या सत्रात प्राचार्य डॉ. के. जी. कोल्हे यांनी उच्च शिक्षण क्षेत्रातील बदल आणि एनईपीचे दीर्घकालीन महत्त्व स्पष्ट करत बहुविषयक शिक्षण पद्धतीवर भर दिला.



दुपारनंतरच्या सत्रात प्रा. डॉ. श्रीकांत चौधरी यांनी संदर्भात मार्गदर्शन करत ऑनलाइन शिक्षणाच्या वाढत्या संधी स्पष्ट केल्या. समारोप सत्रात कार्यशाळेचा आढावा घेण्यात आला. समारोप सत्राचे अध्यक्ष म्हणून रसायनशास्त्र विषयाचे निवृत्त प्राध्यापक डॉ. ए. एम. नेमाडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे प्रतिनिधिक मनोगत झाले तसेच कार्यशाळेत सक्रिय सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यशाळेचे समन्वयक म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. पी. एन. तायडे यांनी काम पाहिले. कार्यशाळेच्या नियोजन आणि आयोजनात उपप्राचार्य प्रा. डॉ. सत्यजित साळवे यांचे मार्गदर्शन लाभले.

**यांनी घेतले परिश्रम**

कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी डॉ. सचिन कुंभार, डॉ. मिताली अहिरे, डॉ. राणी त्रिपाठी, प्रा. शांताराम तायडे, प्रा. नयना मराठे, प्रा. ऐश्वर्या वाणी, प्रा. अमृता नेतकर, प्रा. तकदीश शेख, प्रा. योगिता सोनवणे, प्रा. मंगेश किनगे, प्रा. निलेश कोळी, डॉ. गणेश जेठवे, प्रा. सुनील अहिरे. प्रा. ज्योती भोई, डॉ. नयन माहेश्वरी, प्रा. प्रियंका आठे, प्रा. नेहा खरे, प्रा. कल्पना खेडकर, प्रा. शुभांगी जाधव, प्रा. करण थोरात, प्रा. उत्कर्ष पुण्यशील इ. यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. बेंडाळे महिला महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची तयारी पूर्णत्वाकडे

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ जानेवारी**

येथील डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे स्वायत्त महिला महाविद्यालयाचे तीन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन जल्लोष २०२५-२६ चे आयोजन १९,२० व २१ जानेवारी रोजी करण्यात आले आहे. या संमेलनाची तयारी आता पूर्णत्वाकडे आली आहे.

स्नेहसंमेलनात सोमवार १९ जानेवारी रोजी विद्यार्थिनींचा विविध कला गुणदर्शनाचा सांस्कृतिक कार्यक्रम यासह फूड-फेस्टिवल, डी. जे. बिट्स, सारी-डे आणि सुप्रसिद्ध खानदेशी कलाकार प्रवीण माळी यांचा ‘‘आयत-पोयत सख्यानं’’ हा एकपात्री कार्यक्रम अशा विविध कला प्रकारांचे सादरीकरण होणार आहे. तसेच मंगळवार २० जानेवारी रोजी आपकी अदालत या आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमासह शिक्षक, शिक्षकेतर सहकारी आणि विद्यार्थिनींसाठी अंताक्षरी, डीजे-बिट्स अशा बहारदार कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.या स्नेहसंमेलनाचे विशेष आकर्षण विद्यार्थिनींचा ‘‘द ब्युफा पेजेंट फॅशन-शो’’ बुधवार दिनांक २१ जानेवारी रोजी सायंकाळी पाच वाजता महाविद्यालय प्रांगणात होणार आहे. महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन निमित्ताने राज्यस्तरीय युवा महोत्सव प्रथम पुरस्कार प्राप्त विद्यार्थिनी दिपाली विनोद सोनी व अनामिका रवींद्र चव्हाण यांची महाविद्यालयाची आदर्श विद्यार्थी म्हणून तर चंद्रमा विकास पाटील व जानवी दिनेश भिरुड यांची गॅदरिंग सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली आहे. याप्रसंगी टी.वाय.बी.ए ची विद्यार्थिनी गायत्री विजय आमले हिचा विशेष सन्मान केला जाणार आहे. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही.जे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहसंमेलन यशस्वीतेसाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले असून स्नेहसंमेलनाची तयारी पूर्णत्वाकडे नेण्यात येत असल्याचे स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. दीपक किनगे यांनी कळविले आहे.

## बांधकामाचे पैसे मागताच आसारी टाकली डोक्यात

**जळगाव :** कंन्ट्रक्शन बांधकाम पूर्ण करुन दे अन्यथा दिलेले पैसे परत करण्याचे सांगताच संशयिताने डोक्यात लोखंडी आसारी टाकत दुखापत केली. ही घटना गुरुवारी दुपारी सव्वा दोन वाजेच्या सुमारास शहरातील पिंप्राळा येथे मयुर कॉलनी परिसरात घडली.

यात तुषार दत्तात्रय सोनवणे (वय ३२,रा. संभाजीनगर महाबळ) हे जखममी झाले. सोनवणे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार याप्रकरणी मुस्तफा शेख, मुस्तकीम शेख, शाहीद शेख (पूर्ण नाव माहित नाही,रा. पिंप्राळा हुडको यांच्या विरोधात शुक्रवारी रामानंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार इरफान मलीक हे तपास करीत आहेत.

# शिक्षक शिक्षणातील आव्हाने आणि संधी या विषयावर परिषद

**जळगाव :** के.सी.ई.सो सं व्ही. पी.होले शिक्षणशास्त्र आणि शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालय जळगाव महाविद्यालयातर्फे एनईपी २०२० च्या संदर्भात एनसीटीपी- आईटीइपी ची अंमलबजावणी करतांना शिक्षक शिक्षणातील आव्हाने आणि संधी या विषयावर बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली.

या परिषदेचे उद्‍घाटन क.ब.चौ उ.म.वी प्र.कुलगुरु.प्रा.एस.टी. इंगळे यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यापीठाच्या अंतरविद्याशाखेचे अधिष्ठिता प्रा.एस.टी.भूकन,एस. एस.मनियार विधी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.युवाकुमार रेड्डी,संसाधन व्यक्ति डॉ.कैलास चौधरी,डॉ.निलेश जोशी तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य




प्रा.डॉ.अशोक राणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.केतन चौधरी यांनी केले. प्र.कुलगुरु.प्रा.एस.टी.इंगळे यांनी एनईपी -२०२० चे महत्त्व विशद करत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असून एनईपीचे पाच महत्त्वाचे स्तंभ यावेळी स्पष्ट केले.त्यांनी एनईपीची योग्य अंमलबजावणी झाली तर निश्चितच एक चांगला विद्यार्थ्यी व देशाचा चांगला नागरिक निर्माण होऊ शकेल अशी अपेक्षा व्यक्त केली. यानंतर अंतरविद्याशाखेचे अधिष्ठिता प्रा.एस. टी.भूकन यांनी आईटीइपी याविषयी विस्तृत माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ.अशोक राणे यांनी आईटीइपीची अंमलबजावणी करणे आजच्या काळाची गरज आहे असे मत प्रकट केले. आभार डॉ.नयन पाटील यांनी मानले.

## तलवारीच्या हल्ल्यात तरुण जखमी

**जळगाव :** दारु पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याने शिवीगाळ करत हातातील तलवारीने वार करत तरुणाला जखमी केले. ही घटना शुक्रवारी (१६ जानेवारी) दुपारी दीड वाजेच्या सुमारास शहरात बळीराम पेठेत मंदिराच्या ओट्यावर सार्वजनिक घडली. घटनेत भावाला जखमी केले म्हणून हिमांशु रितेश चंदनकर (वय २५,रा. बळीराम पेठ) यांच्या तक्रारीनुसार निर्भय उर्फ गोट्या रवींद्र पाटील (रा.शिवकॉलनी) याच्या विरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार प्रकाश पाटील हे तपास करीत आहेत.

जळगाव
तरुण भारत
www.tarunbharatjalgaon.com





## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : १८/१/२०२६ **वार** : रविवार **शके** : १९४७
**अयन** : उत्तर **ऋतू** : शिशिर **मास** : पौष **पक्ष** : कृष्ण **महिना** : जानेवारी
**संवत** : २०८२ **अयनांश** : २४-१३-२२ **तिथी** : अमावस्या **नक्षत्र** : पुर्वाषाढ
**योग** : हर्षण **करण** : नाग **सूर्योदय** : ७-१६ **सूर्यास्त** : १८-२२
**शुभाशुभ** : अशुभ

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : मिश्रीत स्वरुपाचा दिवस असेल.
**वृषभ** : अडकलेले पैसे मिळतील.
**मिथून** : वृध्दमंडळींचे आशीर्वाद लाभतील.
**कर्क** : पत्नी पतीमध्ये संवाद आनंदमय राहील.
**सिंह** : दिवसाची सुरुवात उत्तम, नंतर चिंता.
**कन्या** : हळू हळू कामास वेग येईल.
**तुला** : सुरुवात उत्तम, वेग नंतर संथपणा.
**वृश्चिक** : कुणाचाही विचार न करता आपलाच विचार करावा.
**धनू** : जसे कार्य कराल तशीच प्रचिती येईल.
**मकर** : उगाचच मोठेपणा मिरवू नका.
**कुंभ** : सर्व काही वैयक्तीक चांगले.
**मीन** : नाराजी कुणाची स्विकारु नका.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु.पो. रावेर, जि. जळगाव, मोबा. ९८५००१५५५८**

## थोडक्यात महत्त्वाचे...

### मुंबई संघाचा कर्णधार पिंपरुडचा आरूष कोल्हे



**फैजपूर** : आरूष सचिन कोल्हे याची मुंबई क्रिकेट संघाचे १४ वर्षाखालील संघाचे कर्णधारपदी निवड झाली आहे. आरूष कोल्हे हा डॉ. सुधाकर गोपाळ कोल्हे (मु. पिंपरुड, ता. यावल, ह. मु. महाड), तसेच पी. एन. पाटील (सावदा, ह. मु. शहापूर) यांचा नातू असून त्याने मुंबईचे दिलीप वेंगसरकर अकॅडमी मधून प्रशिक्षण घेतले आहे

क्रिकेटचे गेली ८ ते ९ वर्ष महाड मध्ये धडे गिरवणाऱ्या आरूषची मेहनत व खेळातील सातत्य कमालीचे असून त्याच्या आई वडिलांचे मिळणारे प्रोत्साहन यामुळे त्याला यश मिळत आहे. त्याच्या या निवडीबद्दल सर्वत्र त्याचे कौतुक होत असून एसबीसी क्रिकेट अकॅडमीचे कोच आवेश चिचकर यांनी कौतुक केले आहे.

### डॉ. उज्जैनकर यांना राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार



**मुक्ताईनगर** : शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगरचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण मधुकर उज्जैनकर यांची नुकताच भारत सरकार आणि निती आयोग नोंदणीकृत ग्राहक सेवा सामाजिक बहुउद्देशीय संस्था संचलित ग्राहक रक्षक समिती तर्फे सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राष्ट्रीय समाज रत्न पुरस्कारसाठी निवड करण्यात आली, ग्राहक रक्षक समितीच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.आशा पाटील, नाशिक यांच्यातर्फे करण्यात आली असून ८ फेब्रुवारी रोजी सेलिब्रिटा हॉटेल, नाशिक येथे मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. राष्ट्रीय समाज रत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनच्या विविध जिल्ह्यातील तसेच गोवा व कर्नाटक, मध्य प्रदेश राज्यातील पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

### सुनसगाव उपसरपंच सपकाळे देणार राजीनामा

**भुसावळ** : तालुक्यातील सुनसगाव येथील रहिवासी ग्रामस्थांना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ सहजासहजी मिळत नसून, उपसरपंच पदावर असूनही गरजू नागरिक लाभापासून वंचीत रहात आहे. त्यामुळे सुनसगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच एकनाथ फूलसिंग सपकाळे हे उपसरपंचपदाचा राजीनामा देण्याच्या पावित्र्यात आहेत. सुनसगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच एकनाथ फुलसिंग सपकाळे यांनी उपसरंपच पदाचा राजीनामा देणार असल्याचे प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे. सुनसगाव ग्रामस्थांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याची व्यथा त्यांनी मांडली होती. याचा पाठपुरावा शासन दरबारी केल्यानंतर उपसरपंच पदावर असूनदेखील गरजू ग्रामस्थांना न्याय मिळत नाही. त्यामुळे उपसरपंच पदाचा राजीनामा देणार असल्याचे म्हटले आहे. लवकरच यासंदर्भात ग्रामपंचायतीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आणणार असल्याचे उपसरपंच सपकाळे यांनी सांगितले आहे. एकीकडे ग्रामपंचायत कार्यालयाची आयएसओ प्रणालीकडे वाटचाल सुरू असताना उपसरपंच यांच्या राजीनामाच्या पत्राने खळबळ उडाली असून नेमके राजीनामा देण्याचे कारण जनते समोर लवकरच येणार असल्याची चर्चा आहे.

### महात्मा गांधी विद्यालयात शैक्षणिक साहित्य वितरण

**भुसावळ** : वरणगाव शहरातील महात्मा गांधी विद्यालयात माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. तसेच विविध शालेय उपक्रमांत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय समितीचे चेअरमन चंद्रकांत बढे, संस्थाध्यक्ष वंदना पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून रमण सायन्स टेक्नॉलॉजी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.चंद्रम ाऊली जोशी, भुसावळ येथील हृदयरोगतज्ज्ञ डॉ.राजेश मानवतकर, बालरोगतज्ज्ञ डॉ.पंकज राणे, सर्जन डॉ.वीरेंद्र झांबरे तसेच नांदेड येथील कार्यकारी अभियंता शैलेंद्रकुमार भंगाळे यांच्यासह संचालक मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांना भौमितिक रचना व गणिती संकल्पना अधिक सुलभरीत्या समजण्यासाठी सुमारे ४० शैक्षणिक उपकरणे शाळेस भेट देण्यात आली. गणित व विज्ञान विषयांमध्ये गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने १९९८ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी गणित व विज्ञान पार्क उभारण्याचा संकल्प केला असून या साहित्याचे उद्घाटन करण्यात आले. या संपूर्ण उपक्रम ासाठी सतीश मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.



### तापी पब्लीक स्कुलमध्ये १० वीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**भुसावळ** : येथील तापी पब्लिक सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूलच्या दहावीच्या विद्यार्थ्यांना शनिवारी निरोप देण्यात आला. पुढील महिन्यात परीक्षा असून अभ्यास करून जास्तीत जास्त गुण मिळवून उत्तीर्ण होऊन शाळेचे व परिवाराचे नाव उज्ज्वल करा. व पुढील वाटचालीसाठी प्रिंसीपल निना कटलर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी व्हाईस प्रिंसीपल श्रद्धाली घुले, मनप्रीत कौर, हर्षला चौधरी, रितू प्रभुदेसाई, वर्षा काळे, प्रतिभा काकडे, शेख कय्युम आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी एकमेकांना शुभेच्छा देऊन निरोप दिला. सूत्रसंचालन सोफीया पिबॉडी यांनी केले. आभार श्रद्धाली घुले यांनी मानले.

### राजोरा येथे महाराष्ट्र लेवा पाटीदार महासंघाची बैठक

**भुसावळ** : सतपंथ मंदिराच्या आध्यात्मिक परिसरात राजोरा येथे ग्रामस्थांतर्फे महाराष्ट्र लेवा पाटीदार महासंघाची बैठक पार पडली. मान्यवरांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र लेवा पाटीदार महासंघाचे अध्यक्ष अरुण बोरोले, ज्येष्ठ सल्लागार डॉ. प्रमोद महाजन, कोषाध्यक्ष डॉ. मिलिंद पाटील, व्यसनमुक्ती कार्यकर्ते दिलीप बडगुजर, प्राचार्य एन.एस.राणे, राजोरे सरपंच पुष्पा पाटील, ग्राम पंचायत सदस्य सुवर्णा महाजन, चेतन पाटील, अट्रावल राम मंदिर अध्यक्ष हेमचंद्र खाचणे, मधुकर नारखेडे उपस्थित होते. महासंघाचे सल्लागार डॉ. प्रमोद महाजन, दिलीप बडगुजर यांनी व्यसनमुक्ती विषयी जनजागृती केली. डॉ. मिलिंद पाटील यांनी गणबोली भाषेत संवाद साधला. प्रा .डॉ. डी. एस. राणे, अध्यक्ष अरुण बोरोले यांनी महासंघाची भूमिका विशद केली. २५ जानेवारी रविवार रोजी 'सकल लेवा पाटीदार युवती व महिला यांचे राज्यव्यापी अधिवेशन' होणार असून लेवा पाटीदार महिलांसाठी हे पहिले अधिवेशन आहे. सूत्रसंचालन मयूर महाजन यांनी केले. कल्पेश पाटील, प्रदीप पाटील, किशोर पाटील, युवराज पाटील यांनी परिश्रम घेतले.

# नगरपरिषद दप्तर विभागाच्या स्थलांतरावरून राजकिय रणकंदन

## भाजप गटनेते युवराज लोणारी यांचा प्रखर विरोध

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १७ जानेवारी**

भुसावळ नगरपरिषदेत नवनिर्वाचित सत्ताधारी नगरसेवकांकडून दप्तर विभाग संत गाडगेबाबा रूग्णालयात स्थलांतरित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यासाठी आवश्यक ठराव, निविदा प्रक्रिया वा परवानगी घेण्यात आलेली नाहीत. या स्थलांतराला भारतीय जनता पक्षाचे गटनेते युवराज लोणारी यांनी प्रखर विरोध दर्शविला. या स्थलांतरावरून राजकिय रणकंदन पेटले असून सर्वसामान्यांच्या आरोग्य सेवेवर परिणाम होईल असा मुद्दा उपस्थित करत लोणारी यांनी सत्ताधाऱ्यांना विरोध केला आहे.

नवनिर्वाचित नगरसेवक संतोष चौधरी यांनी विद्यमान नगरपरिषद इमारतीला 'कोंडवाडा' असे सांगत जर्जर अवस्था समोर आणली होती. याच मुद्यावरून भाजप गटनेते युवराज लोणारी यांनी 'ही इमारत कोंडवाडा असेल, तर या कोंडवाड्यात गोरगरीब रूग्णांना उपचारासाठी दाखल करणार का? असा प्रश्न सत्ताधाऱ्यांसमोर उपस्थित केला आहे.



'नगरपरिषदेच्या दप्तर आणि कारभाराला रूग्णालयात हलवण्याच्या नावाखाली जनतेच्या आरोग्य सेवेशी खेळ होत असून या प्रक्रियेवरून सत्ताधाऱ्यांच्या हेतूवरच लोणारी यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. संत गाडगेबाबा रूग्णालयात भूलतज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याने महिलांची प्रसूतीसारख्या महत्त्वाच्या वैद्यकीय सेवा नाहीत. शहराच्या मध्यवर्ती भागात जनतेच्या आरोग्य सेवेसाठी गरूड परिवाराने जागा दान केली होती. या पार्श्वभूमीवर लोणारी यांनी 'भूलतज्ज्ञ व इतर आवश्यक वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध करून देणे ही नगराध्यक्ष आणि सत्ताधारी यांची प्राथमिक जबाबदारी आहे. त्याऐवजी दप्तर स्थलांतरित करण्याच्या नाटकातून जनतेच्या आरोग्याशी खेळणे योग्य नसल्याचे सत्ताधारी आणि नगराध्यक्षांची जबाबदारी असल्याचे सांगितले.

''नगरपरिषद नवीन इमारत बांधकामासाठी २५ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून नवीन नगरपरिषद बांधण्यासाठी प्रयत्न करा, त्यासाठी मंत्री सावकारे यांच्या माध्यमातून कायम पाठिंबा राहील. मात्र, या स्थलांतर प्रक्रियेवरून जिल्हाधिकारी जळगाव यांची पूर्व परवानगीनंतरच स्थलांतराची प्रक्रिया राबविण्यात यावी. तसे न करता नगरपरिषदेचे दप्तर उचलल्यास दप्तर गहाळ होण्याची शक्यता असून ही कृती अनधिकृत असून कायद्याच्या कक्षेत येऊ शकते,'' असे लोणारी यांनी सांगीतले.

यावरून भुसावळ नगरपरिषदेत राजकीय वातावरण तापले असून, सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार शाब्दिक चकमकी सुरू झाल्या आहेत. शहरातील नागरिकांनी या प्रकरणात पारदर्शकता आणि जनतेच्या हिताचा विचार करण्याची मागणी केली आहे. पुढील काही दिवसांत या स्थलांतर प्रक्रियेवर जिल्हाधिकाऱ्यांकडून कोणती कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत उपनगराध्यक्षा शैलैजा पुरूषोत्तम नारखेडे, उपगटनेते परीक्षीत बऱ्हाटे, नगरसेवक पिंटू कोठारी, राजेंद्र आवटे, प्रकाश बत्रा, विशाल नाटकर, गिरीश म हाजन, सुजित भोळे, किरण कोलते आदी उपस्थित होते.



## मध्य प्रदेशातील फरार संशयीताचा भुसावळमध्ये शोध

### पाच पोलीस जखमी, बारा जणांविरूद्ध गुन्हा दाखल

**भुसावळ** : शहरातील बडी खानका, मुस्लिम कॉलनी परिसरात तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे संशयित आरोपीच्या शोधार्थ बळोद पोलीस स्टेशन जिल्हा अगर (म ध्यप्रदेश) पोलिसांनी भुसावळ बाजारपेठच्या प्रशांत सोनार, हर्षल महाजन या दोघां पोलिसांच्या मदतीने आरोपी करार अली हुजुर अली याचा शोध घेण्यसाठी गेले असता तेथील इराणी महिला व पुरुषांनी पोलीस कर्मचाऱ्यांवर रात्रीच्या सुमारास हल्ला केला. यात पाच पोलीस कर्मचारी जखमी झाले असून पोलीस स्टेशनला बारा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मध्यप्रदेश राज्यातील जिल्हा अगर, बळोद पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल गुन्ह्यातील संशयित आरोपी करार अली हुजुर अली याचा शोध घेण्यासाठी भुसावळ शहरातील खडका चौफुली येथे पोलीस उपनिरीक्षक जोरावर सिंह बन्सीलाल सिसोदिया, राहुल मोहनलाल विश्वकर्मा, आकाश सुरेश टेकाम, शुभम जोशी व बाजारपेठ ठाण्याचे प्रशांत सोनार व हर्षल महाजन आदि तपासासाठी गेले होते. तेथे संशयित आरोपी हा मुस्लीम कॉलनी परिसरातील पाण्याची टाकी जवळ जुलफोकार अली बाबर उर्फ इराणी याने घेतलेल्या भाड्याचे घरात असल्याची माहिती मिळाली. व त्या ठिकाणी अतिरीक्त पोलीस पथकाची आवश्यकतेनुसार पो. कॉ. हर्षल महाजन यांनी अतिरीक्त पोलीस पथक पोलीस निरीक्षक राहुल वाघ, विजय नेरकर, रमण सुरळकर, रवींद्र भावसार, महिला पोलीस कर्मचारी सीमा चौधरी, मिनाक्षी घेटे, सोपान पाटील, अमर अढाळे, भूषण चौधरी, योगेश माळी, महेंद्र पाटील असे पथक उपस्थित होते. यावेळी संशयीत आरोपीस ताब्यात घेण्यासाठी विरोध करणाऱ्या जमावावर सौम्य बळाचा वापर करीत करार अली हुजुर अली यास पोलीस पथकाने ताब्यात घेतले. शुभम म ुकेश जोशी (नेमणूक बळोद पोलीस स्टेशन जिल्हा अगर, मध्यप्रदेश) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बाजारपेठ पोलीस स्टेशनला बारा संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महानगरपालिका निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी महायुतीचा विजय : फैजपूरात जल्लोष

**तभा वृतसेवा**
**फैजपूर, १७ जानेवारी**

महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टी महायुतीला ऐतिहासिक यश मिळाले. या यशाचा जल्लोष फैजपूरच्या सुभाष चौकात फट्याक्यांची आतषबाजी करीत जयघोष करण्यात आला. याप्रसंगी स्वातंत्र्यसेनानी सुभाषचंद्र बोस व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला



याप्रसंगी भाजप प्रदेश सदस्य हिरालाल चौधरी, माजी तालुका सरचिटणीस विलास चौधरी, किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष नितीन राणे, सिनेट सदस्य नरेंद्र नारखेडे, माजी नगराध्यक्ष पिंटू राणे, माजी सभापती डॉ. नरेंद्र कोल्हे, महिला जिल्हा उपाध्यक्ष भारती पाटील, उपनगराध्यक्ष निकिता कोळी, भाजप गटनेता सिद्धेश्वर वाघुळदे, नगरसेवक पवन सराफ, सुरज गाजरे, सागर होले, महेंद्र मंडवाले, राहुल गुजराथी, नगरसेविका जयश्री चौधरी, समाजसेवक चंद्रकांत कोळी, अनंता नेहते, जितेंद्र भारंबे, संदीप भारंबे, माजी उपनगराध्यक्ष राकेश जैन, माजी नगरसेवक संजय रल, फैजपूर मंडळ सरचिटणीस पिंटू तेली, किशोर वाणी, अमोल वारके, सरचिटणीस संजय सराफ, रामा होले, पंकज बऱ्हाटे, रशीद तडवी, वसीम तडवी, संजय रल, शेख शाकीर, शिवसेना शहर अध्यक्ष पिंटू मंडवाले, कैलास भोई, प्रदीप मंडवाले, पप्पू वैद्य, अतुल कापडे, विलास तेली, नीलेश चौधरी, राजाभाऊ चौधरी, करनसिंग परदेसी, विनोद मंडवाले, भूषण भोई, जीवन मंडवाले व आदी भाजप कार्यकर्ते व फैजपूर मंडळ कार्यकारणी सदस्य उपस्थित होते

## महिला सक्षमीकरणासाठी विचारांची क्रांती आवश्यक

### कुऱ्हा येथे महिला सक्षमीकरण अंतर्गत व्याख्यान - डॉ. राजेश राजोरे

**कुऱ्हा (ता. मुक्ताईनगर)** : येथे प.पू. माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी सार्वजनिक संस्था कुऱ्हा येथील कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात मिशन साहसी अभियान अंतर्गत डॉ. राजेश राजोरे यांच्या महिला सक्षमीकरण व महिलांचा व्यक्तिमत्व विकास या विषयावर व्याख्यान पार पडले.



यावेळी कार्यक्रम अध्यक्ष प्रमोद शिवलकर, उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र फडके, सचिव भालचंद्र कुलकर्णी, कोषाध्यक्ष प्रल्हाद बढे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अशोक कांडेलकर, शांताराम कांडेलकर, प्राचार्य डॉ. पी. व्ही. पिंगळे आदी मान्यवरांच्या हस्ते कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मिशन साहसी उपक्रमाचे उद्दिष्ट व महाविद्यालयाचे विविध उपक्रमाची माहिती प्रास्ताविकात प्रा. सचिन जोशी यांनी दिली. शिक्षण, आत्म विश्वास, आर्थिक स्वावलंबन आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचे महत्त्व म हिला सक्षमीकरणाची संकल्पना स्पष्ट करताना संपादक डॉ. राजेश राजोरे यांनी महिलांनी केवळ नोकरीपुरते मर्यादित न राहता नेतृत्व, संशोधन, उद्योजकता व सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत सक्रिय सहभाग घ्यावा, असे सांगितले. महाविद्यालयाचा वार्षिकांक तेजोमयचे प्रकाशन प्रमोद शिवलकर सह आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रा.साक्षी कुलकर्णी यांनी आभार मानले. प्रा.म नोज वाघ, प्रा. जितेश कुलकर्णी, प्रा. मनोज न्हावी, प्रा. भावना कापसे, प्रा. प्रतीक शेमरे, प्रा गोपाल सोनवणे, प्रा.कविता पर्वते, प्रा. अमोल नाफडे, प्रा.वृषाली शिमरे, प्रा. योगिता पाटील, गजानन गलवाडे, गजानन बिल्लेवार, प्राध्यापक व कर्मचारी, विद्यार्थिनी आदी उपस्थित होते.



## हभप कन्हैया महाराज राजपूत 'वारकरी अलंकार' पुरस्काराने सन्मानित

**फैजपूर** : फैजपूर शहरात प्रति ३ वर्षातून साजरा होणारा वैकुंठवासी हभप नथ्थुसिंग राजपूत दौरा मंडळ अंतर्गत सामुदायिक तुलसी अर्चन, विठ्ठल नाम जप, संगीतमय श्री रामायण कथा, नाम संकीर्तन २०२६ चे महोत्सवात भागवत सप्ताह समितीच्या विद्यमाने हभप कन्हैया उर्फ सुखदेव महाराज राजपूत यांना 'वारकरी भूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

वारकरी संप्रदायाचे थोर कीर्तनकार विद्वतरत्न चैतन्य महाराज देगलूरकर, मोहननाथ महाराज पैठणकर, भगवंत महाराज, उद्धव महाराज कुकुरमुंडेकर, रवींद्र महाराज हरणे, दुर्गादास महाराज नेहते, कथाकार शेलेंद्र शास्त्री, पंढरीनाथ आरु, नरेंद्र नारखेडे यांच्या हस्ते सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले

कन्हैया महाराज यांनी पंढरपूर पायी दिंडी सोहळा, संत मीराबाई मंदिर उभारणी व नथुसिंग बाबा दौरा मंडळ करिता जीवन समर्पित केले आहे. तसेच भगवन्त चौधरी यांनी वै डिंगम्बर महाराज चिनावलकर पायी दिंडी अखंडपणे विणेकरी सेवा करून पायीवारी केली असून त्यांचा गौरव समितीचे सचिव तथा निमंत्रक नरेंद्र नारखेडे यांनी पुरस्कार वितरणाचे प्रास्ताविक करताना केला.

## आदिवासी कोळी बांधवांनी मानले आमदार अमोल जावळे यांचे आभार

**यावल** : फैजपूर नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत विजयी झालेल्या नगसेविका निकीता कोळी यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाली. तसेच यावल नगरपालिकेत भाजपकडून सविता नन्नवरे या नगरसेविका म्हणून निवडून आल्या. यात आदिवासी कोळी समाजाला प्रतिनिधीत्वाची संधी दिल्याने आमदार अमोल जावळे यांचे आदिवासी कोळी जमातीच्यावतीने आभार मानत सत्कार करण्यात आला.

यावल नगरपालिकेत नगरसेविकापदी भाजपच्या उमेदवार सविता नन्नवरे तर फैजपूर नगरपालिका निवडणुकीत निकीता कोळी या देखील निवडून आल्या आहेत. राज्यात कमी वयात शिक्षणाबरोबर समाजसेवा करण्याची संधी मिळालेल्या फैजपूर नगरपालिका निवडणुकीत निवडुन आलेल्या उपनगराध्यक्ष निकीता



प्रकाश कोळी या एकमेव उपनगराध्यक्ष आहेत. फैजपूर नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी निकीता कोळी यांची निवड झाल्याबद्दल यावल तालुक्यातील आदिवासी कोळी जमातीच्या समाज बांधवानी रावेर-यावल विधानसभा मतदारसंघातील आमदार अमोल हरीभाऊ जावळे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार केला.

आदिवासी कोळी जमातीचे नेते तथा जळगाव जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रभाकर सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली प्रकाश कोळी (फैजपूर), भालोद सरपंच प्रदीप कोळी, नंदु सोनवणे (रिधुरी), संदिप सोनवणे (वढोदा), मुकेश कोळी (यावल), जालंधर कोळी, रोहिदास कोळी (पिंप्री), किरण तायडे (पाडळसा), प्रमोद सोनवणे, सुभाष सोनवणे (दुसखेडा), शिवा शेठ (कासवे), भीमा कोळी (कठोरा), सरपंच कैलास सपकाळे, नितीन सपकाळे, धनराज कोळी (अंजाळे), नाना कोळी (बोरावल), सोनु तावडे (निमगाव), विठ्ठल सूर्यवंशी संजय सूर्यवंशी (कोळवद), अंकुश महाराज (कठोरा), पंकज कोळी (सांगवी), मुकेश कोळी (पिंपरूड) आदी समाज बांधव उपस्थित होते.

### गणित ऑलिम्पियाड स्पर्धेत वेदांतिका शुक्ल सुवर्णपदकाची मानकरी



**भुसावळ** : आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाड स्पर्धेत वेदांतिका शुक्ल या विद्यार्थीनीने सुवर्णपदक प्राप्त केले आहे. आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षा २०२५-२६ चा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यात पहिल्या टप्प्यात वेदांतिका अनुप शुक्ल ही सुवर्णपदक मिळवून दुसऱ्या टप्प्यातील स्पर्धा परिक्षेसाठी पात्र ठरली आहे. वेदांतिका शुक्ल ही भुसावळ येथील प्र. ह. दलाल यांची नात आणि अमृता व अनुप शुक्ल यांची कन्या आहे. तिला गणिताची विशेष आवड असून पुढे ह्याच विषयात उच्च पदवी मिळवण्याचे ध्येय असल्याचे तीने म्हटले आहे. या यशानिमित्त तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## 'शासन आपल्या दारी' उपक्रमांतर्गत ४४५ पिंपरुड ग्रामस्थांना विविध प्रकारचा लाभ

**तभा वृतसेवा**
**फैजपूर, १७ जानेवारी**

यावल तालुक्यातील पिंपरुड ग्रामस्थांच्या विविध प्रलंबित सम स्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच शासकीय सेवांचा वेग आणि परिणाम कारकता वाढवण्याच्या हेतूने यावल - रावेरचे आमदार अमोल कल्पना हरिभाऊ जावळे यांच्या आदेशाने 'शासन आपल्या दारी' या विशेष उपक्रमाचे यशस्वी आयोजन पिंपरुड (ता. यावल) येथे करण्यात आले. या कार्यक्रमात गावातील तब्बल ४४५ ग्रामस्थांना विविध प्रकारचा लाभ देण्यात आला.



**जनतेच्या हिताचे कार्य**

पिंपरूड येथून तालुक्याच्या ठिकाणी यावल येथे तहसील कार्यालयात जाणे, कागदपत्रांचा पाठपुरावा करणे सर्वसामान्य जनतेला हा पायपिट करण्याचा त्रास होता, तेव्हा 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमाच्या माध्यमातुन जनतेच्या हितासाठी कार्य करणारे पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन प्रत्येकापर्यंत पोहोचवण्यासाठी शासन आपल्या दारी हा उपक्रम सुरू आहे.

**-आमदार अमोल जावळे.**

पिंपरूड येथील नागरीकांच्या विविध प्रलंबित समस्यांचे स्थानिक पातळीवर निराकरण तसेच शासकीय सेवा वाढवण्याच्या हेतूने नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेतांना भेडसावणाऱ्या अडचणी दूर करणे व त्यांच्या तक्रारींचे तत्काळ आणि प्रभावी निवारण करणे या करीता शासन आपल्या दारी कार्यक्रम अंमलबजावणी संदर्भात आमदार अमोल जावळे यांनी तहसीलदार मोहनमाला नाझीरकर यांचा सुचीत केले. या उपक्रमात ४४५ नागरीकांना विविध प्रकारचे दाखले देत अडीअडचणी निवारण करीत लाभ देण्यात आला. निवासी नायब तहसीलदार बी.एम. पवार,, पुरवठा अधिकारी अभिमन्यु चौधरी, संजय गांधी विभागाचे सकावत तडवी, ग्राममहसुल अधिकारी सुचिता देशभ्रदार सह प्रसंगी भारतीय जनता पक्षाचे विविध स्तरावरील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध विभागांचे शासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## रावेर तालुक्यात भूसंपादन सुनावणीत प्रांताधिकाऱ्यांनी ऐकले शेतकऱ्यांचे म्हणणे

**तभा वृत्तसेवा**
**रावेर, १७ जानेवारी**

रेल्वे तिसरी व चौथी लाईन टाकण्यासाठी रावेर तालुक्यातील एकोणावीस गाव शिवारातील ५२.३४७ हेक्टर जमीन भूसंपादन करण्याबाबत प्रांताधिकारी बबनराव काकडे यांच्या उपस्थितीत सुनावणी झाली.

रेल्वे प्रशासनातर्फे भुसावळ ते खंडवा तिसरी आणि चौथी रेल्वे लाईन भूसंपादन करण्यात येत आहे. यासंदर्भात एकूण २३० हरकती प्राप्त झाल्या होत्या. यावर ही सुनावणी घेण्यात आली. शेतकऱ्यांच्या हरकतींवर आज तहसील कार्यालयात प्रांताधिकारी बबनराव काकडे, रेल्वेचे भूसंपादन समन्वयक शंभू चौधरी यांच्या उपस्थितीत सुनावणी झाली. यावेळी प्रांताधिकारी बबनराव काकडे यांनी शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले.

भुसावळ ते खंडवा तिसरी आणि चौथ्या लोहमार्गासाठी रावेर तालुक्यातील भोकरी, सिंगनुर रेंभोटा, खिर्डी बुद्रुक, गाते, सुनोदा, निंभोरा बुद्रुक, मस्कावद बुद्रुक, तामसवाडी, अंदलवाडी, विवरे बुद्रुक, रावेर, चोरवड, वाघोड, तासखेडा, खिर्डी खुर्द, गहूखेडा, रणगांव, खानापूर असे १९ गावातील २३९ गट संख्या असलेल्या व सातबारा नुसार ३५६.०३० पैकी ५२.३४७ हेक्टर क्षेत्राचे भूसंपादन करण्यात येणार आहे.



भुसावळ ते खंडवा तिसरी आणि चौथ्या लोहमार्गाच्या भूसंपादन संदर्भात शेतकऱ्यांनी घेतलेल्या हरकतींवर आज सुनावणी करण्यात आली. यात शेतकऱ्यांनी शेताचे तुकडे पडणार असून यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. लहान तुकडे रेल्वे प्रशासनाने घ्यावेत. शेतकऱ्यांनी शेतामध्ये टाकलेल्या जलवाहिन्यांचे पाईपचे नुकसान होणार आहे. तसेच शेत वहिवाटीचे नुकसान होणार आहे. त्यानुसार नवीन वहिवाट करून मिळावी. चांगला मोबदला मिळावा यासह अनेक मुद्दे शेतकऱ्यांनी सुनावणीत व्यक्त केले आहेत.

**-बबनराव काकडे, उपविभागीय दंडाधिकारी तथा प्रांताधिकारी**

## थोडक्यात महत्त्वाचे...

### भाजप जिल्हाध्यक्ष चौधरी यांच्याहस्ते पालकमंत्री रावल यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार

**दोंडाईचा :** राज्याचे राजशिष्टाचार व पणन मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या वाढदिवसानिमित्त धुळे भाजप माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांनी दोंडाईचा येथे सत्कार करीत धुळे जिल्ह्याचे दैवत आई एकवीरादेवीच्या कृपेने आपणांस सुदृढ आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो, अशा मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी धुळे भाजप जिल्हा सरचिटणीस अरुण धोबी, भाजप अनु. जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रताप सरदार, शिरपूर भाजप शहर सरचिटणिस महेंद्र पाटील, रोहित शेटे, भाजप भटके विमुक्त आघाडी प्रदेश उपाध्यक्ष रवींद्र भोई, भाजप उद्योग आघाडी जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र राजपुत, बाराबलुतेदार महासंघ तालुकाध्यक्ष योगीराज शिंपी, सामाजिक कार्यकर्ते सिताराम थोरात आदिंनी शुभेच्छा दिल्या.

### थाळनेरच्या वडार समाजाचा वहीवाट रस्त्यासाठी संघर्ष!

**शिरपूर :** शिरपूर तालुक्यातील थाळनेर येथील वडार समाजाला वहिवाट



रस्त्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. वडार समाजाची २५ ते ३० घरांची वस्ती गेल्या ४० ते ५० वर्षापासून थाळनेर गावात कायम वास्तव्याला आहे. परंतु वडार समाजाला गावात ये-जा करण्यासाठी वहिवाट रस्ता मात्र नाही. यासंदर्भात थाळनेर ग्रामपंचायत प्रशासनाला लेखी निवेदन अर्ज देऊन देखील अद्याप वहिवाट रस्ता मिळालेला नसल्याने नायब तहसीलदार पंकजा मगर यांना धुळे जिल्हा भटक्या विमुक्त जाती जमाती भाजप आघाडी कडून निवेदन देण्यात आले. शिरपूर तालुक्यातील थाळनेर येथील वडार रहिवासी वस्तीच्या आजूबाजुला काटेरी बाभळीची झाडी झुडपे असून महिला बालकांसह अन्य नागरिकांना रात्री अपरात्री काटेरी झाडा-झुडुपांतुन वाटचाल करावी लागत आहे. वहिवाट रस्त्यासाठी थाळनेर ग्रामपंचायत शासन प्रशासनाला लेखी निवेदन देऊन, वेळोवेळी पाठपुरावा करुन देखील ग्रामपंचायतीने वडार वस्तीसाठी वहिवाट रस्ता उपलब्ध करून दिलेला नाही. प्रत्येक पंचवार्षिक निवडणुकीवेळी पदाधिकारी, सदस्य, राजकारणी वडार समाजाच्या मतांसाठी रस्ता उपलब्ध करून देऊ अशी आश्वासने देत आले असून वहिवाट रस्ता नसल्याने वडार समाजाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे चित्र आहे. नुकत्याच नगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर थाळनेर येथील वडार समाजाला रस्ता मिळावा, यासाठी यावेळी उत्तर महाराष्ट्रचे भटक्या आघाडीचे अध्यक्ष बधूलाल राठोड, शिरपूर वरवाडे नगरपरिषदचे नवनिर्वाचित नगरसेवक बाबा गोसावी, धुळे जिल्हा अध्यक्ष राजु सूर्यवंशी यांच्यातर्फे शिरपूरच्या नायब तहसीलदार पंकजा मगर यांना निवेदन देण्यात आले. शासनातर्फे वडार समाजाला योग्य तो न्याय देण्यात येईल, असे आश्वासन नायब तहसीलदार मगर यांनी दिले आहे.



### वरवाडे परिसरात सिकलसेल तपासणी अभियान

**शिरपूर :** शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग व जिल्हा परिषद आरोग्य विभाग जिल्हातर्फे अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानांतर्गत तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्नकुमार कुलकर्णी व यूपीएचसीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. बत्रा यांच्या मार्गदर्शनात वरवाडे परिसरात महात्मा फुले पुतळ्याजवळील शाळा क्रमांक ६ व ९ मध्ये तपासणी व उपचार शिबिर झाले. प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी नितीन अशोक महाले, अधिपरिचारिका अमृता चव्हाण, भावना पाडवी, आरोग्यसेवक सुयोग महाजन, पंकज मराठे यांचे सहकार्य लाभले. नगरसेवक भालेराव माळी, माजी नगरसेवक संतोष माळी, श्री म्हाळसादेवी मंदिर ट्रस्टचे उपाध्यक्ष युवराज माळी, विश्वास माळी, शाळेचे व्यवस्थापक अध्यक्ष मोहन चौधरी आदी प्रमुख पाहुणे होते. शिबिरात रुग्णांची रक्तदाब तपासणी करण्यात आली. सर्वसाधारण रक्तदाब तपासणी व सिकलसेल आजाराची विशेष तपासणी करण्यात आली. रुग्णांना गरजेनुसार फॉलिक ॲसिड व हायड्रॉक्सियुरिया ही औषधी वितरित करण्यात आली. वैशाली बुवा, रूपाली बुवा, कविता सोनवणे, संगीता बारी यांचे विशेष सहकार्य लाभले.




### मेथी येथे अहिल्यादेवी यात्रोत्सव

**मेथी :** खानदेशातील महत्वपूर्ण व धुळे तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या बोरीस येथील सती अहिल्यादेवी मंदिर प्रसिद्ध आहे, भक्तांसाठी एक महत्त्वाचे धार्मिक केंद्र असून सती देवीचा यात्रोत्सव १७ जानेवारीपासून होत असून ग्रामपंचायत व मंदिर प्रशासनातर्फे तयारी झाली आहे. या यात्रोत्सवात महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात राज्यातील व्यावसायीक दाखल झाले आहेत.

यात्रेसाठी मंदिर परिसर ग्राम पंचायतीतर्फे व सतीदेवी ट्रस्टतर्फे स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यात्रेसाठी परिसरातील कापडणे, धनूर, लोणकुटे, विश्वनाथ, सुकवड, न्याहळोद, कौठळ, तामसवाडी, हेकळवाडी, धमाणे, देवभाने, सरवड, सोनगीर, सायने, नंदाणे, बुरझड, मेथी, वरझडी आदी गावांमधून यात्रेच्या एक दिवस आधी भाविक पायी येऊन आपला नवस फेडतात. बोरीस गावातील ग्रामस्थांच्यावतीने विविध ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

**सोनगीर पोलिसांचा बंदोबस्त**

बोरीस यात्रोत्सवात कोणताही गैरप्रकार घडू नये, म्हणून सोनगीर पोलिसांचा चोवीस तास पहारा असून पोलीस मदत केंद्र उभारण्यात आले आहे. यात्रोत्सवात येणाऱ्या महिलांनी दागिन्यांची काळजी घ्यावी, असे आवाहन सोनगीर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक तुषार देवरे यांनी केले आहे.

> **खर्च वाढतो, मात्र नफा फारसा नसतो**
>
> या यात्रेत हॉटेल थाटण्यासाठी साहित्य वाहतूक, तेल, बेसन, गूळ, साखर, आदी खर्च खूप वाढला आहे. पूर्वी मजूर सहज मिळायचे. आता जास्तीचे पैसे देऊनही मजूर मिळत नाहीत, वडिलोपार्जित व्यवसाय असल्याने काहीतरी नफा मिळेल या आशेने यात्रेत हॉटेल्स थाटली जातात. मात्र बोरिस यात्रा समाधानकारक असते.
>
> **-दिनेश जयस्वाल, हॉटेल व्यावसायिक**

## ‘पुस्तक वाचा, भविष्य घडवा’ च्या जयघोषात ग्रंथोत्सवाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १७ जानेवारी**

‘पुस्तक वाचा, भविष्य घडवा’, ‘पुस्तक वाचा, आयुष्य घडवा’, ‘पुस्तकाशिवाय प्रगती नाही’ च्या जयघोषात शिरपूर येथे ग्रंथोत्सवाचे उद्घाटन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धुळे, शिरपूर एज्युकेशन सोसायटी, शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय धुळे ग्रंथोत्सवाचे उद्घाटन आर.सी.पटेल कॉलेज फार्मसी कॅम्पस, शिरपूर येथे पार पडले.

यावेळी आमदार काशिराम पावरा, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी जगदिश पाटील (धुळे), अनिल बाविस्कर (छत्रपती संभाजीनगर), चंद्रशेखर ठाकुर (जालना), अहिराणी साहित्यिक सुभाष अहिरे, उपनगराध्यक्षा संगीता देवरे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ.तुषार रंधे, सहायक ग्रंथालय संचालक सचिन जोपुळे, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे



उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या सचिव रेशा पटेल, नाशिक विभागीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रा. डॉ.दत्ता परदेशी, धुळे जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष अविनाश भदाणे, शिरपूर एज्युकेशन सोसायटी, शिरपूर विश्वस्त बबनलाल अग्रवाल, अतुल भंडारी आदी उपस्थित होते.

**मान्यवरांच्या हस्ते ग्रंथदिंडीपूजन**

ग्रंथोत्सव शुभारंभ ग्रथदिंडीने आर.सी. पटेल मुख्य इमारत येथे शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथपुजनाने करण्यात आला. या ग्रंथदिंडीत विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी टाळ, मृदृगांसह, लेझिम नृत्य सादर केले. या ग्रंथदिंडीत विद्यार्थ्यांसह संयोजन समितीचे सदस्य व विविध शाळा, महाविद्यालयांचे शिक्षक, नागरिक, साहित्यप्रेमी, ग्रंथप्रेमी सहभागी झाले होते. आमदार पावरा, ग्रंथालय संचालक गाडेकर, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष भंडारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

**उत्कृष्ट वाचनालयांचा सत्कार**

यावेळी मान्यवराच्या हस्ते ‘अ’ वर्ग वाचनालय श्री.छत्रपती शिवाजी वाचनालय,साक्री, ‘ब’ वर्ग वाचनालय अण्णासाहेब र.रा.टोणगावकर ग्रंथालय, दोंडाईचा, ‘क’ वर्ग वाचनालय श्रीमती भीमाबाई बाजीराव माळी सार्वजनिक ग्रंथालय,शिरपूर, तसेच ‘ड’ वर्ग वाचनालय कै.कुसूमबाई बाळकृष्ण वाणी सार्वजनिक वाचलनालय, बाळापूर (ता.जि.धुळे) या उत्कृष्ट वाचनालयांचा सत्कार करण्यात आला. तसेच वृषाली ठाकरे, संदेश हजारे, जी.एस.देवरे, सखाराम रोकडे या उत्कृष्ट वाचकांचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे जयपालसिंह गिरासे, प्रा.भास्कर खैरनार, डॉ.युवराज पवार, कवी अन्सारी अमेराह जमीर, भूमिका गर्ग, रितेश मिश्रा, डॉ. रजीनकांत सोनार या लेखक व कवींचा सत्कार करण्यात आला.

**ग्रंथोत्सवाचा आज समारोप**

रविवार, १८ जानेवारी रोजी सकाळी ‘ए.आय. युगातील वाचन- सवय आणि समज, ए.आय वाचन संस्कृती’ या विषयावर परिसंवाद कार्यक्रमाचे अध्यक्ष लेखक एम.के.भामरे, प्रताप महाविद्यालयाचे डॉ. नितीन पाटील, शिक्षण तज्ज्ञ डॉ. महेश पंडित, प्राध्यापक रुईया, मुंबई डॉ. विकी गायकवाड, ‘कथाकथन’चा कार्यक्रम अध्यक्ष अहिराणी कथाकार प्रवीण माळी, क-कवितेचा हा बहुभाषिक कवी संमेलन अध्यक्ष जगदिश देवपूरकर, रावसाहेब कुवर, बाळु श्रीराम, प्रवीण पवार, राजेंद्र जाधव, के.बी. लोहार, माया साळुंखे, दत्तात्रय कल्याणकर, चंद्रशेखर कासार, गुलाब मोरे, अरविंद भामरे, शामल पाटील, कमलेश शिंदे, शिल्पा जैन, यशवंत निकवाडे, ज्योत्स्ना पवार, कुसूम चौधरी, आनंद देशमुख, नागोराव डोंगरे, संजय धनगवाड, सुजित राजपूत हे कवी सहभागी होणार आहे. ग्रंथोत्सवाचा समारोपाचा कार्यक्रम सायंकाळी शिरपूर-वरवाडे नगर परिषदेचे नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यावेळी तहसीलदार महेंद्र माळी, जिल्हा कोषागार अधिकारी प्रवीण पंडित, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील सोनार, पोलीस निरीक्षक किशोर परदेशी, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे सी.ई.ओ उमेश शर्मा हे उपस्थित राहणार आहे.

## माजी महापौर प्रदीप कर्पे यांच्या घरावर जमावाचा हल्ला; तीन जखमी

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १७ जानेवारी**

शहराचे माजी महापौर प्रदीप कर्पे यांच्या घरावर शुक्रवारी रात्री जमावाने अचानक हल्ला केल्याची घटना घडली. यात लाकडी दांडक्यांसह चाकुचा वापर करण्यात आल्याने प्रदीप कर्पे यांचा नाशिक येथून आलेल्या नातलगासह तीन जण जखमी झाले आहेत.

दरम्यान, या प्रकरणी आझादनगर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविण्यात आली असल्याची माहिती माजी महापौर प्रदीप कर्पे यांनी दिली आहे.

मनपा निवडणूक निकालानंतर प्रदीप कर्पे यांचे सुपुत्र प्रतीक हे विजयी मिरवणूक संपवून कुटुंबासह बाहेर गेले असतांना रात्री उशिरा घरी आले. त्यानंतर अचानक हातात काठ्या लाठ्या, शस्त्रे घेऊन ८ ते १० जणांचा जमाव त्यांच्या घरावर चालून आला. जमावाने घरातील महिला - पुरुषांना मारहाण करण्याचा प्रयत्न केला. यावेळी नाशिक येथून आलेल्या कर्पे यांचा नातलग असलेल्या तरूणावर जमावातील एकाने चाकू हल्ला केला. तसेच इतर दोघांनाही मारहाण करण्यात आली, असा आरोप प्रदीप कर्पे यांनी केला आहे. जखमींना शहरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी आझादनगर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली असून, गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

> **हल्लेखोरांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी!**
>
> माझा मुलगा प्रतीक हा मनपा निवडणुकीत भाजपतर्फे प्रभाग क्रमांक १२ मधून निवडून आला आहे. रात्री आम्ही बाहेरगावाहून उशिरा घरी आलो. यादरम्यान, आम्हाला भेटण्यासाठी आलेले नातलग आणि इतर दोघे असे तिघे घरी असताना अचानक काही समाजकंटक घरावर चाल करून आलेत. यावेळी त्यांनी जोरजोरात आरडाओरड करून आम्हाला शिवीगाळ केली. तसेच घरी असलेल्या नातलगासह तिघांवर चाकूने वार केले. ह्या जखमींना शहरातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. ज्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी हा हल्ला केला त्यांच्यावर पोलिसांनी कठोर कारवाई केली पाहिजे.
>
> **- प्रदीप कर्पे, माजी महापौर, धुळे**

## लाच घेतांना महिला मुख्याध्यापिका एसीबी पथकाच्या जाळ्यात

**धुळे :** पदोन्नतीच्या बिलाच्या फरकाचे बिल तसेच पूर्णवेळ ग्रंथपाल पदावर रुपांतर झाल्याच्या पगाराचा फरक अदा करण्यासाठी लाच स्वीकारणाऱ्या मुख्याध्यापिकेस रंगेहाथ अटक करण्यात आली.

येथील साक्री रोडवरील स्व. सुदाम पिंगळे मेमोरिअल ट्रस्ट धुळे संचलित श्रीमती शांताबाई पिंगळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ही घटना घडली. तक्रारदार हे श्रीमती शांताबाई पिंगळे विद्यालयात पुर्णवेळ ग्रंथपाल पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या सेवेस २४ वर्षे पूर्ण झाल्यानंतरचे कालबध्द पदोन्नतीच्या बिलाच्या फरकाची रक्कम तसेच त्यांचे पूर्णवेळ ग्रंथपाल पदावर उन्नयन रुपांतर झाल्याच्या पगाराचा फरक त्यांना अदा करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे तक्रारदार यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका यांची भेट घेतली. यावेळी मुख्याध्यापिका यांनी सदरची बिले अदा करण्यासाठी तसेच त्यांचे नियमित पगाराचे बिल आकारण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे २५०० रुपये लाचेची मागणी केली. याबाबत तक्रारदार यांनी १३ जानेवारी रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात तक्रार दिली होती. त्यानुसार पथकाने तक्रारीची पडताळणी करून सापळा रचला. मुख्याध्यापिका यांना २३४० रुपये लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला




## आर्थिक सक्षमीकरणासाठी शिंदखेडा आगारात इंधन बचत मोहीम

**शिंदखेडा :** राज्य परिवहन महामंडळाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि वाढते पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी शिंदखेडा आगारात ‘इंधन बचत मासिक कार्यक्रम’ मोहिमेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

राज्य परिवहन विभागांतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक आगारात इंधन बचत मोहीम उपक्रम राबविला जात आहे. शिंदखेडा आगारात ‘इंधन बचत मासिक कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे अमोल मराठे, शैक्षणिक संकुल प्राचार्य एन. डी.मराठे, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्रजापिता ब्रम्हकुमारी उषा दिदी, डॉ.मुकेश कोळी, धुळे विभागाचे स्थापत्य अभियंता विनायक वळवी व आगार व्यवस्थापक योगेश्वर शिवदे आदी उपस्थित होते.

‘गाडीची सरासरी केपीटीएल फक्त चालकावर अवलंबून नसते, तर ती यांत्रिक स्थितीवर असून क्लच रायडिंग टाळणे तसेच योग्य गिअर आणि टायरमधील हवा प्रमाणित आदीवर लक्ष दिल्यास इंधन वाचते. बस सिग्नलला उभी असताना किंवा बसस्थानकावर इंजिन बंद ठेवल्यास वर्षाकाठी लाखो रुपयांची बचत होऊ शकते. तसेच शिंदखेडा आगाराने या महिन्यात इंधन वापरामध्ये १० टक्के कपात करण्याचे उद्दिष्ट असून जीवनवाहिनी आर्थिकदृष्ट्या सक्षमतेसाठी डिझेलची बचत आवश्यक आहे. इंधन बचत ही केवळ पैशांची बचत नसून ती राष्ट्रनिर्मितीला तसेच पर्यावरणाला दिलेला हातभार आहे,’’ असे यावेळी अमोल मराठे, कार्यक्रमाचे अध्यक्ष आगार प्रमुख योगेश्वर शिवदे यांनी तांत्रिक बाजूवर भर देत सांगितले.

प्रजापिता ब्रम्हकुमारी उषा दिदी, यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन कार्यशाळा कर्मचारी जगदीश पवार केले. वरिष्ठ लिपिक वंदना खैरनार यांनी आभार मानले.

यावेळी आगार पर्यवेक्षकिय कर्मचारी तृष्णा सोनवणे, राकेश पवार, दिनेश चाळसे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विनोद धनगर, धनंजय आखाडे, अधिकार पाटील, शरद पवार, मयूर पाटील, मनोज बाविस्कर, ज्ञानेश्वर वाघ, शीतल देवरे, सतीश तावडे, रवींद्र माळी, हिम्मत चौधरी, विजय चौधरी, सुभाष भिल आदींनी परिश्रम घेतले. कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी, चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी उपस्थित होते.

## महानगरपालिका निवडणुकीचा धुळे ग्रामीणमध्ये आनंदोत्सव

### आमदार राम भदाणे यांच्याहस्ते विजयी नगरसेवकांचा सन्मान

**धुळे :** महानगरपालिका निवडणुकीत भाजपने निर्विवाद मिळविलेल्या विजयाचा जल्लोष धुळे ग्रामिणमध्ये मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. यावेळी आमदार राम भदाणे यांच्याहस्ते विजयी नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.



धुळे महानगरपालिका निवडणुकीत शहरवासियांनी भाजपला मोठे बहुमत दिले आहे. चौऱ्याहत्तरपैकी पन्नास जागांवर उमेदवार निवडून आले असून विजयात धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांनी प्रचारासाठी आणि थेट मतदारांपर्यंत संपर्क साधत भाजपची भूमिका पोहचविली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सक्षम नेतृत्व, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री जयकुमार रावल यांचे कुशल मार्गदर्शन, आमदार अनुप अग्रवाल यांच्यावर जनतेचा असलेला सार्थ विश्वास आणि विकासासाठी अविरत प्रयत्न यामुळेच हे घवघवीत यश मिळाले असल्याचे आमदार भदाणे यांनी सांगितले,

यावेळी जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, आमदार राम भदाणे, माजी सभापती प्रा. अरविंद जाधव, भाजपचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब भदाणे, संघटन सरचिटणीस भाऊसाहेब देसले, आशुतोष पाटील, डॉ. दिनेश माळी, जिल्हा परीषदेचे माजी सदस्य शंकर खलाणे, छोटू मासुळे, ज्ञानेश्वर पाटील आदी सहभागी झालेत.




## श्री शिवाजी हायस्कूल अन् कनिष्ठ महाविद्यालयाचा गाईड शिबिराचा समारोप

**नवापूर :** येथील श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातर्फे एक दिवसीय गाईड शिबिर वासरवेल येथे उत्साहात पार पडले. शिबिराचे उद्घाटन उपमुख्याध्यापक ए. एन. सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक हरीश पाटील, पर्यवेक्षक जी. डी. सूर्यवंशी, ज्येष्ठ शिक्षक अशोक रजाळे, स्काऊट प्रमुख गोविंदा कोळी, गाईड प्रमुख शोभा मोहने आदी उपस्थित होते.

वासरवेल येथे साहसी व शारीरिक उपक्रमां अंतर्गत झाडावर चढणे, ट्रेकिंग तसेच आपत्ती व्यवस्थापन या विषयावर स्ट्रेचर तयार करणे, रुग्णांची ने-आण, हात व डोक्याचे बंधन, स्पर्श व गंध ओळख यांसारख्या उपयुक्त व जीवनोपयोगी प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका कमल कोकणी, उपमुख्याध्यापक ए. एन. सोनवणे, ज्येष्ठ शिक्षक अशोक रजाळे व सुभाष पाटील यांनी शिबिराला भेट देऊन विद्यार्थिनींच्या उपक्रमांचे कौतुक केले.

शिबिर यशस्वीतेसाठी विषय प्रमुख शोभा मोहने, स्काऊट शिक्षिका विद्या काळे, सरला गावित, विद्या वळवी यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच कल्पना वसावे, शोभा गिरासे, अर्चना बिरारी, वैशाली पाटील, दिपाली कुवर, स्मिता वसावे यांनीही सक्रिय सहभाग घेतला.

## आठ महिन्यांत सव्वादोन लाखांहून अधिक रुग्णांवर उपचार

### जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्ता देगावकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १७ जानेवारी**

धुळे जिल्हा शासकीय रुग्णालयात एप्रिल ते डिसेंबर २०२५ या आठ महिन्यांच्या कालावधीत तब्बल २ लाख ३८ हजार ८८० रुग्णांवर औषधोपचार करण्यात आले आहेत. तसेच आगामी काळात वैद्यकीय सेवांचा विस्तार केला जाणार असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्ता देगावकर यांनी दिली. धुळे जिल्हा शासकीय रुग्णालयात बाह्य रुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग अंतर्गत सामान्य व मोठ्या शस्त्रक्रिया, सुरक्षित प्रसूती, नवजात बालकांची निगा, विविध प्रयोगशाळा तपासण्या, क्ष-किरण (एक्स-रे), सोनोग्राफी, रक्तपेढी सेवा तसेच मोफत औषध वितरण योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. तसेच राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत अनेक रुग्णांना मोफत उपचाराचा लाभ देण्यात आला आहे. यात आतापर्यंत मागील आठ महिन्यांच्या कालावधीत बाह्यरुग्ण विभागात २ लाख ३८ हजार ८८० रुग्णांनी उपचार घेतले, तर आंतररुग्ण विभागात ६ हजार ६० रुग्ण दाखल होऊन त्यांना वैद्यकीय सेवा देण्यात आली.

जिल्हा शासकीय रुग्णालयात प्रसुती, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, आदी विभाग असून रुग्णालयात ६८५ महिलांची प्रसुती झाली. त्यापैकी ९७ महिलांची सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे सुरक्षित प्रसुती करण्यात आली आहे. तसेच इसीजी, अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, क्ष- किरण तपासणी (एक्स रे), सिटी स्कॅन, सोनोग्राफी, गर्भवती तपासणी, लसीकरण, रक्ताच्या विविध चाचण्यांची तपासणी, कार्डियाक कॅथ लॅब आदी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. त्यासाठी त्या- त्या विषयातील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी जिल्हा रुग्णालयाच्या सेवेत आहेत. दाखल होणाऱ्या रुग्णांना अखंड सेवा दिली जाते.

> धुळे जिल्हा शासकीय रुग्णालयात विविध आजारांवर औषधोपचारासाठी तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. या रुग्णालयाच्या माध्यमातून मागील आठ महिन्यांत दोन लाखांपेक्षा अधिक नागरिकांची तपासणी करून त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आले आहेत. आगामी काळात वैद्यकीय सेवांचा विस्तार केला जाणार आहे. धुळे जिल्ह्यातील नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा.
>
> **-डॉ. दत्ता देगावकर, जिल्हा शल्यचिकित्सक, धुळे**

**रुग्णालयात विविध शस्त्रक्रिया सुविधा**

जिल्हा रुग्णालयात बाह्यरुग्ण, आंतररुग्ण, प्रसूती सेवा, विविध शस्त्रक्रिया तसेच अत्याधुनिक तपासणी व उपचार सुविधा प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. जिल्हा रूग्णालयात आतापर्यंत कुटुंब नियोजन अंतर्गत ७७ तसेच याशिवाय ८० अँजिओग्राफी, २१ हजार ४६३ रुग्णांचे एक्स-रे, १८ हजार १२१ सिटी स्कॅन, ७ हजार ३ सोनोग्राफी तपासणी व ५ हजार ९०७ गरोदर मातांची तपासणी करण्यात आली आहे. रुग्णालयात विविध लसीकरणाच्या सेवा पुरविण्यात येत असून २ हजार २६ लसीकरण, १ लाख ४४ हजार ७२० रक्तचाचण्या तसेच ९ हजार २१८ इसीजी तपासणी करण्यात आली आहे.

रुग्णांना गुणवत्तापूर्ण व वेळेत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी सातत्याने कार्यरत असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. देगांवकर यांनी सांगितले. जिल्हा रुग्णालयात कार्डियाक कॅथ लॅब, सीटी स्कॅन, रक्ततपासणी आदी सेवा रुग्णांना मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. याशिवाय स्त्रीरोग रुग्णालय, एमआरआय सुविधा तसेच शवविच्छेदन कक्ष लवकरच कार्यान्वित होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य नागरिकांना वेळेत, दर्जेदार व किफायतशीर आरोग्यसेवा मिळावी यासाठी वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व आरोग्य कर्मचारी तत्परतेने कार्यरत आहेत. रुग्णालयाच्या पायाभूत सुविधा अधिक बळकट करण्यासाठी आवश्यक वैद्यकीय उपकरणे, मनुष्यबळ व सेवा-सुविधा वाढविण्यावर भर देण्यात येत असून, भविष्यात रुग्णसेवा अधिक प्रभावी करण्यासाठी विविध सुधारणा करण्यात येणार असल्याचेही जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. देगावकर यांनी सांगितले.

# अतीवृष्टी मदत अनुदानासाठी पाचोऱ्यात शेतकऱ्यांचा निर्णायक संघर्ष

## सातवी मागणी प्रलंबित, अंधारातही एकटा शेतकरी आमरण उपोषणावर ठाम

**पाचोरा :** तालुक्यात सन २०१९ पासून शेतकरी अनुदान व अतिवृष्टी नुकसानभरपाई वितरणात कथित गैरप्रकारांमुळे पुन्हा एकदा तीव्र असंतोष उसळला आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचा न्यायासाठी सुरू असलेला लढा आता निर्णायक वळणावर पोहोचला आहे. दिवसा आंदोलनावर चर्चा होत असताना प्रशासनाकडून शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करण्यात येवून सातवी मागणी प्रलंबीत आहे. त्यामुळे १५ जानेवारीपासून रात्रीच्या अंधारातही एक शेतकरी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत आमरण उपोषणावर ठाम आहेत.

पाचोरा तालुक्यात गेल्या चार पाच वर्षांपासून अतीवृष्टी, बेमोसमी पाऊस वा अन्य नैसर्गीक आपत्ती नुकसान भरपाई अनुदान रकम शासनस्तरावरून प्रशासनाला वितरीत करण्यात आले आहे. परंतु यात शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या मदत अनुदानात गैरप्रकार झाले असून यातील गोंधळ, अपारदर्शकता आणि जबाबदारीचा अभाव याविरोधात तालुक्यातील नाचणखेडा येथील शेतकरी गुलाब प्रताप पाटील यांनी शेतकऱ्यांच्या न्याय मागण्यांसाठी १५ जानेवारीपासून आमरण उपोषण सुरू केले आहे.




**शेतकरी उपोषणामुळे प्रशासनाला जाग**

नाचणखेडा येथील गुलाब प्रताप पाटील या शेतकऱ्याच्या आमरण उपोषणामुळे महसूल प्रशासनात काही प्रमाणात हालचाल झाली. यात शेतकऱ्यांच्या याद्या पीडीएफ स्वरूपात देण्यासह काही मागण्या मान्य झाल्या. परंतु अद्यापही सातवी आणि अत्यंत महत्त्वपूर्ण मागणी प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांच्या उपोषणाचा संघर्ष कायम आहे.

**अन्य व्यक्तींच्या खात्यावर लाभाची रकम वर्ग**

पाचोरा तालुक्यात सन २०१९ पासून अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती, पीक नुकसान, घरे व मालमत्तेच्या नुकसानीच्या अनुदान वितरणात गंभीर तक्रारी असून अधिकृत सरकारी यादीत नाव असलेल्या पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा न होता, ती अन्य व्यक्तींच्या खात्यावर वर्ग झाल्याचे गंभीर प्रकार उघडकीस आले आहेत. या प्रकरणांमध्ये महसूल कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल होऊन चार्जशीट सादर झालेली आहे.

**इतर तालुक्यांप्रमाणे स्वतंत्र पंचनामे नाहीत**

तसेच २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत शेजारच्या जामनेर तसेच चाळीसगाव तालुक्यांमध्ये अतिवृष्टी पंचनामे स्वतंत्रपणे करून नुकसानभरपाई देण्यात आली असताना पाचोरा तालुक्यात ही प्रक्रिया प्रभावीपणे का राबविण्यात आली नाही, याचे ठोस उत्तर अद्याप मिळालेले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत पाचोरा शहर व तालुक्यात मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊनही अनेक पात्र शेतकरी व नागरिकांना अद्याप नुकसानभरपाई मिळालेली नाही, त्यामुळे शेतकरी वर्गात तीव्र नाराजी आहे.

### शेवटच्या लाभार्थ्यास लाभ मिळेपर्यंत उपोषण कायम

असे असले तरी अनुदानाची प्रत्यक्ष रक्कम शेवटच्या पात्र शेतकऱ्याच्या खात्यावर जमा होईपर्यंत उपोषण सुरूच राहणार असल्याचे गुलाब प्रताप पाटील व संदीप महाजन यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान आंदोलन स्थळी नगरपालिकेचे दिवे मात्र बंद आहेत. त्यामुळे या ठिकाणी अंधार असूनही शेतकरी मात्र न्यायासाठी लढा देत असून प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. तसेच प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची ठोस प्रभावी अंमलबजावणी कितपत होते, दोषींवर कठोर कारवाई होवून शेतकऱ्यांना वेळेत न्याय मिळेल की नाही, याकडे संपूर्ण तालुका परिसरातील शेतकऱ्यांसह सर्वसामान्याचे लक्ष लागले असून आंदोलकांकडून आता हा लढा शेवटपर्यंत नेण्याचा निर्धार व्यक्त केला जात आहे.

**निष्पक्ष व पारदर्शक चौकशीची मागणी**

या पार्श्वभूमीवर तालुक्यातील नाचणखेडा येथील गुलाब प्रताप पाटील या शेतकऱ्यांसह अन्य शेतकऱ्यांनी उपविभागीय दंडाधिकारी तथा प्रांताधिकारी, पाचोरा यांच्याकडे निवेदन देत संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करण्याची मागणी शेतकरी आंदोलक संदीप महाजन यांनी सहभाग घेत आंदोलन कोणत्याही राजकीय पक्ष किंवा संघटनेचे नसून केवळ शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी असे नमूद केले आहे. उपोषणस्थळी शेजारी स्वतंत्र तंबू उभारून लाक्षणिक आंदोलन व प्रशासकीय पाठपुरावा करण्याची भूमिका महाजन यांनी जाहीर केली आहे.

**प्रांताधिकारी अध्यक्षतेखाली चौकशी समिती**

आमरण उपोषण व लाक्षणिक आंदोलनाच्या दबावामुळे महसूल प्रशासनाने शेतकऱ्यांच्या ७ मागण्यांपैकी ६ मागण्या मान्य केल्या. यात २०१९ ते आजपर्यंत अनुदानासाठी पात्र शेतकऱ्यांच्या गाव व वर्षनिहाय यादी पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून देण्याची तयारी प्रशासनाने दर्शविली आहे. शेतकरी अनुदान घोटाळा प्रकरणी मुक्ताईनगर प्रांताधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### चोपडा आगारात इंधन बचत अभियानाचे उद्घाटन

**चोपडा :** राज्य परिवहन महामंडळाच्या चोपडा आगारात १६ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान राबविण्यात येणाऱ्या इंधन बचत मासिक अभियानाचे उद्घाटन आगारप्रमुख महेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी श्रीमती शरदचंद्रीका तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालय चे एम. एस. पाटील, कमलेश पाटील, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे निर्देशक संभाजी क्षीरसागर, अनिल चव्हाण उपस्थित होते. एम. एस. पाटील व संभाजी क्षीरसागर यांनी इंधन वाचविण्यासाठी चालकांनी घ्यावयाची काळजी, इंधन बचतीचे महत्त्व या बाबत चालकांना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी चांगले के. पी. टी. एल. आणणारे विना अपघात सेवा देणारे चालकांसह आगार प्रमुख महेंद्र पाटील व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभाकर महाजन यांनी केले. सूत्रसंचालन भगवान नायदे यांनी केले. याप्रसंगी स.का.अ. सिध्दार्थ चंदनकर, वाहतूक निरीक्षक सागर सावंत, लेखाकार ईश्वर चौधरी, संदीप पाटील, रिजवान सैय्यद, धनंजय पाटील, विजय सोनवणे, चंद्रभान रायसिंग, रिना पाटील, सविता कोळी, राजश्री परदेशी, वृषाली बैसाणे, निर्मला सोनवणे आदी कर्मचारी उपस्थित होते.



### पाचोरा भाजपतर्फे विजयाचा जल्लोष

**पाचोरा :** राज्यात २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान तर १६ रोजी मतमोजणी पार पडली. या निवडणुकीत बहुतांश महानगरपलिकांमध्ये तसेच जळगाव शहर महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीला घवघवीत यश मिळाले. या यशाचा छत्रपती संभाजी महाराज चौक, पाचोरा येथे १६ जानेवारी रोजी भारतीय जनता पार्टीतर्फे जल्लोष करण्यात आला. यावेळी ढोल ताशांच्या गजरात फटाके फोडून व कार्यकर्त्यांनी पेढे भरवून हा आनंदोत्सव साजरा केला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे नेते तथा माजी आमदार दिलीप वाघ, कार्यकर्ते गोविंद शेलार, पाचोरा पंचायत समितीचे माजी सभापती बन्सीलाल पाटील, अनिल पाटील, शिवदास पाटील, भूषण वाघ, माजी नगरसेवक दत्तात्रय बोरसे, सतीश चौधरी, विनोद पाटील, लक्ष्मण पाटील, मनोज चौधरी, स्वप्निल पाटील, सुधाकर पाटील, नगरसेवक सुरज वाघ, मिथुन वाघ, ॲड. अविनाश सुतार, गोपाल वासवानी, एस. एस. चौधरी, नानाभाऊ पाटील, गणेश पाटील, योगेश पाटील, भाऊसाहेब पाटील, सुनील पाटील, अमोल ठाकूर, त्रिभुवन गोसावी, सतीश देशमुख, महेंद्र महाजन, अभिजीत पाटील, प्रा.डॉ. माणिक पाटील, ओम प्रकाश पाटील, सचिन पाटील, नितीन पाटील, शरद पाटील, गौरव चौधरी, राजरत्न जगताप, विजय सोनजे, बाळू वारुळे, स्वप्निल ठाकरे, गणेश चव्हाण, प्रा.नितीन पाटील, यश पाटील, उल्केश जाधव, सुरेंद्र जाधव आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### वसंतराव मोरे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे सुयश

**पारोळा :** तालुक्यातील टेहू येथील वसंतराव मोरे पॉलिटेक्निकच्या



विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळांच्या नुकत्याच झालेल्या निकालात उल्लेखनीय यश संपादन करीत विविध अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवून महाविद्यालयाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयातून पलक कुंभेकर ८०.९२ टक्के प्रथम, साक्षी पाटील ८४.४७ टक्के द्वितीय, तर हेमकांत चौधरी ८२.१२ टक्के मिळवित तृतीय क्रमांक मिळवला. ह्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष तथा माजी खासदार वसंतराव मोरे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमध्ये वैष्णवी पाटील, रितू पाटील (७७.१८ टक्के), समीक्षा पाटील (७५.०६ टक्के), चेतना पाटील (७३.१८ टक्के), यज्ञेश पाटील (७१.८८ टक्के) आणि ज्ञानराज पाटील (७१ टक्के), द्वितीय वर्ष कॉम्प्युटर मध्ये रोशनी सोनवणे (७७.१८ टक्के), राखी राजपूत (७६.९४ टक्के), मयूर राजपूत (७५.७७ टक्के), चैताली पवार (७५.१८ टक्के) व किर्ती पाटील (७५.०६ टक्के), तृतीय वर्ष कॉम्प्युटरमध्ये पलक कुंभेकर (९०.८२ टक्के) प्रथम, साक्षी पाटील (८४.४७ टक्के) द्वितीय, सचिन शेंगदाणे (८१.५३ टक्के), साक्षी चौधरी (८०.२४ टक्के) व सृष्टी माळी (७८ टक्के), प्रथम वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये भूषण पाटील व रुद्र सूर्यवंशी (६७.१८ टक्के), हर्षल पाटील (६६.४७ टक्के),राहुल पाटील (६६.१२ टक्के) व मयूर अहिरे (६६ टक्के), द्वितीय वर्ष इलेक्ट्रिकल मध्ये तुषार पाटील (६९.७७ टक्के), हर्षल महाजन (६६.८२ टक्के), सुरेश जाधव (६५.२९ टक्के), गोपाळ मराठे (६२.४७ टक्के) व तुषार पाटील (६२.३५ टक्के), तृतीय वर्ष इलेक्ट्रिकलमध्ये उमेश जगताप (७५.८८ टक्के), पियुष पाटील (७४ टक्के), सागर साळुंखे (७३.६५ टक्के), विशाल जगताप (७३.१८ टक्के) व कृष्णा प्रवीण महाजन (७२.९४ टक्के) यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य दयानंद पाटील, प्राध्यापक व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना उज्ज्वल भवितव्याच्या शुभेच्छा दिल्या.

# कन्नडसह सिल्लोडच्या आमदारांची बैठक

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक रणनीतीवर चर्चा

**तभा.वृत्तसेवा**
**सोयगाव, १७ जानेवारी**

राज्यात महानगर पालिकांची सार्वत्रिक निवडणूक रणधुमाळी पार पडत नाही तोच २० जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक कार्यक्रमांची अंमलबजावणी केली जात आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कन्नडच्या शिवसेना आमदार संजना जाधव आणि आमदार अब्दुल सत्तार यांची सिल्लोड येथे बैठक पार पडली.



आमदार अब्दुल सत्तार यांच्या निवासस्थानी कन्नडच्या शिवसेना आ. संजना जाधव यांनी सदिच्छा भेट दिली. या महत्वपूर्ण बैठकीत पक्षाचे नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सिल्लोड - सोयगाव आणि कन्नड तालुक्यातील निवडणूक रणनीती, स्थानिक पातळीवरील राजकीय स्थिती, संभाव्य उमेदवारांची निवड तसेच प्रचार यंत्रणेच्या बळकटीकरणावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी सिल्लोड, सोयगाव व कन्नड तालुक्यातील शिवसेनेचे मुख्य पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांमध्ये प्रभावी कामगिरी संदर्भात दोन्ही नेत्यांनी आपापली मते मांडली. स्थानिक प्रश्न, जनतेच्या अपेक्षा आणि विकासकामांचा आढावा, मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी नियोजनबद्ध प्रचारावर भर यावर चर्चा झाली. जो निवडून येवू शकतो त्या उमेदवारांची जनाधारक्षमता आणि कार्यकर्त्यांशी असलेले संबंध हे निकष समोर ठेवून त्याला उमेदवारी तसेच कार्यकर्त्यांमध्ये समन्वय, बूथ पातळीवर मजबूत संघटन आणि युवा तसेच महिला कार्यकर्त्यांचा सहभागावर भर तसेच विरोधकांच्या रणनीतींवर लक्ष ठेवून योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची तयारी यावर दोन्ही आमदारांमध्ये चर्चा झाली.

या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली येणाऱ्या काळात संयुक्तपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त करीत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा संदेश देण्यात आला आहे. या बैठकीमुळे आगामी निवडणुकांच्या राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




# स्वामी विवेकानंद व जिजाऊ जयंतीनिमित्त वार्षिक पारितोषिक वितरण

**एरंडोल :** येथील गोपी गोल्ड इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत वार्षिक पारितोषिक वितरण उत्साहात पार पडले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थाध्यक्ष सचिन विसपुते, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. नरेंद्र ठाकूर, क्रीडा समन्वयक प्रा. मनोज पाटील, नगरसेविका छाया दाभाडे, नगरसेवक मयूर महाजन, मुख्याध्यापिका अंजुषा विसपुते, विलास मोरे, दिलीप पांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

गोपी गोल्ड इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचा समारोप करण्यात आला. यात शैक्षणिक वर्षात तसेच क्रीडा महोत्सवातील विविध स्पर्धांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त, ग्रीन, ब्ल्यू व रेड या तीन हाऊसमधून ग्रीन हाऊस या वर्षीचा क्रीडा महोत्सव विजेता, तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावरील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्राचार्य सुनील ठाकरे यांनी प्रास्ताविक केले. नगराध्यक्ष डॉ. नरेंद्र ठाकूर, एस.आर.पाटील, नगरसेविका छाया दाभाडे, संस्थाध्यक्ष सचिन विसपुते यांनी व उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या विविध उपक्रमांचे, शिक्षकांच्या परिश्रमाचे तसेच विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले. सूत्रसंचालन बोरसे व रत्ना पटवारी यांनी केले. आभार ज्योती वडगावकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### ॲड. ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूल ला 'गोल्डन स्कूल अवॉर्ड'

**अमळनेर :** जिजाऊ बहुउद्देशीय संस्थेच्या ॲड. ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूल, अमळनेर या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेला यावर्षीचा 'गोल्डन स्कूल अवॉर्ड' जाहीर झाला आहे. राष्ट्रीय क्रमांक १ मानांकन प्राप्त इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड संस्थेमार्फत हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, डिजिटल शिक्षण, प्रभावी व्यवस्थापन व नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या प्रत्यक्ष मूल्यमापनातून हा सन्मान जाहीर करण्यात आला. आधुनिक अध्यापन, शिस्तबद्ध वातावरण व सुरक्षित कॅम्पसची दखल परीक्षकांनी घेतली. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा ॲड. ललिता पाटील यांनी अभिनंदन केले. हा पुरस्कार अधिक जबाबदारीची जाणीव करून देणारा असल्याचे प्राचार्य डॉ. नीरज चव्हाण यांनी सांगितले. अमळनेर तालुक्यात हा पुरस्कार मिळवणारी ही एकमेव शाळा आहे.




# तळई येथे आदर्श संयुक्त जयंती महोत्सव

**धरणगाव :** एरंडोल तालुक्यातील तळई गावात शिवआर्मी ग्रुप. तळई व वैचारिक स्वराज्य सामाजिक संस्था. फरकांडे यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आणि स्वामी विवेकानंद यांचा संयुक्त जयंती महोत्सव उत्साहात पार पडला.

तळई येथील शिवआर्मी ग्रुप व वैचारिक स्वराज्य ग्रुप यांच्या माध्य मातून राजमाता जिजाऊ - सावित्रीबाई फुले तसेच स्वामी विवेकानंद संयुक्त जयंती उत्सवा निमित्त ज्ञान - विचार व प्रबोधन कार्यक्रमप्रसंगी तळई येथील चिमुकल्या विद्यार्थिनींनी 'जिजाऊ वंदना' सादर केली. वैचारिक स्वराज्यचे संस्थापक ह.भ.प. दिनेश महाराज पाटील यांनी संयुक्त जयंतीम ागील विचार, उद्देश आणि सामाजिक बांधिलकी प्रभावी शब्दांत मांडली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष, पद्मालय मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी सभापती ॲड. अनंतराव पाटील, प्रमुख अतिथी संभाजी ब्रिगेडचे कार्याध्यक्ष लक्ष्मणराव पाटील, जि.प. माजी उपाध्यक्ष ज्ञानेश्वर आमले उपस्थित होते. व्याख्याते राकेश पाटील, खडके विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र टी. पाटील, ॲड. आनंदराव पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. शालेय स्तरावर विविध गटांत सामान्य ज्ञान स्पर्धा प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तसेच उत्तेजनार्थ विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्कुल पॅड बक्षीस वितरण करण्यात आले. यशवंत पाटील व ह.भ.प. दिनेश महाराज पाटील यांनी आयोजन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी तळई ग्रा.पं. सरपंच, उपसरपंच व ग्रा.पं. सदस्य, शिव आर्मी ग्रुप तळई व वैचारिक स्वराज्य सामाजिक संस्था फरकांडे यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व युवक मित्र परिवार आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रकाश तामस्वरे यांनी केले.

# लाठीचार्जप्रकरणी चौकशीसाठी विशेष समिती नियुक्त

**जळगाव :** वखार महामंडळाच्या गोडाउनमध्ये मतमोजणी सुरू असताना बाहेर दगडफेक आणि पोलिसांकडून सौम्य लाठीचार्ज झाला होता. यात महिला,तरुण तसेच उमदेवार यांना काठी लागुन दुखापत झाली होती. या घटनेप्रकरणी शनिवारी (१७ जानेवारी) जिल्हाधिकारी कार्यालय तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयावर महिला नागरिकांचा आक्रोश मोर्चा काढुन मागणी निवेदन सादर केले. लाठीचार्ज घटनेच्या चौकशीसाठी अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती नियुक्त करण्यात आली आहे,अशी माहिती पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांनी दिली.

मनपातील उमेदवार कुलभूषण पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज कार्यकर्ते नागरिक व महिलांचा आक्रोश मोर्चा जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक कार्यालयावर धडकला. मागणी निवेदन सादर केले. दरम्यान लाठीचार्ज प्रकरणी विशेष चौकशी समिती नेमण्यात आली आहे. घटनेची संपूर्ण चौकशी करुन समिती हा अहवाल सादर करेल. अहवालाअंती यासंदर्भात पुढील ॲक्शन घेतली जाईल,अशी माहिती पोलीस अधीक्षक डॉ.रेड्डी यांनी दिली.

**सुव्यवस्थेची जबाबदारी पार पाडली**

मतमोजणी प्रक्रिया राबविण्यासाठी महामंडळ गोडावून परिसरात पोलिसांचा बंदोबस्त होता. बॅरिकेट्स लावलेल्या ठिकाणी पोलीस कर्तव्य बजावत होते.याठिकाणी हजाराच्या संख्याने जमाव जमला होता. एक दोन दगड जमावाने पोलिसांच्या दिशेने भिरकाविले. त्यानंतर पोलिसांवर ॲटक करण्याचा प्रयत्न जमावातून झाला. जमावाला पांगविण्यासाठी सौम्य लाठीचार्ज पोलिसांनी केला. पोलिसांच्या कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी निवेदनात मागणी केल्याप्रमाणे चौकशी केली जाईल. कायदा सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांची होती, ती पोलिसांनी पार पाडली, असे पोलीस अधिक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांनी स्पष्ट केले.

# सुदृढ आरोग्य राखणे काळाची गरज!

## आरोग्य शिबिरात लोकनियुक्त नगराध्यक्षा लीलाताई चौधरी यांचे प्रतिपादन

**धरणगाव :** धरणगाव येथे राज माता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त साने पटांगणावर श्री चामुंडामाता होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातर्फे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने या होमिओपॅथी महा-आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. महा-आरोग्य मोफत तपासणी शिबिराचा सुमारे ३५० नागरिकांनी लाभ घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




शिबिराचे उद्घाटन लोकनियुक्त नगराध्यक्ष लीलाताई चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गटनेते तथा युवासेना जिल्हा प्रमुख माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष नीलेश चौधरी, प्रतोद परमेश्वर महाजन, नगरसेवक लक्ष्मण महाजन, सुनील चौधरी, नगरसेविका भारती महाजन, प्रमिला शिरसाठ, ज्योती पाटील, हेमांगी अग्निहोत्री आदी उपस्थित होते.

"सुदृढ आरोग्य राखणे ही आजच्या काळाची गरज असून, अशा उपक्रमांमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळतो," असे प्रतिपादन लोकनियुक्त नगराध्यक्षा लीलाताई चौधरी यांनी यावेळी केले.

या शिबिरात श्री पी. ई. तात्या पाटील हॉस्पिटल येथील डॉ. सिद्धेश्वर पाटील, डॉ. नरेंद्र शर्मा, डॉ. अमिता श्रीवास्तव, डॉ. सुरेश अग्रवाल, नेत्रचिकित्सक जयेश वाल्हे हे तज्ज्ञ तसेच ज्यू. व सिनियर इंटर्न्स स्टुडंट डॉक्टरांनी नागरिकांची आरोग्य तपासणी केली. शिबिर यशस्वीतेसाठी हॉस्पिटलचे समन्वयक अधिकारी नवल परदेशी, ग्रामस्थ विनोद रोकडे, रमेश चव्हाण, गजानन महाजन, अरविंद चौधरी, गोपाल चौधरी, मोनू चौधरी, गोपाल पाटील यांनी सहकार्य केले.



# बाळद शिवारात बिबट्याचा संचार

**पाचोरा :** बाळद गावापासून जवळच असलेल्या सुरेश गंगाराम पाटील करमुडकर यांच्या पाचोरा-चाळीसगाव रस्त्यालगत असणाऱ्या शेतात दोन दिवसापूर्वी दुपारी बारा वाजेच्या सुमारास बिबट्याचे दर्शन झाले. नगरदेवळा बाळद शिवारात बिबट्याचा संचार आढळून आल्याने ग्रामस्थांमध्ये दहशतीच वातावरण दिसून आले आहे.

पाचोरा तालुक्यात वडगाव शिवारातील सुरेश गंगाराम पाटील यांच्या गट नंबर ३४६ मधील केळीच्या शेतात केळीचे घड पानांनी झाकत असताना अचानक त्यांना आवाज आला. सुरेश पाटील यांनी आवाजाच्या दिशेने पाहिले असता त्यांना अचानक केळीच्या बागेत बिबट्याचे दर्शन झाले. बिबट्या समोर दिसताच सुरेश पाटील एकदम भांबावून गेले व त्यांनी एकदम आरडाओरड केल्यावर बिबट्याने केळीच्या बागेतून धूम ठोकली. त्याचवेळी रस्त्याने पोलीस भरतीसाठी धावण्याचा सरावाच्या मैदानावरून नदीकाठालगत वडगाव शिवाराकडे बिबट्याने पळ काढला. यादरम्यान गावातील तरुण सुरेश पाटील यांच्या शेताकडे येवून पाहणी व चौकशी केली. गावचे पोलीस पाटील नितीन पाटील यांनी वन विभागाला भ्रमणध्वनीवरून माहिती दिली. वनरक्षक प्रमिला अंभोरे व खतीजा शेख यांनी येऊन बिबट्याच्या पावलांच्या ठशांची खातरजमा करण्यासाठी त्याचे फोटो घेऊन कारवाईसाठी पाठवले असल्याचे वनविभाग कर्मचाऱ्यांनी सांगितले.



# जि.प.- पं.स.साठी १६ अर्जांची विक्री

**तभा.वृत्तसेवा**
**सोयगाव, १७ जानेवारी**

राज्यात महानगरपालिकांच्या रणधुमाळीची रंगत संपत नाही तोच जिल्हा परिषद, पंचायत समिती गट गणांच्या निवडणुकांची तयारी सुरू झाली आहे. सोयगाव तालुक्यात जिल्हा परिषदेच्या तीन गट आणि पंचायत समितीच्या सहा गणांसाठी निवडणूक प्रक्रिया अंमलबजावणी सुरू झाली आहे. पहिल्याच दिवशी निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांनी १६ उमेदवारी अर्ज नेले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी रुपेश सीनगारे यांनी दिली.

**निवडणूक रणधुमाळी**

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद आणि सोयगाव तालुका पंचायत समिती गट आणि गणांसाठी सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. दरम्यान सोयगाव तालुका निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून जिल्हा परिषदेच्या आमखेडा, गोंदेगाव, फर्दापूर या तीन गटांसाठी ९ उमेदवारी अर्ज आणि पंचायत समितीच्या सहा गणांसाठी ७ उमेदवारी अर्ज विक्री झाले आहेत. पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झालेला नाही. निवडणूक निर्णय अधिकारी रूपेश सिनगारे, सहायक निवडणूक अधिकारी मनीषा मेने यांच्या कार्यालयात अर्ज विक्री व स्वीकृती सुरू झाली आहे. एक खिडकी विभागात १६ अर्ज विक्री झाले आहेत. त्यामुळे पहिल्या दिवशी उमेदवारांनी केवळ माहिती जाणून घेत अर्ज घेतले आहे. सोयगाव तहसील कार्यालयात तीन टेबलवर अर्ज विक्री व स्वीकृती प्रक्रिया सुरू असून रविवारी सुट्टीचा दिवस वगळून (दि.२१) पर्यंत अर्ज विक्री सुरू राहणार असल्याचे निवडणूक प्रशासनाने म्हटले आहे.


शिवसेना
BJP
दैदिप्यमान
विजयाचे
वाजती
चौघडे...
जळगाव महानगरपालिका
निवडणूकीतील
ऐतिहासिक विजयाबद्दल
महायुतीच्या सर्व मान्यवरांचे व
विजयी नगरसेवकांचे
हार्दिक
अभिनंदन !
श्रीराम खटोड श्रीकांत खटोड
समस्त खटोड परिवार
SHRI SHRI
Infrastructure Group
MRUDANG India


तमाम धुळेकर जनतेचे
मन:पूर्वक आभार !
तुमची आमची भाजपा सर्वांची
धुळे महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांना बहुमतांनी ऐतिहासिक विजय मिळवून दिल्याबद्दल धुळे शहर परिसरातील सर्व सन्माननीय नागरिक, मतदार बंधू-भगिनी, पक्षाचे कार्यकर्ते व समर्थकांचे मनःपूर्वक आभार व कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.
आपण आमच्यावर दाखविलेल्या विश्वासामुळे व आपल्या सहकार्यामुळेच हा महाविजय शक्य झाला आहे.
आपल्या अपेक्षांवर खरे उतरुन धुळ्याच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध राहू. पुन्हा एकदा धुळेकर जनतेचे मन:पूर्वक आभार!
अनुपभैया अग्रवाल
आमदार, धुळे शहर
आपलीच - भारतीय जनता पार्टी, धुळे महानगर
MORYA COMMUNICATION, DHULE

www.tarunbharat.net
तरुण भारत
आसमंत
रविवार, १८ जानेवारी २०२६




# ममतांचे आक्रस्ताळेपणाचे राजकारण



**पश्चिम बंगाल विधानसभेच्या या वर्षी होणाऱ्या निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर 'ईडी'ने तृणमूल काँग्रेसच्या आयटी सेल विभागाच्या प्रमुखांच्या घरावर छापा टाकला. या प्रकरणी ममता बॅनर्जी यांनी अतिशय आक्रमकपणे प्रत्युत्तर देताना आक्रस्ताळेपणाचे राजकारण सुरू केले. त्यात भाजपाही उत्तर द्यायला पुढे आला. मात्र दोन आक्रमक पक्षांमुळे पश्चिम बंगालच्या कायदा आणि सुव्यवस्थेला आव्हान मिळत आहे.**

पश्चिम बंगालमधील राजकीय तापमान आता उच्च बिंदूवर पोचले आहे. 'मनी लॉण्ड्रिंग' प्रकरणात तृणमूल काँग्रेसची राजकीय सल्लागार कंपनी 'आय-पॅक'च्या कोलकाता कार्यालयावर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) टाकलेल्या छाप्याचा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आक्रस्ताळेपणाने निषेध केला. ममता यांचा दावा आहे की, तृणमूल काँग्रेसच्या आयटी सेल प्रमुखांच्या घरावर छापा टाकून, 'ईडी'चा वापर करून भाजपा आपल्या पक्षातील अंतर्गत डेटा जप्त करू पाहात होता. प्रतीक जैन हे तृणमूल काँग्रेसच्या आयटी सेलचे प्रमुख आहेत. त्यांच्याच घरावर आणि कार्यालयावर 'ईडी'ने छापे टाकल्याने ममता खवळल्या. एखाद्या मुख्यमंत्र्याने 'ईडी'च्या छाप्याला विरोध करण्यासाठी स्वतः एखाद्या सल्लागार संस्थेच्या कार्यालयात उपस्थित राहण्याची ही पहिलीच वेळ असावी. दिल्लीतही या पक्षाच्या खासदारांनी आंदोलन केले. तपास यंत्रणा निष्पक्षपाती नसल्याचा आरोप करून असे आंदोलन करण्याचा अधिकार संबंधितांना जरूर आहे; परंतु त्यासाठी किती ताणून धरावे, यालाही काही मर्यादा असतात. त्याचे भान ममता आणि त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनाही 'ईडी'ने नोटीस बजावली होती. त्या वेळी पवार यांनी कोणताही आक्रस्ताळेपणा न करता आपण स्वतःच 'ईडी'च्या कार्यालयात येतो, काय चौकशी करायची ते करा, असे आव्हान दिले होते. राहुल गांधी, रॉबर्ट वढेरा यांची तर 'ईडी'ने किती तरी वेळा चौकशी केली. त्यांना तासन्‌तास बसवून ठेवले; परंतु त्यापैकी कोणीही आक्रस्ताळेपणा केला नाही. या पृष्ठभूमीवर सत्तेत असतानाही ममताच मोर्चा काढतात, याला अगतिकतेचे राजकारण म्हणावे लागेल.

यंत्रणेला आक्रस्ताळेपणाने उत्तर देणारे देशाच्या राजकारणात हाताच्या बोटावर मोजण्याइतके पक्ष आहेत. त्यात ममता यांच्या पक्षाचा समावेश होतो. तामिळनाडू, केरळ आणि पश्चिम बंगालचे सत्ताधारी त्यात अव्वल आहेत. देशभर एकामागून एक राज्ये पादाक्रांत करीत असताना भाजपपुढे ही राज्ये सर करण्याचे आव्हान आहे. तामिळनाडू आणि केरळमध्ये लगेच काही साध्य होईल, असे वाटत नसल्याने भाजपाने गेल्या १० वर्षांपासून पश्चिम बंगालचा गड पद्धतशीरपणे सर करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा चालवली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा अलिकडचा तीन दिवसांचा पश्चिम बंगाल दौरा भाजपासाठी निवडणूकदृष्ट्या महत्त्वाचा होता. त्यांनी पत्रकार परिषदांद्वारे पक्षाचे मुद्दे स्पष्ट केले. खासदार, आमदार आणि प्रमुख नेत्यांच्या बैठका घेतल्या आणि पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याप्रमाणेच पश्चिम बंगालमध्ये सरकार स्थापन करण्याची इच्छा व्यक्त करताना शाह यांनी पश्चिम बंगालमधील जनता भीती, भ्रष्टाचार, कुशासन आणि घुसखोरीच्या राजकारणाऐवजी विकास, वारसा आणि गरिबांच्या कल्याणावर आधारित मजबूत सरकार स्थापन करण्याबाबत दृढनिश्चयी असल्याचा दावा केला. त्याचा आधार घेत ममतादीदी ईडीवर आगपाखड करीत आहेत.

पश्चिम बंगालच्या राजकारणाचा आढावा घेतला, तर गेल्या ५० वर्षांमध्ये काँग्रेस या राज्यात सत्तेत आलेली नाही, हे दिसते. त्यापूर्वी ती सत्तेत होती; परंतु डाव्यांनी काँग्रेसची सत्ता काढून घेतली. डाव्यांच्या सत्तेला ममता यांनी सुरुंग लावला. गेल्या १५ वर्षांमध्ये काँग्रेस आणि डावे कमकुवत झाले. त्यांची जागा भाजपाने घेतली. आता तर काँग्रेस शून्यावर आहे आणि ३४ वर्षे राज्य करणारी डावी आघाडी गेल्या विधानसभा निवडणुकीत एकही जागा जिंकू शकली नाही. याउलट, भाजप ४१ टक्के मते आणि ७७ जागांसह मुख्य विरोधी पक्ष म्हणून उदयाला आला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या जागांची संख्या २०१९ च्या तुलनेत कमी झाली असली, तरी त्यांना मिळालेली ३९ टक्के मते आणि १२ जागा दर्शवतात की, राज्यात तृणमूल काँग्रेसला एक मजबूत पर्याय निर्माण झाला आहे. ममता यांना सुरुवातीला मुस्लिम मतांचा आधार होता.

**सौरभ भट्टाचार्य**

पश्चिम बंगालमध्ये मुस्लिम मतदारांची संख्या २९ टक्के आहे. निव्वळ मुस्लिम मतांवर निवडून येता येणार नाही, याची जाणीव असल्याने त्या हिंदू मतांसाठी अनुनयाचे राजकारण करायला लागल्या आहेत. केवळ हिंदू मतांच्या जोरावर सत्तेत येता येणार नाही, याची भाजपलाही जाणीव आहे. त्यामुळे भाजपानेही आता व्यूहनीती बदलली आहे. या वर्षीच्या विधानसभा निवडणुकीमध्ये सरकार स्थापन करण्याचा भाजपाचा दावा केवळ अतिशयोक्ती म्हणून नाकारता येणार नाही. भाजपाने २०२१ च्या निवडणुका अशाच आत्मविश्वासाने लढल्या. ते तृणमूल काँग्रेसपेक्षा कमी पडले, ही मात्र वस्तुस्थिती आहे.

आता २०२१ च्या तुलनेत पश्चिम बंगालमधील राजकीय वातावरण लक्षणीयरीत्या बदलले आहे. शेजारील बांगलादेशमधील घटनांचा परिणाम संपूर्ण देशावर झाला आहे. सीमावर्ती राज्य असल्याने पश्चिम बंगाल प्रभावित आहे. पश्चिम बंगालमधील सुमारे २९ टक्के मुस्लिम मतदार असून भाजपाविरोधी, डाव्या विचारसरणीच्या मतदारांचा एक मोठा भाग तृणमूल काँग्रेसची ताकद आहे. मुस्लिम मतपेढीला धक्का दिला किंवा भाजपाच्या बाजूने हिंदू मतांचे व्यापक ध्रुवीकरण झाले तरच सत्ता परिवर्तन शक्य आहे. सरकारविरुद्ध आक्रमक भूमिका स्वीकारणारी तृणमूल काँग्रेस बांगलादेशमधील हिंसाचाराबद्दल, विशेषतः हिंदूंविरुद्धच्या हिंसाचाराबद्दल आक्रमक भूमिका घेत नाही. मोठे आंदोलनही करीत नाही. गेल्या काही वर्षांमध्ये पश्चिम बंगालच्या बाहेर पकडलेल्या घुसखोरांकडे २४ परगणा प्रदेशात वितरित केली गेलेली आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्रे सापडल्याने डाव्या आघाडीच्या आणि नंतर ममता बॅनर्जी सरकारच्या काळात बांगलादेशमधून घुसखोरी झाल्याचे सिद्ध झाले आहे. विशेष सघन आढाव्या (एसआयआर) दरम्यान अनेक घुसखोरांनी ते येथे बराच काळ राहत असल्याचा आणि त्यांच्याकडे ओळखपत्रे असल्याची कबुली दिली आहे. त्यांनी मतदान केल्याचेही कबूल केले. ममता यांनी या वस्तुस्थितीला नकार देणे आणि पहलगाममधील दहशतवादी हल्ला त्यांनी घडवून आणला का, असा सवाल करणे अनाकलनीय आहे. वस्तुतः जम्मू आणि काश्मीरमधील परिस्थिती पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाशी जोडलेली असल्याने पहलगाम हल्ला त्याचाच एक भाग होता.

अलिकडेच शाह यांनी पश्चिम बंगालभोवती अशी घेराबंदी स्थापित केली जाईल की, एकही घुसखोर आत येऊ शकणार नाही, असे म्हटले. गेल्या १० वर्षांमध्ये त्यांचे हात कुणी बांधले होते, हा प्रश्न उरतो. दोन देशांच्या सीमांवर कुंपण घालण्याचा प्रश्न येतो, तेव्हा राज्याच्या भूमिकांना काहीच अर्थ नसतो. राज्याने काहीही भूमिका घेतली, तर केंद्र सरकार सीमा सुरक्षेच्या दृष्टीने अशा उपाययोजना करू शकते; परंतु शाह यांनाही घुसखोरांना रोखण्याच्या उपाययोजनेपेक्षा ममतांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून सीमेवर कुंपण घालण्यात कसा अडथळा येत आहे, हे ठसवण्यात जास्त रस आहे. मुस्लिम मते एकत्रित करण्याच्या प्रयत्नात ममता डाव्या राजवटीत ज्याचा विरोध करीत होत्या, तीच पावले उचलताना दिसतात. गैर-मुस्लिमांवरील, विशेषतः हिंदूंवरील हिंसाचार आणि बांगलादेशमधील वाढत्या कट्टरवादामुळे हिंदू मतदारांना पुनर्विचार करण्यास भाग पाडले आहे. या पृष्ठभूमीवर मुर्शिदाबादमध्ये हुमायून कबीर यांनी बाबरी मशिदीची पायाभरणी केली. दर शुक्रवारी तेथे मोठ्या प्रमाणात होणारे मेळावे आणि मोठ्या प्रमाणात वळणारा पैशांचा ओघ यामुळे हिंदू मतदारांमध्ये पुनर्विचाराची भावना निर्माण झाली आहे. दुसरीकडे मुस्लिम मतांचे विभाजन झाल्याचा फटका ममतांनाच बसणार आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये ममता यांनी स्वतःला धर्माभिमानी हिंदू म्हणून दाखवण्यासाठी स्टेजवरून चंडी पाठ पठन केले होते. या वेळीही त्यांच्याकडून निवडणुकीपूर्वी सिलिगुडीमध्ये दुर्गा अंगण आणि महाकाल मंदिर बांधण्याची घोषणा करण्याचे संकेत मिळाले आहेत.

एकंदरीत बदललेल्या राजकीय वातावरणाची जाणीव होत असून हिंदू मते मोठ्या प्रमाणात भाजपाकडे जाऊ नयेत, म्हणून अंशतः ध्रुवीकरणाची रणनीती ममता बॅनर्जी अवलंबत असल्याचे दिसते. ममता सरकारच्या काळात समोर आलेले राज्यपुरस्कृत भ्रष्टाचाराचे प्रकरण, विरोधकांवर दडपशाही, आरजी कार मेडिकल कॉलेज ते संदेशखलीपर्यंतचे महिलांच्या शोषणाचे आरोप, मुस्लिम कट्टरवादाला प्रोत्साहन, बेरोजगारी, स्थलांतर आणि मंद विकास हे सर्व मुद्दे तृणमूल काँग्रेसच्या विरोधात जाणारे आहेत. परिणामी भाजपा यावेळी त्यांना आव्हान देण्यास सज्ज असल्याचे दिसून येते.

# ट्रम्प यांच्यामुळे जागतिक गोंधळ

**अमेरिकेचे विक्षिप्त अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प कधी कोणता निर्णय घेतील, कौतुक करता करता कधी पायाखाली घेतील, याचा भरवसा नाही. ज्या जागतिक संस्थांच्या स्थापनेत पुढाकार घेतला, आठ दशके नेतृत्व केले, त्याच संस्थांमधून अमेरिका आता बाहेर पडत आहे. ट्रम्प यांच्या या बाबतीतील घोषणेचे अनेक परिणाम संभवतात. ते समजण्यासाठी वेळ लागेल; परंतु या स्वार्थी ट्रम्पनीतीमुळे अवघे जग गोंधळात पडले आहे.**

अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाची दिशा आणि त्याचा जागतिक परिणाम मुख्यत्वे अमेरिकेच्या देशांतर्गत राजकारणात काय घडत आहे, यावर अवलंबून असणार आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांची रचना लक्षणीयरीत्या बदलली आहे. त्यात वेगाने बदल होत आहे. जगातील सर्वात शक्तिशाली देश परिस्थिती बदलू लागतो किंवा व्यवस्था अस्थिर करू लागतो, तेव्हा इतर देशांच्या रणनीतीदेखील अस्थिर होतात. हे संक्रमण आणि हा गोंधळ आज जगभर दिसून येतो. प्रत्येक अमेरिकन प्रशासनाला अमेरिका अव्वल स्थानी राहावी, असे वाटते. ओबामा प्रशासन असो किंवा बायडेन प्रशासन; प्रत्येकाने अमेरिकन सैन्य जगातील नंबर एक लष्करी शक्ती राहावी हे सुनिश्चित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. अमेरिकेचे संरक्षण बजेट नेहमीच जगातील इतर देशांपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त राहिले आहे. ट्रम्प त्यांचाच वारसा पुढे चालवत आहेत. त्यात अधिक एकाधिकारशाही आणि मी म्हणेन तीच पूर्वदिशा, असे सूत्र आहे. अमेरिका ही दीर्घकाळापासून जगातील सर्वात शक्तिशाली लष्करी शक्ती आहे आणि ट्रम्प असो किंवा त्यांच्यानंतर कोणीही असो; कोणत्याही अमेरिकन सरकारला ही परिस्थिती बदलावी असे वाटणार नाही; पण खरा प्रश्न हा आहे की, ती लष्करी शक्ती कशी वापरली जाईल? येत्या काही वर्षांमध्ये खर्च वाढेल की नाही हा प्रश्न अधिक महत्त्वाचा असेल; परंतु ती लष्करी

**आरिफ शेख**
आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक

शक्ती कशी तैनात केली जाईल, अमेरिकन शक्ती कशी वापरली जाईल आणि जागतिक व्यवस्थेच्या स्थिरतेवर, अंदाज आणि संतुलनावर त्याचा काय परिणाम होईल, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. त्यावर आपल्याला अधिक लक्ष केंद्रित करावे लागेल.

डोनाल्ड ट्रम्प नेहमीच काही मुद्यांवर स्पष्टपणे बोलत राहिले आहेत. त्यांच्या मते, बहुपक्षीय मंच अमेरिकन सार्वभौमत्वाला कमकुवत करतात आणि त्यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' अजेंड्याशी थेट संघर्ष करतात. या दृष्टिकोनामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांपासून माघार घ्यावी लागली आहे. त्यापैकी अनेक संयुक्त राष्ट्रांच्या प्रणाली अंतर्गत येतात. भूतकाळात त्यांच्या प्रशासनाने अमेरिकेला हवामान बदलावरील पॅरिस करारासारख्या चौकटीतून बाहेर काढले आहे, संयुक्त राष्ट्रांसह आंतरराष्ट्रीय देयके थांबवली आहेत आणि जागतिक व्यापार संघटनेला प्रभावीपणे अपंग केले आहे; परंतु त्यांची नवीनतम कृती आणखी पुढे जाते. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, अमेरिकन राजकारणात संयुक्त राष्ट्रांच्या विरोधी प्रवृत्ती आहे. ट्रम्प चळवळीला जन्म देणाऱ्या कट सिद्धांतांचा हा एक सततचा भाग आहे. शिवाय, मुख्य प्रवाहातील अमेरिकन राजकारणीदेखील आंतरराष्ट्रीय न्यायालयासारख्या संघटनांमध्ये सामील होण्यास सावध राहिले आहेत. त्यांना वाटते की, ते अमेरिकेत असंवैधानिक असेल किंवा त्यांच्या सार्वभौमत्वाला कमकुवत करेल. ट्रम्प केवळ अमेरिकन राजकारणातील विद्यमान ट्रेंड एक पाऊल पुढे घेऊन जात आहेत. हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे की, ज्यो बायडेन पॅरिस करारात पुन्हा सामील झाले; परंतु त्यांच्या पूर्वसुरींनी जागतिक व्यापार संघटनेला केलेले नुकसान भरून काढण्यासाठी त्यांनी कोणतेही पाऊल उचलले नाही. म्हणून या नवीनतम बदलाचे विश्लेषण ट्रम्प यांच्या परदेशी लोकांबद्दलच्या स्पष्ट नापसंतीपेक्षा अधिक खोलवर केले पाहिजे.

या यादीतील काही संस्था निष्क्रिय किंवा तुलनेने निरुपयोगी मानल्या जाऊ शकतात; परंतु सर्वच संस्थांच्या बाबतीत तसे म्हणता येत नाही. 'संयुक्त राष्ट्रांचे हवामान बदल फ्रेमवर्क कन्व्हेन्शन' (यूएनएफसीसीसी) आंतरराष्ट्रीय स्तरावर हवामान कृतीवर सहकार्यासाठी पाया म्हणून काम करते. त्यातून पूर्णपणे माघार घेणे तसेच शास्त्रज्ञांनी पाहिलेल्या जागतिक तापमानवाढीच्या प्रत्यक्ष परिणामांवर सारांश अहवाल तयार करणाऱ्या आंतरसरकारी हवामान बदल पॅनेल (आयपीसीसी) मधून पूर्णपणे माघार घेणे अनपेक्षित आहे. सरासरी तापमानवाढ दोन अंश सेल्सिअसपेक्षा कमी ठेवण्याच्या उद्देशाने केल्या जात असलेल्या जागतिक प्रयत्नांना हा मोठा धक्का आहे. काही लहान संस्था, उदाहरणार्थ महिला आणि बाल आरोग्यावर काम करणाऱ्या संस्थांना ट्रम्प यांच्या निर्णयाचा मोठा फटका बसेल. त्या मिळणारा निधी पूर्णपणे गमावू शकतात. युरोपीय महासंघ इतर विकसित देशांना या गमावलेल्या क्षमतेची आणि निधीची भरपाई करण्यासाठी मोठा भार सहन करावा लागेल. अमेरिकेच्या या माघारीमुळे या संघटनांच्या वैधतेवर आणि ते प्रतिनिधित्व करीत असलेल्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेवरदेखील परिणाम होईल का, हा खरा प्रश्न आहे; सध्या तरी हे अशक्य दिसते. ट्रम्प अमेरिकेचे वर्चस्व राखण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यवस्थेला पुन्हा आकार देण्याचा आणि पुनर्रचना करण्याचा प्रयत्न करू शकतात; परंतु आतापर्यंत त्यांची कृती पूर्णपणे विनाशकारी ठरली आहे. ते जागतिक प्रशासन कमकुवत करू शकतात; परंतु ते विद्यमान व्यवस्थेची वैधता कमी करीत नाहीत.

ट्रम्प खरोखरच कट्टरपंथी असतील, तर निधी आणि इतर वचनबद्धतेसह एक आकर्षक पर्याय दिला पाहिजे. हे घडताना दिसत नाही. परिणामी कालांतराने अमेरिकेने सोडून दिलेली भूमिका बजावण्यासाठी चीन पुढे येईल. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे तर, ट्रम्प अमेरिकन सार्वभौमत्व मजबूत करीत नाहीत, तर त्यांचे वर्चस्व त्यांच्या सर्वात मोठ्या धोरणात्मक प्रतिस्पर्ध्याला देत आहेत. ट्रम्प यांच्या एका मोठ्या आणि आश्चर्यकारक निर्णयामुळे जागतिक राजनैतिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. अमेरिकेने ६६ आंतरराष्ट्रीय संस्था आणि उपक्रमांमधून माघार घेण्याची घोषणा केली आहे. त्यात ३१ संयुक्त राष्ट्रांशी संलग्न संस्थांचा समावेश आहे. संयुक्त राष्ट्रांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, अमेरिका कायदेशीररीत्या संयुक्त राष्ट्रांच्या संस्थांना निधी देण्यास बांधील आहे. न्यूयॉर्कमधील संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटारेस यांनी ट्रम्प यांच्या निर्णयाबाबत खेद व्यक्त केला. सदस्य राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रांच्या नियमित बजेट आणि शांतता मोहिमांसाठी दिलेला निधी हा पर्याय नसून संयुक्त राष्ट्रांच्या चार्टर अंतर्गत कायदेशीर बंधन आहे. हे बंधन अमेरिकेसह सर्व सदस्य राष्ट्रांना लागू होते. या संस्थांमधून बाहेर पडताना ट्रम्प प्रशासन म्हणते की, या संस्था अमेरिकेच्या राष्ट्रीय हितांविरुद्ध काम करीत आहेत आणि जागृत अजेंड्याला प्रोत्साहन देत आहेत. अमेरिकेने आंतरराष्ट्रीय सौर आघाडी, हवामान बदलावरील आंतरसरकारी पॅनेल, आंतरराष्ट्रीय नवीकरणीय ऊर्जा संस्था आणि हवामान बदलावरील संयुक्त राष्ट्र फ्रेमवर्क कन्व्हेन्शनमधूनही माघार घेतली आहे.

अमेरिकेने हवामान करारांमधून माघार घेण्याचा हा निर्णय अनपेक्षित मानला जात नाही. कारण ट्रम्प यांनी यापूर्वी पॅरिस हवामान करारातून अमेरिकेला माघार घ्यायला लावली होती. अमेरिकेच्या माघारीनंतरही संयुक्त राष्ट्रांनी काम सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. 'यूएनएफसीसी'चे प्रमुख सायमन स्टील यांनी इशारा दिला की, हवामान संकट अधिकाधिक गंभीर होत असताना या निर्णयामुळे अमेरिकेची अर्थव्यवस्था, रोजगार आणि राहणीमानाचे नुकसान होईल. तथापि, संयुक्त राष्ट्रांनी असेही म्हटले आहे की, भविष्यात अमेरिकेला पुन्हा सामील होण्यासाठी दार उघडे आहे. ट्रम्प यांनी स्वाक्षरी केलेल्या निवेदनानुसार अमेरिका राष्ट्रीय हिताच्या विरुद्ध असलेल्या संस्थांपासून स्वतःला दूर करीत आहे. या निर्णयात ३५ गैर-संयुक्त राष्ट्र संघटना आणि ३१ संयुक्त राष्ट्रांशी संलग्न संस्थांचा समावेश आहे. यामध्ये पर्यावरण, हवामान, ऊर्जा, कामगार, स्थलांतर आणि सामाजिक विकासाशी संबंधित अनेक प्रमुख जागतिक मंचांचा समावेश आहे. संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधी, संयुक्त राष्ट्र पाणी, संयुक्त राष्ट्र ऊर्जा आणि आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्र यासारख्या संस्थांवरही याचा परिणाम होईल. या आदेशात सर्व अमेरिकन विभागांना निधी आणि सहभाग तत्काळ बंद करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. 'अमेरिका फर्स्ट' घोषणा करता करता अमेरिकाच जगात एकटी पडण्याचा धोका आहे. तात्कालिक फायद्यासाठी जागतिक नेतृत्व गमवण्याचा धोका अमेरिकेने पत्करला आहे.



# ब्रिटिश साम्राज्यातील काळ्या-गोऱ्यांची तेढ

## मागे वळून पाहताना...

### जपानला का नाव ठेवता

जपानने महादेशावर जेव्हा स्वारी केली, तेव्हा गोऱ्या लोकांविषयी ब्रह्मी जनतेत विद्वेष उत्पन्न करणारी पत्रके काढून वर्ण-भेदाच्या तत्त्वावर प्रचार केल्याबद्दल अँग्लो इंडियन वृत्तपत्रांनी जपानच्या नावाने खडे फोडले होते. पण, अलिकडे दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या ब्रिटिश साम्राज्यातील दोन्ही स्वतंत्र राष्ट्रांत तेथे स्थायिक झालेल्या हिंदी लोकांविरुद्ध जे अन्यायाचे आणि अतिक्रमणाचे प्रकार चालू आहेत, ते पाहिल्यावर जपानच्या प्रचाराविरुद्ध तक्रार करण्याचा गोऱ्या किंवा निम-गोऱ्या लोकांना आणि त्यांच्या वृत्तपत्रांना काय हक्क आहे, असेच कोणीही विचारील. दक्षिण आफ्रिकेत दरवान येथे ता. ८ रोजी हिंदी शाळेच्या इमारतीचा कोनशिला समारंभ आफ्रिकन गृहमंत्र्याच्या हस्ते व्हावयाचा होता. पण, युरोपियन नागरिकांनी या इमारतीच्या उभारणीला हरकत घेतल्यामुळे तो समारंभ पुढे ढकलावा लागला. त्याचप्रमाणे दरवान येथे निर्भेळ हिंदी वस्तीचे एक स्वतंत्र उपनगर निर्माण करण्याचा तेथील नगरपालिकेचा विचार असल्याची जी दुसरी बातमी लगोलगच आली आहे, ती या जखमेत मीठ भरणारी आहे. हिंदी लोकांचे स्वतंत्र उपनगर म्हणजे काय? स्वतंत्र उपनगर म्हणजे जशी हिंदी लोकांची ही गोऱ्या वस्तीबाहेरची स्वतंत्र बहिष्कृत वसाहत होय.

### नाझीपेक्षा तुम्ही निराळे कसे?

दक्षिण आफिकेत हे प्रकार चालू असता ब्रिटिश सरकारने ऑस्ट्रेलियाचे मध्यपूर्व युद्ध मंडळांतील प्रतिनिधी रिचर्ड केसी यांना बंगालच्या गव्हर्नर पदावर नेमून प्रक्षुब्ध हिंदी लोकमताला बुद्धिपुरस्सर डिवचलेले दिसते. केसी यांच्या नेमणुकीला लष्करी कारणे आणि महत्त्व आहे, हे उघड आहे. बंगाल-आसाम प्रांत हे ईशान्य रणक्षेत्राला भिडलेले असल्यामुळे व त्या रणांगणाशी ऑस्ट्रेलियाचे हितसंबंध

शतकभराच्या गौरवशाली वाटचालीत दैनिक तरुण भारत अनेक ऐतिहासिक प्रसंगांचा साक्षीदार राहिला. ज्या प्रसंगांनी देश घडविला, समाज ढवळून काढला असे असंख्य प्रसंग आम्ही छापील स्वरूपात जपून ठेवलेत. त्या काळात छापलेले ते शब्द आजही तितकेच प्रासंगिक आणि विचार करण्यास भाग पाडणारे आहेत. यातील महत्त्वाचे लेख, अग्रलेख, बातम्या, छायाचित्रे इ. पुनर्प्रकाशित करून वाचकांना इतिहासाच्या पुनर्भेटीचा आनंददायी प्रत्यय देणारा हा नवाकोरा स्तंभ... खास आमच्या वाचकांसाठी!

गुंतलेले असल्यामुळे युद्धग्रस्त बंगालच्या गव्हर्नर पदावर पूर्वेकडील लष्करी डावपेचांची माहिती असलेल्या ऑस्ट्रेलियन मुत्सद्याची नेमणूक ब्रिटिश सरकारने करावी, हे स्वाभाविक होय. पण, ती करताना हिंदी लोकमताची जी अवज्ञा ब्रिटिश सरकारने केली, ती इतकी काही अक्षम्य आहे की, ऑस्ट्रेलियाचे एक मंत्री एडवर्ड बॉर्ड यांनाही तिच्याबद्दल पर्यायाने नाराजी व्यक्त करावी लागली आहे. पण, ती करताना ऑस्ट्रेलियन मजूर पक्षाच्या हिंदविद्वेषी धोरणाची जी तरफदारी त्यांनी केली आहे, ती पाहून मात्र त्यांच्या लज्जाशून्यतेने कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही. बार्ड यांनी असे म्हटले आहे की, ऑस्ट्रेलियातील मजूर पक्षाचा हिंदी लोकांच्या ऑस्ट्रेलियात येण्याला आणि स्थायिक होण्याला जो


तरुण भारत
ब्रिटिश साम्राज्यांतील काळ्या-गोऱ्यांची तेढ !

विरोध आहे, तो केवळ आर्थिक कारणांमुळेच होय. त्याचा वैशश्रेष्ठत्वाच्या किंवा वर्णद्वेषाच्या कल्पनाशी काहीही संबंध नाही. वंशाच्या आणि वर्णाच्या उच्चतेचे तत्त्व हे नाझी तत्त्व असून खऱ्या लोकसत्तावाद्याला ते कधीही मान्य होणार नाही. पण स्वतःच्या गोऱ्या रंगाचा गर्व वाहून काळ्या किंवा पिवळ्या कातडीच्या लोकांना दक्षिण आफ्रिकेत नांदावयाला जे गोरे ब्रिटिश साम्राज्यवादी आज विरोध करीत आहेत, ते नाझीपेक्षा कोणत्या बाबतीत निराळे आहेत, हे बॉर्ड सांगू शकतील काय?

### हाय कमिशनरची नेमणूक कोण करणार?

एडवर्ड बॉर्ड यांच्याप्रमाणेच बंगालचे उगवते गव्हर्नर रिचर्ड केसी यांनी हिंदुस्थानची सहानुभूती संपादन करण्याच्या मतलबानेच बहुधा, असे उद्गार काढले आहेत की, हिंदुस्थानाविषयी ऑस्ट्रेलियन जनतेला दिवसेंदिवस जास्त आस्था वाटत असून, ऑस्ट्रेलियाला हिंदुस्थानाशी आपला निकट संबंध यावा, अशी उत्कट इच्छा आहे. याचे एक अगदी ताजे प्रत्यंतर असे आहे की, माझे मित्र सर ईव्हन मॅके यांना ऑस्ट्रेलियाने आपले हिंदुस्थानातील हाय कमिशनर म्हणून दिल्ली येथे पाठवले असून हिंदुस्थान सरकारने आपला हाय कमिशनर ऑस्ट्रेलियात नेमावा, अशी आपली इच्छा ऑस्ट्रेलियन सरकारने हिंदुस्थान सरकारला कळविली आहे. केसी यांनी ऑस्ट्रेलियाच्या हिंदुस्थानविषयीच्या वाढत्या जिव्हाळ्याचे जे हे प्रत्यंतर सांगितले, त्याचा विचार मागाहून करू. पण, ऑस्ट्रेलियात जो हा हिंदी हाय कमिशनर लवकरच नेमला जाण्याचा संभव आहे, त्याची नेमणूक ओव्हरसीज म्हणजे परद्वीपस्थ खात्याकडून होणे अवश्य असता ती त्या खात्याकडून न होता, तो अधिकार उद्योगधंदे खात्याच्या कार्यमंत्र्याकडे जावा, असा जो प्रच्छन्न निमसरकारी प्रचार दिल्लीहून सध्या चालू आहे, त्याचे कारण काय? ना. डॉ. खरे यांनी दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्नाबाबत ठोस्यास ठोसा देण्याचे जे कणखर धोरण अवलंबिले, ते दुःसह झाल्यामुळे तर त्यांच्या खात्याकडे असलेला ऑस्ट्रेलियातील हिंदी हाय-कमिशनरच्या नेमणुकीचा अधिकार काढून घेण्याचे कारस्थान शिजू लागलेले नसेल ना? हिंदुस्थान सरकार जर हा अधिकार खरोखरीच परद्वीपस्थ खात्याकडून काढून घेऊन उद्योगधंदे खात्याला बहाल करील, तर डॉ. खरे यांच्या प्रतिकाराच्या लढाऊ धोरणाला शह देण्याचा हा त्यांचा एक डाव आहे, असेच म्हणावे लागेल.

### हिंदुस्थानावर अनेकमुखी अधिराज्य

केसी यांनी रुटरला दिलेल्या मुलाखतीत हिंदुस्थानविषयी ऑस्ट्रेलियन जनतेचा जिव्हाळा दिवसेंदिवस वाढत असल्याचे जे सांगितले, ते अगदी स्वाभाविक आहे. आजपर्यंत हिंदुस्थानची गांजणूक आणि पिळवणूक एकट्या ब्रिटिश सरकारनेच केली. पण, चालू युद्धातील जपानच्या प्रशांत महासागरातील प्राबल्यामुळे हिंदुस्थानावर आपले लक्ष अधिकाधिक केंद्रित केल्याशिवाय ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि अमेरिका या तिघांनाही आता गत्यंतर उरलेले नाही. आजवर केवळ बाजारपेठ म्हणून किंवा हवे तितके गुलामी वृत्तीचे कष्टाळू कामगार पुरविणारी दलित भूमी म्हणूनच त्यांनी हिंदुस्थानकडे पाहिले. पण, आता केवळ प्रशांत महासागरातीलच नव्हे, तर पूर्वेकडील आपल्या सर्वच हितसंबंधांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने जपान आणि रशिया यांना शह देण्याकरिता हिंदुस्थानचा लष्करी, आरमारी आणि वैमानिक बाबतीत होणारा उपयोग लक्षात घेऊन ते या ब्रिटिश साम्राज्यातील परतंत्र राष्ट्राकडे पाहात आहेत.

भावी काळात जपानच्या म्हणा किंवा रशियाच्या म्हणा आक्रमणापासून इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिका यांचा बचाव करणारा हिंदुस्थान हा लष्करी, आरमारी आणि हवाई तळ आहे. हिंदुस्थानाची जी इतकी चापलुशी आज ऑस्ट्रेलियन मुत्सद्यांनी चालविली आहे, ती या जाणिवेने! पण, काळ्या-गोऱ्यांतील तेढ वाढविणारे आपले धोरण जोपर्यंत ब्रिटिश साम्राज्यातील हे पांढरे देश सोडत नाहीत, तोपर्यंत असल्या फुकट्या तोंडपुजेपणाने कोण फसणार?

(पूर्व प्रसिद्धी : १२ जानेवारी १९४४)

## सिनेसृष्टी

रमेश विनायक पोफळी
७७७५९००८२४

### काळाच्या पुढचा गीतकार


गुलजार

'आनेवाला पल, जानेवाला है हो सके तो इसमे
जिंदगी बिता दे पल ये जो जानेवाला है...'

१९७९ सालच्या 'गोलमाल' चित्रपटात गुलजार यांनी काळाचा महिमा उद्धृत केलेले हे अर्थपूर्ण गीत आहे. किती साधे शब्द! तसे पाहिले तर मोजक्याच शब्दांची उलथापालथ केली असूनही शब्द अर्थहीन होत नाही. 'एक बार वक्त से लम्हा गिराखवहाँ दास्ता गिरी लम्हा नही...' यांसारख्या अंतऱ्यात काळाच्या विरळपणावर भाष्य आहे. दिग्गज संगीतकार आर. डी. बर्मन (पंचमदा) यांनी जरा हटके वाट शोधणाऱ्या संदेशात्मक चित्रपटांसाठीच गुलजार यांची निवड केली व त्यांच्या काव्याला संगीताच्या देव्हाऱ्यात बसविले.

'मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा है
वो राख बुझा दो, मेरा वो सामान लौटा दो'

१९८७ सालच्या 'इजाजत'साठी गुलजार यांनी हे गाणे पंचमदा यांना दिले. हे गद्यरूपी गाणे वाचून ते वैतागले. गुलजार ठामपणे म्हणाले, पडद्यावरील प्रसंगात याच ओळी नायिकेच्या भावना व्यक्त करू शकतील. झालेही तसेच. या गद्यमय गाण्यात अविश्वसनीय होत चाललेल्या समाजात मानसिक स्वास्थ सावरून तयार होणाऱ्या स्त्रीची अवस्था दर्शविली आहे. ही स्त्री नायिकेच्या समर्पणाला विसरायला सांगते. प्रेमातील उत्सर्ग तिच्यासाठी अर्थहीन असतो.

'चप्पा चप्पा चरखा चले औनी बौनी
आरिया तेरी बौनी बौनी बेरिया तले'

१९९६ सालच्या 'माचीस' चित्रपटातील या गाण्यात पंजाबमधील हिमाच्छादित प्रदेशातील बोली भाषेचा वापर करून वास्तवता प्रदान केली आहे. ८० च्या दशकातील पंजाबमधील दहशतवादाच्या पृष्ठभूमीवर चरख्याचा वापर, विद्रोह, आत्मनिर्भरता व आपल्या अधिकारासाठी संघर्षाचे प्रतीक म्हणून केला आहे.

'ए गोरी चटकोरी जो, कटोरीसे खिलाती थी
जुम्मे के जुम्मे जो, सुरमे लगाती थी
कच्ची मुंडेर के तले...'

ग्रामीण संस्कृतीची आठवण करून देणाऱ्या शब्दात गतकाळाच्या स्मृती जागवून उदासीनतेची छटाही पेरली आहे.

'आपकी आंखोमे कुछ महेके हुये से ख्वाब है
आपसे भी खूबसूरत आपके अंदाज है...'

१९७८ सालच्या 'घर' चित्रपटातील या रोम्यांटिक गाण्यात गुलजार यांनी प्रेमाचे विविध रंग वापरले आहे. तेवढ्याच उत्कंठतेने नायिका उत्तरते- 'आपके आंखोमें कुछ महेके हुये थे राज है...' चपखल शब्द योजनेतून उत्कट प्रेमभावना व्यक्त होणाऱ्या आशयघन रचना गुलजारचे वैशिष्ट्य होते.

'तुमसे नाराज नही, जिंदगी हैरान हूँ मै
तेरे मासुम सवालोंसे परेशान हूं मै...'

'मासूम'मधील या गाण्यात बापावर लेकाला होस्टेलमध्ये ठेवण्याच्या प्रसंगी बापाच्या मनातील भावनिक घालमेल सोप्या शब्दात उत्कटतेने वर्णिली आहे.

'मोरा गोरा अंग लईले, मोरे शाम रंग दै दे
छुप जाऊंगी रात ही मै, मोहे पी का संग दै दे'

१९६३ सालच्या 'बंदिनी'मध्ये गुलजार यांचे हे पहिले चित्रपट गीत होते.

'कुछ खो गया है पाय के कुछ पा लिया गवाईके
कहाँ ले चला है मनवा ख मोहे बावरी बनाईके'

उदात्त नायिकेच्या समर्पण भावनेची कलात्मक देवाणघेवाण असणाऱ्या, प्रेमातील उत्सर्गाला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या या गीताने चित्रपटात त्यांचे आसन पक्के झाले. गुलजार यांनी सिनेमातील प्रचलित छायावादी प्रतिमेला अव्हेरून काव्याची नवीन जमीन निवडली. गूढ दार्शनिकतेला लोकप्रिय बनविण्याचे कसब शैलेंद्रनंतर गुलजारमध्येच दिसले. लोकजीवनातल्या शब्दांना नवीन अर्थ देणारे काव्य त्यांनी रचले. साहित्याच्या सोपानाने ते सिनेगीतकारापर्यंत पोहोचले.

'मैने तेरे लिये ही सात रंग के सपने चुने
सपने सुरीले सपने...'

जीवनाच्या प्रत्येक क्षणावर उदात्त प्रेम करणारे, मृत्यूच्या आधीच मृत्यूचा विचार न करणारे राजेश खन्ना १९७१ सालच्या 'आनंद' चित्रपटात हे गाणे म्हणतात. अशा अवस्थेतील मन:स्थितीच्या मनुजाचे मानस अचूक टिपणारे गुलजार पुढे लिहितात-

'रुठी राते, रुठी हुयी रातोंको मनाया कभी
तेरे लिये मिठी सुबह को जगाया कभी' घरगुती मैफलीत, अतिशय दिलखुलास व आनंदाने राजेश खन्ना प्रेयसीच्या आठवणीतले गाणे म्हणून गुलजारच्या शब्दांना जागवितात. भविष्यातील अटळ औदासीन्यावर पडदा टाकतात. अर्थात या सुपर स्टारने अभिनयाची बाजी लावून प्रसंग वठविला आहे. या चित्रपटातील खालील आयकॉनिक संवाद गुलजार यांनीच लिहिला आहे-

'बाबु मोशाय, जिंदगी बडी होनी चाहिये, लंबी नही, जिंदगी और मौत उपरवालेके हात मे है, उसे ना तुम बदल सकते ना मै, हम सब तो रंगमंच की कठपुतलीयां है। जिनकी डोर उपरवालेके उंगलीयोमे बंधी हुयी है, कब कोण कैसे उठेगा ये कोई नही बता सकता...'

महान कलाकार, गीतकार व संवादामुळे 'आनंद' अमर झाला. यात गुलजारची दोन गाणी व कविवर्य योगेश यांची बाकी गाणी होती.

'दिना एक गाव- संपूर्णसिंह एक नाव' असा स्वतःचा परिचय करून देणारे गुलजार नावाप्रमाणेच काव्याच्या उद्यानात आपल्या शब्दसंपत्तीने व कल्पकतेने डवरले होते. त्यांचा जन्म १८ ऑगस्ट १९३६ रोजी पंजाब प्रांतात शीख कुटुंबात झाला. लखनौ येथे खालसा स्कूल व नॅशनल कॉलेजला शिक्षण घेतले. ते १० वर्षांचे असताना फाळणीच्या झळांनी त्यांचे कुटुंब होरपळले व कसेबसे दिल्लीला आले. बालमनावर कोरलेले दृश्य त्यांनी काव्यात उतरविले.

'शहर में आदमी कोई भी नही कत्ल हुवा
नाम थे लोगोंके जो कत्ल हुये, सर नही काटा किसीने भी। कही पर लोगोने टोपीया काटी थी, की जिनमे सर थे।'

सुरुवातीपासूनच त्यांच्या काव्याची जातकुळी अशी भेदक होती. मिर्झा गालिबच्या काव्याचे त्यांना बालपणापासूनच वेड होते. त्यासाठी ते उर्दू शिकले. मुंबईत आल्यावर ते बिमल रॉय यांच्या सान्निध्यात आले व त्यांचे सहायक दिग्दर्शक बनले. 'बंदिनी' चित्रपटाद्वारे सिने गीतकार बनले. त्यांच्या यशाची खरी चव ते निर्माता, दिग्दर्शक, पटकथाकार व संवाद लेखक बनले तेव्हा कळली. १९७१ सालचा 'मेरे अपने' हा दिग्दर्शक म्हणून पहिला चित्रपट. त्यात तरुणांतील संघर्ष अप्रतिम उलगडवून दाखविला. 'कोई होगा जिसको अपना' हे गाणे खूप गाजले. १९७२ सालच्या 'परिचय' चित्रपटाद्वारे दिग्दर्शक म्हणून शिक्कामोर्तब झाले.

'बिते ना बितायी रैना बिरहा की जाई रैना
भिगी हुयी अखियोंने लाख बुझाई रैना।'

१९७२ च्या परिचय सिनेमांतले गुलजार यांचे भावपूर्ण विरही गीत जया भादुरी व संजीव कुमारवर चित्रित झाले आहे. यात एका शिक्षकाच्या जीवनातील संघर्ष दाखविताना गुलजार यांचे दिग्दर्शन जागोजागी झळकते.

'मुसाफिर है यारो ना घर है ना ठिकाना' जितेंद्रवर चित्रित हे गीत अत्यंत लोकप्रिय झाले होते.

'दो नैनो में आसू भरे है निंदिया कैसे समाये'

दोन्ही नयन अश्रूंनी भरल्यावर निद्रेला जागा कशी मिळेल? गुलजार यांची ही 'खुशबू' चित्रपटातील काव्य कल्पना हेमा मालिनी यांनी अभिनयाचा कस लावून पडद्यावर उत्कृष्ट साकार केली.

'जाने कैसे बितेगी ये बरसाते' (बसेरा) चित्रपटातील गुलजार यांच्या या गीतातील शब्द लाघवाला रेखाने चेहऱ्यावरील उदास व सर्वस्व लुटल्या गेल्याचा अप्रतिम भाव प्रकट करून स्वतःला अभिनयपटू सिद्ध केले.

'तुम आ गये हो नूर आ गया है
नही तो चरागोसे लौ जा रही थी...'

१९७५ सालच्या 'आंधी'तील वरील गाण्यात, गुलजार यांचे मुक्तप्रेम उधळणारे शब्द, संजीव कुमार व सुचित्रा सेन यांच्या मनातल्या अनावर प्रीतीचा प्रत्यय देणारे ठरले. छोट्या व सोप्या शब्दात काव्य लिहिणारे गुलजार यांना दिव्यातील रोशनीचा दृष्टांत फार आवडतो. त्यांच्या अनेक गाण्यात प्रसंगानुसार ते पेरतात. ते पुढे लिहितात.

'ख्वाबो के दिये आंखोमे लिए वही आ रहे थे
जहांसे तुम्हारी सदा आ रही थी...'


स्वप्नातील तेज डोळ्यात साठवून तिथेच यायचे होते जिथे तुझे निरंतर वास्तव्य आहे. नैसर्गिक वा वस्तुनिष्ठ दृष्टांताद्वारे पडद्यावरील प्रसंगाला अनुरूप अर्थ प्राप्त होत असे. संत मीराबाईजी काळाच्या पुढे जाऊन आचरण करीत कृष्णभक्ती करायची तिला पहेली विद्रोहिनी स्त्री अर्थात फर्स्ट फेमिनिस्ट म्हणतात. तिच्या जीवनावर गुलजार यांनी चित्रपट काढला. या चित्रपटातील अंतिम प्रसंगात मीरा कृष्ण मंदिराकडे वाटचाल करते. मागे तिच्या पावलांचे ठसे उमटलेले दिसतात. या दृश्याबद्दल गुलजार म्हणतात, 'शी लेफ्ट हर फूटप्रिंट्स ऑन द सेंड ऑफ लाईफ.'

'जय हो! जय हो!! जय हो!!!'
'आजा आजा जिंद शामियानोके तले
आजा जरीवाले निले आसमान तले
जय हो.. जय हो..'

२०१० सालच्या 'स्लम डॉग' या ऑस्कर विजेत्या चित्रपटातील हे 'टायटल ट्रॅक' गाणे गुलजार यांच्या लेखणीतून उतरले व त्यांच्या जीवनात सर्वात मोठे यश मिळाले. ए. आर. रहेमान च्या संगीतात सुखविंदर सिंग, तन्वी शाह व ए. आर. रहेमान यांनी गायलेल्या या गाण्याला आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त झाली. या दोघांनाही अनेक पुरस्कार मिळाले. सर्वोत्कृष्ट मूळ गाण्यासाठी अकॅडमी पुरस्कार मिळाला. एवढे संवेदनशील गीतकार, दिग्दर्शक व स्त्री जीवनातील क्रांतिकारी स्वरूप चित्रपटात प्रदर्शित करणारे गुलजार स्वतःच्या वैयक्तिक जीवनात तेवढे यशस्वी झाले नाही. प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री राखीसोबतचे वैवाहिक जीवन मेघना या कन्येला जन्म दिल्यावर काही दिवसातच डळमळीत झाले.

गुलजार यांना २२ फिल्म फेअर पुरस्कार, साहित्य अकॅडमी पुरस्कार १, अकॅडमी पुरस्कार १, ग्रामी पुरस्कार १, पद्मभूषण पुरस्कार २००४ साली. दादासाहेब फाळके पुरस्कार २०१३ साली. गुलजार हे सध्या ९१ वर्षांचे असून आजही ते आपल्या लेखन व काव्य कार्यात सक्रिय आहेत. त्यांचे जीवन असेच यशाने उजळो व त्यांचे योगदान चित्रपटसृष्टीला पुढेही मिळत राहो, हीच सदिच्छा!

'आनेवाला पल जानेवाला है
हो सके तो इसमे जिंदगी बिता दे...'



## कथा

हेमा नागपूरकर
९८९०११९८७४




राजस्थानातील त्या रणरणत्या वातावरणात सकाळी साडेसातला ऊन चांगलंच जाणवू लागल होतं. मॉर्निंग वॉक करून परतलो तो घामाने चिंब भिजूनचं. आता पटकन आंघोळ करून तयार व्हायचा होतो. नेहमीच्या रुटीन कामात साडेआठ वाजता आम्ही कामाला सुरुवात करीत असतो. माझा मित्र श्रीनिवास कधी त्याच्या तर कधी माझ्या गाडीतून सोबतच जायचो. राजस्थानातील एलओसीजवळच्या एअर बेस कॅम्पवर राहत असलो, तरी तिथला परिसर एवढा मोठा होता की, आम्हाला जवळजवळ १० किलोमीटर जावं लागायचं. माझं काम रडार नियंत्रण कक्षातलं. माझं युनिट जरा लांब होतं. मग मला सोडून श्रीनिवास आपल्या कामावर जायचा. आंघोळ-नास्ता करून तयार होतोय तोच बाहेरून श्रीनिवासची हाक आली- 'अमर चलो.' आम्ही माझ्या युनिटपाशी पोहोचलो तेव्हा श्रीनिवास म्हणाला,

''खाना साथ मे खायेंगे. मी येतो तुला न्यायला.''

'बरं-' असं म्हणत मी आत वळलो. हाताखालच्या स्टाफला आवश्यक त्या सूचना देऊन काही पेपर वर्क करू लागलो. तेवढ्यात माझा एक ज्युनिअर धावत आला.

''सर मॉनिटर पे देखो बहूत बडा हादसा हुआ है!'' मी मॉनिटर लावला. बैसास व्हॅलीत दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. बैसास व्हॅलीतील हे स्थळ अतिशय रमणीय हिरव्यागार वृक्षराजींनी वेढलेले; त्याला 'मिनी स्वित्झर्लंड' म्हणतात. हनिमूनसाठी अथवा पर्यटन करण्यासाठी अनेक लोक तिथे येत असत. व्हॅली आत असल्याने तिथे मोबाईलसुद्धा चालत नसत. याचाच फायदा घेत दहशतवाद्यांनी तिथे निर्घृण हत्याकांड चालवले. हिंदू की मुस्लिम असे विचारत हातातल्या बंदुकींनी त्यांनी तब्बल २६ लोकांचे प्राण घेतले होते. हे सगळं ऐकून सर्वांगातून संतापाची लहर शिरशिरत गेली. श्रीनिवासही आला तेवढ्यात. तोही संतापाने खदखदत होता.

''सुना तुमने! ये नापाक पाकडेही है इसके पीछे. चांगलं हानायला पाहिजे यांना! तब कई अकल ठिकाणे आयेगी'' या अतिरेकी दहशतवादी संघटना कोणाच्या छायाछत्राखाली राहतात, हे साऱ्या जगालाच ठाऊक होतं. पाकिस्तानी शासनकर्ते, पाकिस्तानी लष्कर या अतिरेक्यांचे बटिक आहेत. त्यांनी दिलेल्या पैशांचे मिंध्ये. हे माहीत असल्यामुळे त्याचा अगदी बीमोड म्हणजे पाकिस्तानवर हल्ला हे समीकरण असणार होतं. हल्ल्याच्या निषेधार्थ पंतप्रधान नरेंद्र मोंदी यांनी दिलेले भाषण पुढल्या कारवाईची सूचना देणारे.

'असल्या अतिरेकी कारवाया आता खपवून घेतल्या जाणार नाहीत. दहशतवादाचे उच्चाटन करण्याचा आम्ही विडा उचलला असून दहशतवादाविरोधातील लढाई त्याचा संपूर्ण नाईनाट करूनच थांबेल.' पंतप्रधानाच्या या भाषणानंतर आता मोठे काहीतरी घडणार, अशी आम्ही सर्वांनीच अटकळ बांधली. दहशतवादविरोधातील लढाईचे भारताने जणू रणशिंग फुंकले. अर्थात पाकिस्तानच्या सीमेलगतच्या कुरापतींनी सगळे लष्करी जवान संतापलेले होतेच. दहशतवाद्यांना आणि पर्यायाने पाकिस्तानलाही धडा शिकवण्याची खुमखुमी होतीच. आम्हा सर्वांना तयार राहण्याचे आदेश मिळाले. यावेळची कारवाई बरीच मोठी असणार, याबद्दल शंकाच नव्हती. लष्करात दाखल झालेला प्रत्येक जवान युद्धजन्य परिस्थितीला तोंड कसे द्यावे, ती कशी हाताळावी याबद्दलचे ट्रेनिंग घेत असतो. आपले कौशल्ये सिद्ध करण्यासाठी तो उत्सुक असतो. लष्करात दाखल होण्याला मला उणीपुरी दोन वर्ष झालेली. एवढ्या लवकर आपल्या शिक्षणाचा कस लागणार, आपल्याला आपले शौर्य दाखवायला वाव मिळणार या जाणिवेने समाधान वाटत होते. माझ्या इतर मित्रांचीही अशीच अवस्था होती. आम्ही सारे देशप्रेमाने भारावलेलो. जयशेमोहम्मद, लष्कर-ए-तोयबा, हिजाब-अल-मुजाहिद्दीमा या व अशा दहशतवादी संघटनांनी आलिशान कार्यालये आणि त्यांच्या प्रमुखांची अद्ययावत घरे पाकिस्तानात उभी आहेत, हे उघड गुपीत होतं. दहशतवाद्यांच्या लिडर्सना ताबडतोब आपल्या हवाली करण्यात यावे अन्यथा परिणामांना तयार असावे अशा आशयाचे पत्र भारताकडून दिले गेले. पाकिस्तानची अरेरावी अर्थातच कमी झाली नाही. दहशतवादाविरोधात आपण कारवाई करू शकतो, हे भारताने साऱ्या जगालापण जाहीर केले. इकडे ऑपरेशना सिंदूरची योजना आखली जात होती.


आम्हा सर्वांना तयार राहण्याचे आदेश मिळाले होते. मात्र त्याचे तपशील वेळेवर मिळणार होते. आमच्या बेसकॅम्पवरील बऱ्याच जणांनी आपल्या बायका-मुलांना सुरक्षित घरी पाठवून दिले; मात्र त्यातील काही गृहिणी आणि सामान्य काम करणाऱ्यांनी आमच्या मदतीसाठी तिथेच राहण्याचे ठरविले. माझ्या युनिटमधील माझ्या हाताखाली काम करणारे आणि त्यांची कुटुंबे यांच्या संरक्षणाची आणि सुरक्षिततेची जबाबदारी माझ्यावर होती. सर्व यंत्रणांनी आणि फौजींनी आपले निहीत कार्य चोखपणे पार पाडावे, याचाही ताण मनावर होताच. तीन दिवसांपासून आम्ही आमच्या युनिटमध्येच होतो. एके दिवशी अंधार झाल्यावर एअर रेड अलार्म वाजू लागला. आमच्या तळावर पाकिस्तानने ड्रोन हल्ला चढवला होता. अशा वेळी पूर्णपणे अंधार करायचा असतो. शत्रूला आपला ठावठिकाणा कळू नये यासाठीची ही खबरदारी. सर्व दिवे बंद करून आम्ही खंदकात लपलो. सायरन बंद होताच आम्ही खंदकातून सरपटत बाहेर आलो. आमच्या ट्रेनिंग काळात अशा सर्व प्रकारच्या परिस्थितीत कसे वागावे, याचे प्रशिक्षण दिले जाते. आम्ही बाहेर येताना आमच्या हातात मशीनगन्स होत्या. कॉड कॉप्टरसारखे कमी उंचीवरून येणारे ड्रोन्स मशीनगन्सने उडवायचे, दोन ते पाच हजार फूट उंचीवरून येणारे मध्यम क्षमतेचे ड्रोन्स उडवण्यासाठी क्षेपणास्त्र आणि ३५ ते ४० हजार फूट उंचीवरून येणाऱ्या क्षेपणास्त्रांना मिसाईलनी उडवायचे, अशी आमची रणनीती होती. येणारे ड्रोन कोणत्या प्रकारचे आणि किती उंचीवर आहेत हे आमची रडार यंत्रणा आम्हाला दाखवत होती. त्यानुसार त्यांना नष्ट करण्यासाठी कुठल्या प्रकारची क्षेपणास्त्र वापरावी लागतील, हे ठरवून त्याप्रमाणे उपाययोजना करीत होतो. त्यांचे हल्ले आम्ही हवेतल्या हवेतच उडवून होतो. त्याचवेळी त्यांच्यावर प्रतिहल्ले केले जात होते. कानठळ्या बसवणारे आवाज आणि दिवाळीच्या फटाक्यासारखी आतषबाजी आकाशात दिसत होती. पाकिस्तानकडून येणारे सारे ड्रोन, सारे बॉम्ब हवेतच उडवून लावण्यात आम्ही यशस्वी झालो होतो. याला एकच अपवाद. एका पोस्टवर तैनात असलेल्या माझ्या मित्रापासून अवघ्या शंभर-दीडशे मीटरवर एक बॉम्ब पडला होता. त्याने १५ बाय ९ फूट आत एवढा मोठा खड्डा तयार झाला होता. तो पाहूनच त्याची क्षमता लक्षात येत होती.

भारताने दहशतवाद्यांच्या इमारतींवर नेमके हल्ले चढवून योजनाबद्धरीतीने दहशतवाद्यांच्या कारवायांची स्थळे जमीनदोस्त करण्यात आली. आपल्या क्षेपणास्त्रांनी पाकिस्तानची रडार यंत्रणा निकामी करण्यात यश मिळविले तर अचूक बॉम्ब वर्षावाने त्यांच्या विमानाच्या धावपट्ट्या उद्ध्वस्त करण्यात आल्या. भारताच्या या अचूक कारवाईने पाकिस्तानला नमविले आणि सारे जग अचंबीत होऊन बघत राहिले आणि आम्ही दहशतवादाचा पूर्ण नायनाट झाल्याशिवाय ऑपरेशन सिंदूर थांबणार नाही. 'ऑपरेशन सिंदुर अभी खत्म नही हुआ है।' असे पंतप्रधानांनी ठणकावून सांगितल्यामुळे आम्ही पुढच्या तयारीला लागलो होतो.

## दीपमाळ

प्रकाश एदलाबादकर
९८२२२२२११५

# जैसे लोह परिसें पालटला तो लोखंड न होय



देवासमोर नंदादीप शांतपणे तेवत होता. देवपूजा आटोपली होती. देवासमोर लावलेल्या उदबत्तीचा मंद सुगंध आणि देवाला वाहिलेल्या फुलांचा गंध यांचा मिश्र गंध पसरला होता. संत गजानन महाराजांच्या चरित्रावरील 'गजानन विजय' या पोथीचा रोज एक अध्याय मी वाचत असतो. तो ग्रंथ हातात घेतला. कपाळाला लावला. ग्रंथामधील खूण (बुकमार्क) बाजूला केली. आज पाचवा अध्याय वाचायचा होता. अनेकदा पारायणे केल्याने ग्रंथ पाठ नव्हता झाला, पण ओळखीचा झाला होता. संतश्रेष्ठ दासगणू महाराजांनी लिहिल्यानुसार त्याची प्रचीती येत होती. एखाद्याने लिहिलेल्या शब्दांनी आपल्या मनाला वेगळे वळण मिळून एका प्रकाशाच्या मार्गाकडे आपला प्रवास सुरू होणे यालाच साक्षात्कार म्हणत असावे. एक तर दासगणू महाराजांचे अत्यंत प्रवाही आणि प्रासादिक लेखन आणि त्याला निर्व्याज भक्तीचा सुगंध! हा अनुभव घ्यावा लागतो. साहित्य म्हणजे, जीवनाच्या सहित जाते ते, असे आचार्य विनोबा म्हणतात; ते समर्पकच आहे. म्हणून 'गजानन विजय' या ग्रंथाकडे केवळ एक पोथी म्हणून न बघता तो अध्यात्म आणि व्यवहार यांची सांगड घालणारा अप्रतिम ग्रंथ आहे, हेसुद्धा लक्षात घ्यायला हवे. मात्र तशी श्रद्धा आणि विश्वास मनात हवा.

'हे गजानन चरित्र भागीरथी। कथा या तोय निश्चिती।
महाराष्ट्र ओव्या तयावरती। लहरी समाज विबुधहो॥
वा कल्पवृक्ष हे स्वामीचरित। शाखा अध्याय तयाप्रत।
पद्यरचना हीच सत्य। पालवी ह्या वृक्षाची॥'

...पाचवा अध्याय वाचायला सुरुवात केली. त्याच्या शेवटाकडे जसजसा येतो तसे दरवेळेस माझे डोळे पाझरू लागतात. कारण त्या अध्यायातील भास्कराची कथा. आजच्याच सारखे वैशाखातील रणरणते उन्ह. महाराज तहानलेले आहेत. पाण्यासाठी वावरा-शिवारातून भटकत आहेत. भास्कराने त्याच्या जवळचे पाणी द्यायचे नाकारले आहे. महाराज एका विहिरीजवळ येतात. ती विहीर गेली बारा वर्षे कोरडी आहे. पाण्याचा एक थेंबही नाही. महाराज आपल्या लीलेने तिला जलमय करतात. येथे माझ्या अल्पमतीला प्रश्न पडतो की, महाराजांजवळ एवढे सामर्थ्य होते तर ते भास्कराकडे पाणी मागायला गेलेच कशाला? परंतु संतांच्या कृतीची खरी गोम इथेच आहे. कोरड्या विहिरीला पाणी आणून महाराजांना काही चमत्कार करायचा नव्हता. प्रपंचाच्या आणि व्यवहाराच्या तापाने भास्कराच्या मनातील नष्ट झालेला भक्तीच्या ओलाव्याला पुन्हा पाझर फुटावा, हा महाराजांचा हेतू होता. जिथे ओलावा असेल तिथेच पाझर फुटतो. भास्कर जरी म्हणत असला की, माझ्या मनाची विहीर कोरडी होती, तरी भास्करच्या मनात ओलावा नव्हता, असे नाही. त्याचे स्मरण फक्त महाराजांनी करून दिले.

'माझा निश्चय हीच विहीर। कोरडी ठणठणीत साचार।
होती दयाळा आजवर। थेम्ब नव्हता पाण्याचा॥
ती विहीर फोडण्याला। तुम्हीच हा प्रयत्न केला।
साक्षात्काराचा लाविला। सुरुंग खडक फोडावया॥'

महाराजांनी साक्षात्काराचा सुरुंग लावला. सुरुंगाला अग्नीचा स्पर्श झाला की, क्षणात त्याचा स्फोट होतो. मनातील भावनांना योग्य वळण प्राप्त व्हायलाही असा एकच क्षण पुरेसा होतो. तो यावा लागतो आणि तो आपोआप येत नसतो. महाराजांना पाणी नाकारणारा भास्कर त्याक्षणी देहबुद्धीने वागला म्हणून महाराजांनी त्याची आत्मबुद्धी जागृत करायला हे सारे घडवून आणले. देहबुद्धी ऐवजी आत्मबुद्धी प्रमाण मानली की मनात विनम्रता येते. मनातील अहंकार नष्ट होतो. यालाच संतकृपा म्हणतात. आपले मन करुणेने भरून येते आणि सर्वांठायी परमेश्वरी चैतन्याची अनुभूती येते. आपल्या शब्दांना मोल प्राप्त होते. अहंकार आणि अज्ञान यांनी विवेक आणि जाणीव आंधळे होतात. ही अंधता नष्ट होऊन पुनश्च करुणामय दृष्टी परत यावी, हाच संतांचा हेतू असतो. महाराजांनी भास्करच्या डोळ्यात असेच अंजन घातले. त्याच्या मनाच्या तळाशी असलेल्या संदेहाच्या खडकांना फोडले. अंतर्ज्ञान जागृत केले. भास्करासाठी हा आत्मानुभूतीचा क्षण होता. तो लीन होऊन बोलला...

'तेणे फुटला हा खडक। भावाचे लागले उदक।
आता मळा निःशंक। भक्तिपंथाचा लावीन मी॥
वृत्तीच्या मेदिनीठायी। फळझाडे मी लावीन पाही।
सन्नीतीची माझे आई। तुझ्या कृपेंकरुनी॥
सत्कर्माची फुलझाडे। लावीन मी जिकडे तिकडे।
हे क्षणैक बैलवाडे।यांचा संबंध आता नको॥'

ही आत्मानुभूती होणे याला साधना लागते. ही साधन भास्करने केली होती किंवा नाही हा प्रश्न निरर्थक आहे. सार्थक आहे ते त्याला उपरती होणे. ही साधना आपल्या रोजच्या कर्मातूनही होते. ही आत्मानुभूती आपले पाय जमिनीवर घट्ट रोखते. स्वतःची जाणीव पक्की होते. आपल्या विशुद्ध स्वरूपाचा गाभा ज्या क्षणी आपल्याला पूर्णतः गवसतो त्या क्षणी जाणतेपणाचा उगम होतो. जाणतेपणाच्या मुळाशी ब्रह्मजिज्ञासा असावी लागते. यासाठी संतांचे शब्दच सहायक ठरतात. डोळ्यावर झापड न लावता चौफेर दृष्टीने जग न्याहाळता आले पाहिजे. हे जाणतेपणी आले की, आपल्या आणि लोकमानसाचाही योग्य वेध घेता येतो. लोकमानस एक वेळ जाऊ दे, स्वतःचे मानस ओळखू येणे आवश्यक आहे. संत ज्ञानेश्वरांच्या रचनेतील एक ओळ येथे प्रकर्षाने आठवते,

'अरे अरे ज्ञाना झालासी पावन।
तुझे तुज ध्यान कळों आले॥'

आपली आपल्याशीच ओळख होण्यासारखे सुख नाही. शेवटी परमार्थ साधना म्हणजे आहे तरी काय? तो आत्मशोधच आहे. गेल्या पिढीतील कवी श्रीनिवास रामचंद्र बोबडे यांची चार ओळींची एक कविता आहे.

'सागर पोहत बाहुबळाने,
नाव तयास मिळो न मिळो रे।
स्वयेच जो तेजोनिधी तरणी,
तदगृही दीप जळो न जळो रे॥
जो करी कर्म अहेतू निरंतर,
वेद तयास कळों न कळों रे।
ओळख पटली ज्यास स्वतःची,
देव तयास मिळो न मिळो रे॥'

स्वतःच्या बलिष्ठ बाहुबळावर समुद्र पोहून जाणाऱ्याला नाव मिळाली काय आणि न मिळाली काय, काही फरक पडत नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांना कुठे नाव मिळाली होती? तरणी म्हणजे सूर्य. सूर्याच्या घरी कधी दिवा लागतो का? तो स्वतःच तेजोनिधी आहे. आपल्या वाट्याला आलेले कर्म निर्हेतुकपणे आणि अपेक्षा न बाळगता करणे हेच जर, सर्व वेदान्तशास्त्रांचे सार असेल तर, अजाणतेपणे असे करणाऱ्याने वेद वाचले काय आणि न वाचले काय सारखेच! ज्याला स्वतःची ओळख पटली त्याला देव मिळाला काय आणि न मिळाला काय! कारण खरी देवभेट ही स्वतःला जाणून घेण्यातच असते. समर्थ म्हणतात...

'मनीं निर्मिला देव तो ओळखावा।
जया पाहता मोक्ष तात्काळ जीवा॥
तया निर्गुणालागि गुणी करावे।
जनीं संग सोडूनि सुखी राहावे॥'

भास्करने स्वतःला ओळखले. आपल्या इतिकर्तव्यतेची त्याला जाणीव झाली. सर्वसंग सोडून त्याने आयुष्यभर श्रीमहाराजांनी सेवा केली. त्यांच्या संगतीत भास्करच्या जीवनाचे सोने झाले. हा असतो संतांच्या सहवासाचा आणि कृपेचा प्रभाव! दयाशील असणे आणि अखंड सावधान असणे हा संतसज्जनांचा स्थायीभाव असतो. तीच त्यांची योगसाधना असते. अहंकाराचा लवलेशसुद्धा त्यांच्या मनात नसतो. अशी वीतरागी माणसे आसक्तीच्या पलीकडे गेलेली असतात. परोपकार आणि लोककल्याण हे त्यांचे एकच ध्येय असते. निर्लोभी मनात कसलीही अपेक्षा नसते. अशांचा संग आपल्या आयुष्यात लाभणे हा आपल्या जीवनातील सुवर्णक्षण असतो. संत श्री गजानन महाराज याच कोटीतील होते. विशुद्ध मनाने परमेश्वराला जवळ करणाऱ्या भक्तांचेही स्थान वेगळे असते. संतांची चरित्रे हेच सांगतात.

'जो राम रुपी मिळाला। तो परतोनि नाही आला।
जैसे लोह परिसें पालटला। तो लोखंड न होय॥'

समर्थ असेच सांगतात. संतांच्या चरित्रातून हेच दिसते. परोपकाराची देह-मन-बुद्धी झिजविणे हाच धडा संतांनी स्वकर्तृत्वाने घालून दिला आहे. वऱ्हाडच्या काळ्याकरंद भूमीत उगवलेले श्री गजानन महाराज हे भक्तीचे ब्रह्मकमळ आहे. संत दासगणू महाराजांच्या 'श्रीगजानन विजया'तून या कमळाचा सुगंध आकाश भेदून गेला. त्यातील ही भास्कराची कथा म्हणजे जीवन जगण्याचा वस्तुपाठ आहे. अध्याय संपला. श्रीमहाराजांचे रूप डोळ्यासमोर अंधुकसे आले. कारण डोळे अश्रूंनी डबडबलेले होते.

## सुखात्म

डॉ. अविनाश भास्कर मोहरील
९४२३१२३९०६

# ब्रॅण्डेड बुट

ऑफिसमध्ये दिवाळीच्या दरम्यान वेगवेगळ्या दुकानांमध्ये मिळणाऱ्या डिस्काऊंटसंबंधी चर्चा रंगली होती. लंच लवकर आटोपल्यामुळे सर्वांना जरा गप्पा मारण्याची संधी मिळाली होती. या सर्व गप्पांमध्ये आनंद मात्र नव्हता. तो आपल्या डेस्कवर बसून काम करीत होता. हे कुणाच्या तरी लक्षात आल्यावर त्याला त्याने हाक मारली, 'अहो आनंदजी या जरा इकडे, इतके जास्त काम केल्यामुळे आपला बॉस पगार वाढविणार नाही.' तेवढ्यात दुसरे कुणीतरी ओरडले, 'या हो आनंदराव, जरा मौलिक ज्ञान मिळतंय ते घ्या.' त्यापाठोपाठ सर्वांनीच हाका मारल्यामुळे आनंदला आपले काम बाजूला ठेवून त्या समूहाच्या गप्पांमध्ये सामील व्हावेच लागले. पुन्हा त्याच गप्पा सुरू झाल्या. या दुकानात सध्या चांगल्या वस्तूंचा स्टॉक चांगलाय, त्या दुकानात एवढ्या रुपयांच्या खरेदीवर हे फ्री मिळणार आहे वगैरे चर्चा रंगल्या. आनंदला मात्र यात रस नव्हता. कारण त्याच्या डोळ्यासमोर त्याच्या महिन्याच्या पगाराची विल्हेवाट येत होती. मंडळींच्या चर्चा रंगल्या आणि आनंद मात्र अलगद त्याच्या गेल्या २० वर्षांच्या आयुष्याच्या आलेखात शिरला.

महानगर पालिकेत लिपीक म्हणून लागलेला आनंद अचानक २५ हजार रुपये पगार मिळायला लागल्यामुळे फार खुश झाला होता. त्यानंतर त्याचे आयुष्य सुरळीत सुरू झाले. लग्न झाले, मुलगा झाला. घरी आई-वडील सोबत होते. परंतु साधारण पाच वर्षांनंतर कालचक्र फिरले. आनंदच्या आयुष्यात कठीण काळ सुरू झाला. वडिलांना अर्धांगवायू झाला व ते अंथरुणाला खिळले. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस ढासळू लागली व त्याकरिता दवाखान्याचा मोठा खर्च सुरू झाला. त्यातच आनंदच्या लहान भावाच्या व्यवसायामध्ये घोटाळा झाला. त्याच्यावर सुमारे २० लाखांवर कर्ज झाले. त्याचा परिणाम म्हणजे त्याचा लहान भाऊ व्यसनाधीन झाला. त्याचे सारे कर्जदार त्याच्या भावाच्या मागे लागले. भावाच्या मागचा ससेमीरा आनंदला बघवेना. लोक पैसे वसूल करायला घरी यायला लागले व त्यांच्या घाणेरड्या शिव्या ऐकाव्या लागायच्या. शेवटी आनंदला यासाठी पुढाकार घ्यावा लागला. कार्यालयाकडून कसेतरी करून त्याने मोठे कर्ज घेतले व सारी रक्कम फेडली. कर्जाचा मोठा हप्ता त्याला पुढील २५ वर्षे पगारातून फेडायचा होता. भावाने काहीही करणे बंद केले व तो घरीच बसायला लागला. पुढे त्यालाही काही आजार झाले व त्याचाही खर्च आनंदलाच करावा लागायचा. संपूर्ण परिवाराचा खर्च एकट्या आनंदलाच करावा लागायचा. त्याची पत्नी फार शिकलेली नसल्याने मोठी नोकरी करू शकत नव्हती. परंतु ती लोणची, पापड वगैरे करून जमेल तशी मदत त्याला करायची. मुलगा मोठा झाल्याने त्याच्या शिक्षणाचा खर्च वाढू लागला होता. या सर्व प्रकारांमुळे आनंदला व त्याच्या पत्नीला इच्छा असूनही दुसऱ्या अपत्याला जन्म न देण्याचा कटू निर्णय घ्यावा लागला. फार दुःख झाले होते आनंदला त्या दिवशी. पती-पत्नी एकमेकाला आधार देत होते, परंतु स्थिती दोघांचीही सारखीच होती. एकमेकांच्या डोळ्यातील अश्रू एकमेकांना दिसणार नाहीत, याची पुरेपुर काळजी ते दोघेही घेत होते. स्वतःच्या सर्व स्वप्नांना गुंडाळून ठेवून त्याने व त्याच्या पत्नीने जगण्याची सवय करून घेतली. त्यामुळे मोठमोठ्या दुकानांमध्ये मिळणारे डिस्काऊंट त्यांना कधीच दिसत नव्हते, मोठमोठ्या खरेदी आपल्याकरिता नाहीच हे त्यांनी ठरवून टाकले होते. म्हणूनच कार्यालयात सुरू असलेल्या चर्चेमध्ये आनंदला रस वाटत नव्हता. अचानक कुणीतरी बुटांच्या एका ब्रॅन्डेड कंपनीच्या महासेलबद्दल बोलत होते. आनंद आपल्या भूतकाळातून वर्तमानात आला. त्याचा मित्र त्याला सांगत होता, 'अरे आनंद, तुला नवा बुट घ्यायचा होता ना? बघ आता संधी आहे. तुला ५० टक्के डिस्काऊंटवर ब्रॅन्डेड कंपनीचा बुट मिळू शकतो.' आनंदला खरोखरीच एक चांगला बुट घ्यायचा होता, अनेक दिवसांपासून. त्याचा जुना बुट आता पार फाटून गेला होता. काही ना काही कारणांमुळे नवा बुट घेणे मागेच पडायचे. परंतु आता १५०० रुपयांमध्ये हा तीन हजाराचा बुट मिळणार होता, त्यामुळे घ्यावा का असा विचार त्याच्या मनात आला. त्याच विचारात आनंद घरी आला. रात्री जेवणे झाल्यावर नेहमीप्रमाणे पत्नीसोबत एक फेरी मारायला तो निघाला. त्या दिवशी तो काहीच बोलत नाही हे बघून त्याच्या पत्नीने ओळखले की काहीतरी गडबड आहे. तिने बरेच वेळा विचारल्यावर त्याने तिला त्या डिस्काऊंटमध्ये मिळणाऱ्या बुटांबद्दल सांगितले. खरे तर त्यांना इतका मोजून मापून घर खर्च चालवावा लागायचा की त्यांच्यासाठी ती चैनच होती. कधी नव्हे ते आपल्या नवऱ्याला काही चांगले खरेदी करण्याची इच्छा झालीय म्हणून तिने त्याला तो बुट घेऊनच टाका असे सांगितले. त्या घराकरिता तो किती खस्ता घेतो व स्वतःच्या आवडी-निवडीही त्याने पूर्णपणे गुंडाळून ठेवल्यात, हे तिला चांगलेच ठाऊक होते. आठवड्यातून एकदा त्याला कधीतरी पान खायची हुक्की यायची; त्याने ते देखील बंद केले, हे ती जाणून होती. ती म्हणाली, 'मागच्या महिन्यात विजेचे बिल जरा कमी आले. त्यामुळे काही पैसे उरलेत. त्यात माझ्या जवळचे काही टाकूयात आणि तुम्ही उद्या तो १५०० रुपयांचा ब्रॅन्डेड बुट घ्याच. त्याने पण ठरविले, यावेळी हिंमत करून घेऊयात.



दुसऱ्या दिवशी ऑफिसला जाताना आनंदच्या बायकोने त्याला १५०० रुपये दिले. संध्याकाळी नवे बुट घालूनच घरी या आणि हे जुने तेथेच सोडून या. किती खराब झालेत ते आणि समोरून फाटले देखील आहेत. त्या दिवशी ऑफिसमध्ये आनंद आनंदातच होता. लंचमध्ये मुद्दाम त्या मित्राकडून बुटांवर डिस्काऊंट देणाऱ्या दुकानाचा पत्ता त्याने लिहून घेतला. आनंद सहस्त्रबुद्धे खरेदी करण्यासाठी दुकानाचा पत्ता मागताहेत हा एक आश्चर्याचा आणि त्यानंतर आनंदला चिडविण्याचा प्रसंग ठरला. आनंदनेदेखील ते चिडविणे एन्जॉय केले. सायंकाळी उत्साहातच तो त्या दुकानापाशी गेला. एकदम दुकानात शिरण्याची हिंमत झाली नाही; बाहेर शोकेसमध्ये लावलेले बुट त्याने न्याहाळले. सहजच त्याला वाटून गेले की, बऱ्याच दिवसांनी बुट घेतोय, तो देखील ब्रॅन्डेड तर मग बायको सोबत हवी. सेल सुरू आहे, सोबत तिला पण एखादी चप्पल घेऊन देऊयात. त्याने ठरविले की, घरी जायचे आणि बायकोला सोबत घेऊनच बुटाची खरेदी करायची. घरी आल्यावर बायकोला पटापट तयार व्हायला त्याने सांगितले. तिलाही बरे वाटले. ती तयार झाली. दोघेही बाहेर जाण्यास निघाले. आनंदने पैसे नीट वरच्या खिशात सुरक्षित ठेवले होते. ५०० रुपये त्यानेदेखील त्याच्या जवळचे सोबत घेतले होते. कारण बुटांसोबत बायकोकरिता चप्पल घेण्याचा त्याचा विचार होता. ती दोघे बाहेर पडणार तेवढ्यात त्यांचा दहाव्या वर्गातील मुलगा शिकवणीवरून घरी आला. 'बाबा, मी दोन मिनिटात फ्रेश होऊन येतो. मला तुमच्याशी एक काम आहे. तुम्ही जरासे नंतर जाल का बाहेर?' अत्यंत लाडाचे पोर होते ते त्यामुळे त्याचे मायबाप थांबले. फ्रेश होऊन आल्यावर मुलगा म्हणाला, 'बाबा, माझ्या शाळेची ट्रीप जाते आहे परवा. मी नाव नोंदविले आहे. उद्या मला शाळेत सकाळी दोन हजार रुपये भरायचे आहेत. माझे सर्वच मित्र जाणार आहेत. मला पैसे द्या ना!' एकुलता एक मुलगा आहे आपला. त्याला काहीच कमी पडायला नको असे आनंदने आधीच ठरविले होते. क्षणाचाही वेळ न लावता आनंदने शर्टच्या खिशातून दोन हजार रुपये काढून मुलाच्या हातावर ठेवले. मुलाने, 'बाबा आय लव्ह यू' म्हणत त्याला मिठी मारली व पैसे घेऊन तो त्याच्या खोलीत निघून गेला. आनंदच्या मागे उभे राहून त्याच्या बायकोने हा प्रकार बघितला व तिने हलकेच त्याच्या खांद्यावर हात ठेवला. टचकन पाणी आले आनंदच्या डोळ्यात. पण बायकोला ते अश्रू दिसू न देता हसून तो म्हणाला, 'माझा जुना बुट उद्या शिवून घेतो, म्हणजे अजून एक वर्ष तर चिंता नाही.' आनंदचा मुलगा मात्र आनंदात निघून गेला होता. त्याला ते अश्रू दिसलेच नाहीत.

मला असे वाटते, प्रत्येकच पिढीतील आईबापाच्या डोळ्यात हे असले मन मारल्याच्या प्रसंगांमुळे अश्रू येत असावे. परंतु त्या अश्रूंची किंमत मुलांच्या पिढीला बरेच वेळा कळत नाही; ती त्यांना आई-वडिलांच्या भूमिकेत गेल्यावरच कळते. ही असल्या अश्रूंची किंमत आधीच जर मुलांना कळली तर? सहसंवेदनांचा एक घट्ट अनुबंध तयार होईल.. दोन्हीही पिढ्यांमध्ये!

## प्रबंधांची बीजे

श्रीरंग श्री. हिर्लेकर
९४२२१११८९३

# राजवाड्यांचे ऐश्वर्य
## (निर्याण शताब्दीनिमित्त)



वरील शीर्षक वाचून असा अपसमज होईल की, मी केरळमधील पद्मनाभम् मंदिराच्या राजांच्या प्राचीन ऐश्वर्याविषयी काही लिहिणार आहे. पण ती संपत्तीसुद्धा ज्यापुढे नगण्य म्हणावी अशा दुसऱ्याच एका राजवाड्याच्या वैभवाविषयी वाचले की आश्चर्याने थक्क व्हायला होईल. आधुनिक रसायनशास्त्राला अवघे ११८ मूलद्रव्ये ज्ञात असून त्यात ९० धातू आहेत. मात्र, हे राजवाडे म्हणजे विश्वनाथ काशिनाथ राजवाडे. त्यांचे धन म्हणजे तुकाराम महाराज म्हणतात तसे 'आम्हा घरी धन शब्दांचिच रत्ने' आणि धातू म्हणजे त्यांनी उत्खनन केलेले मराठी शब्दांचे ३०,००० धातू.

राजवाडेंचा जीवनकाळ इसवी सन १८६४ ते १९२६ इतकाच. भाषा, समाजशास्त्र आणि इतिहासाचे ते प्रकांड पंडित होते. भारत इतिहास संशोधक मंडळ या संस्थेची त्यांनी स्थापना केली. महाराष्ट्रीय भाषेचे 'निरुक्तसूरी' असे त्यांच्याविषयी गौरवाने बोलले जाते. मराठ्यांच्या इतिहासात बाबासाहेब पुरंदऱ्यांचा अधिकार सर्वजण जाणतात. ते मावळखोऱ्यातील कोणत्याही दगडाचे अंतरंग ज्या आपुलकी व विस्ताराने उलगडत, त्याच पद्धतीने राजवाडे असंख्य मराठी शब्दांची पाळेमुळे, गोत्र प्रवर आणि वंश तपशिलाने सांगत. आपल्या हयातीत त्यांनी ३०,००० धातूंची नोंद लहान-मोठ्या कागदी चिठ्ठ्यांवर करून ठेवली. दुर्दैवाने त्या नोंदीचे व्यवस्थित संकलन, विभागणी, मांडणी हे काम पूर्ण होण्याआधीच त्यांचे निधन झाले. ते काम पुढे कृ. पां. कुलकर्णी यांनी अतिशय व्यवस्थितपणे आणि चिकाटीने 'राजवाडे मराठी धातुकोश' या नावाने पूर्णत्वास नेले. मोरोपंत म्हणतात तसेच झाले-

'स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी जन्मती.'

हा धातुकोश प्रसिद्ध करणे सोपे काम नव्हते. त्या कामाचा आवाका इतका प्रचंड होता की, प्रस्तावनेची मोठ्या आकाराची ५२ पाने त्यासाठी खर्ची पडली. एखाद्या विद्वत्तापूर्ण प्रबंधाइतकेच कुलकर्ण्यांच्या त्या संपादनाचे मोल आहे. पाणिनीच्या अष्टाध्यायीवर प्रकाश टाकण्याचे काम १६ व्या शतकातील भट्टोजी दीक्षित आणि २० व्या शतकात पुण्यातील काशिनाथशास्त्री अभ्यंकरांनी ज्या समर्थतेने केले तसेच कुलकर्णींनी राजवाडेंच्या अपूर्ण व्युत्पत्ती कोशासंबंधात केले.

**वैशिष्ट्ये** : एकलकोंडा स्वभाव, संस्कृत-प्राकृत, मराठी, देशी आणि बोली भाषांचा अभ्यास, शोधक आणि चिंतनशील वृत्ती यामुळे त्यांना धातू शोधण्याचे व्यसनच होते, असे म्हणावे लागेल. ते शब्दांचे रूप सांगण्यापूर्वी तो शब्द भाषेत रूढ होण्याचा काळ, तत्कालीन सामाजिक परिस्थिती आणि व्यवहारांचा भाषेवर पडणारा प्रभाव यांचे भान ठेवत स्वत:च्या मनाशी शब्दांचे गूढ उकलत बसत. प्रत्येकच शब्दाचे मूळ संस्कृतात असते, असा दुराग्रह त्यांनी धरला नाही. ध्वनिपरिवर्तनामुळे उदा. क-ग, त-द, श-स, ण-न याप्रमाणे शब्द बदलतात, हे गृहीत धरून त्यांनी असंख्य शब्दांची ३०,००० मुळे शोधून काढली. तुलना करावयाची नाही, पण संस्कृत व्याकरणकार पाणिनीच्या कोशात २२०० धातू आहेत, हे लक्षात घ्यावे.

**धातू म्हणजे काय?** अमरकोशाने धातूला शब्दयोनी म्हटले आहे. भाषा वाक्यांपासून, वाक्य शब्दांपासून, शब्द धातूपासून निर्माण होतात. धातू हेच भाषेचे मूळ आहे. धातूचा उगम भाषा अस्तित्वात येण्यापूर्वीच्या आद्य मानवाच्या सहज उद्‌गार आणि कृतिसूचक एकाक्षरी वर्णात आहे. याच लेखमालेत मी 'लिपी आणि मानवीशरीर संबंध' या नावाचा एक लेख लिहिला होता; त्यात तर याहीपुढे जाऊन मी कोणतीही लिपी आणि चिन्ह निर्माण होण्याकरिता मानवी शरीर, त्याचे मूळ विकार, भावभावना, संवेदना, विचार व्यक्त करताना नैसर्गिकपणे होणाऱ्या शारिरीक हालचाली आणि कृती हे सर्व मुद्दे महत्त्वाचे असून सर्वांच्या मुळाशी मानवी शरीर, विचार आणि आचार आहेत हाच मुद्दा मांडला होता.

**कृत्रिमतेचा वृथा आरोप** : राजवाडेंनी ३०,००० तर पाणिनीने २२०० ते ८००० धातू सांगितले. राजवाडेच नव्हे तर पाणिनीवरसुद्धा एक आरोप केला जातो की, त्या दोघांनी सांगितलेले बरेचसे धातू वाङ्मयात आढळत नाहीत. त्यावरून ते कृत्रिम किंवा ओढाताण करून निर्मिले असावेत. पण जसजशी संशोधनाची व्याप्ती वाढू लागली तसतसे प्रचलित भाषेतून लुप्त झालेल्या शेकडो क्रियावाचक संज्ञा, त्यामागच्या प्रथा यामुळे अविश्वासाचे हे सावट दूर होऊ लागले. राजवाड्यांनी वैदिक व संस्कृत वाङ्मय, इतिहास, बखरी, जुन्या कागदपत्रांची बाडे, दानपत्रे, ताम्रपट, शिलालेख, फारसी आणि मराठीतून लिहिलेले ऐतिहासिक दस्तावेज हे सर्व पालथे घातले. शब्दांना सरलार्थ, रुढार्थ, व्यंगार्थ, वाच्यार्थ, लक्षणार्थ अशा अनेक छटा असतात या दृष्टीने ते त्याच्या मुळाचा शोध घेत. काही जण एका वाच्यार्थाला प्रमाण मानून एकच व्युत्पत्ती सांगून इतर वाच्यार्थांना लक्षणार्थ मानून थांबतात. राजवाडे प्रत्येक वाच्यार्थाची स्वतंत्र व्युत्पत्ती देतात. या दृष्टीने ते शब्दकोशकार कमी आणि शब्दांचे इतिहासकार होते. या दृष्टीने विचार केल्यास ते वाच्यार्थाचे निरुक्तसुरी होते. अनेकदा मूळ उदात्त अर्थाचे स्खलन होते. मराठीतील अतिशय अश्लील-अर्वाच्य ग्राम्य शिव्यांमागे वेदांतील काही उदात्त कल्पना, रुढी, प्रतीके, तंत्रपूजा आहेत हे राजवाडेंचा कोश वाचताना झालेला ज्ञानानंद माझा मलाच माहित. उदा. मराठीतील 'घोडा लावणे' या वाक्प्रयोगामागे यज्ञीय अश्व म्हणजे सूर्य किंवा पराक्रमी सम्राट हे लक्षात घेऊन अश्वमेधाचा घोडा हा पुरुषार्थ आणि सम्राज्ञी म्हणजे जिंकलेली पृथ्वी आहेत. अश्व आणि सम्राज्ञी यांच्यातील महावस्त्राखालच्या सांकेतिक विधी ते निर्देशित करतात. मैथुन म्हणजे सृष्टीचा यज्ञ, लैंगिक अवयव म्हणजे शक्ती, सृजन आणि धारणांची प्रतीके हा मूळ अर्थ हरवून मध्ययुगीन अशिक्षित समाजात वरवरचाच क्रियार्थ रुढ झाला. नैतिकतेने त्यांना अश्लील ठरवून अर्थांचा अध:पात केला. याचप्रमाणे भगिनी आणि मातृशक्तीतून व्यक्त होणारा उदात्त अर्थ हरवून हेटाळणीवाचक अनेक शिव्या निर्माण झाल्या. घोडा लावणे या शब्दांचा आजचा अर्थ दुसऱ्याला फसवून आपल्या म्हणण्याप्रमाणे करण्यास भाग पाडणे हा आहे. वेद, नक्षत्रकथा, पुराणे-लोकसाहित्य यातून नवीन शब्दांची निर्मिती कशी हे अभ्यासत त्यांच्या व्युत्पत्ती राजवाडेंनी आपल्या कोशातून सयुक्तिकरीत्या मांडल्या.

> राजवाड्यांनी वैदिक व संस्कृत वाङ्मय, इतिहास, बखरी, जुन्या कागदपत्रांची बाडे, दानपत्रे, ताम्रपट, शिलालेख, फारसी आणि मराठीतून लिहिलेले ऐतिहासिक दस्तावेज हे सर्व पालथे घातले. शब्दांना सरलार्थ, रुढार्थ, व्यंगार्थ, वाच्यार्थ, लक्षणार्थ अशा अनेक छटा असतात या दृष्टीने ते त्याच्या मुळाचा शोध घेत. काही जण एका वाच्यार्थाला प्रमाण मानून एकच व्युत्पत्ती सांगून इतर वाच्यार्थांना लक्षणार्थ मानून थांबतात. राजवाडे प्रत्येक वाच्यार्थाची स्वतंत्र व्युत्पत्ती देतात. या दृष्टीने ते शब्दकोशकार कमी आणि शब्दांचे इतिहासकार होते. या दृष्टीने विचार केल्यास ते वाच्यार्थाचे निरुक्तसुरी होते.

**धातू शोधातील आयाम** : नुकतीच मराठी ही अभिजात भाषा असल्याचे मान्य झाले. राजवाडेंनी लिहून ठेवलेल्या चिठ्ठ्यांतून पुढीलप्रमाणे जे २७ आयाम सांगितले त्यावरून तिचे अभिजातपण सिद्ध होते. मराठी अर्थ, संस्कृत मूळ, वैदिक वर्गपद, पाणिनीय वर्गपद, संस्कृत धातू, अभ्यास, आगम, आदेश, रूप, कर्तरी, कर्मणी व भावेचे जुने व नवे लट्, कर्तरी व कर्मणी लिंग, कर्तरी व कर्मणीचे कृदन्त, भविष्य-लोट-लिंग-लृंग, प्रयोजक, निष्ठा आणि विशेष. प्रत्येकच धातू या चाळणीतून निघतो असे नाही. याशिवाय काही धातूंच्या मागे इ, इर, उ, ऊ, ऋ अशा वर्णांचे अनुबंध, आडव्या उभ्या रेघांनी दाखविलेले अनुदात्त आणि स्वरितत्व दाखविले आहेत. काही लकार चिन्हे, संस्कृत धातूंप्रमाणे मराठीतील १० विकरण चिन्हे आणि नामधातुचा एक अशा ११ गणांचा वापर केला आहे. पाणिनीनेही असेच केले. अनुबंध म्हणजे क्रियावाचक साधी अक्षरे. गती ही एकच क्रिया घेतली तरी तिचे शारिरीक, मानसिक, आध्यात्मिक, वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, व्यंगार्थ असे अनेक प्रकार होतात. त्यांच्या वाङ्मयीन उपयोगावरून ३०० धातू तयार झाले. श्रवण, उच्चारण या दोन क्रियांमधून शब्द म्हणजे आवाजाचे व्यक्त, अव्यक्त, कुत्सित, घोर, मंत्र अशा अनेक भावांचे सूचक अनेक अर्थ आणि पुन्हा एकाच अर्थाच्या भिन्न छटा आढळतात. एकच अर्थ पण भिन्न छटा म्हणजे आपण सुरुवातीला रसायनशास्त्रातील उदाहरण दिले त्याप्रमाणे एकाच मूलद्रव्याचे अनेक आयसोटोप.

राजवाडेंनी आपली सर्व टिपणे व्यवस्थितरीत्या तयार करून ठेवली होती. त्यावरून स्वत:च धातुकोश तयार करण्यास सुरुवात करणार तो त्यांचे निधन झाले. या सोबतच नामव्युत्पत्ती कोशाचेही त्यांनी काम करून ठेवले. माझ्याजवळील दुर्मिळ ग्रंथ संपत्तीत तो पण आहे. 'संस्कृत भाषेचा उलगडा' हा प्रबंधही त्यांनी लिहिला. पाश्चात्त्य आणि पौर्वात्य भाषांतील धातूंची तुलना या विषयावरील ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा संकल्प पूर्ण झाला नसला तरी त्यातील विचारधारा त्यांच्या प्रस्तुत कोशात अनेकदा प्रकटते. देश, प्रदेश, संस्कृतीचा प्रभाव भाषा, तिच्या शब्द, व्याकरण इत्यादींवर पडल्याशिवाय राहत नाही. भाषेचा अभ्यास करताना त्या संस्कृतीचा, त्या काळाचा, जीवनपद्धतीचा इतिहास आढळतो. ते स्वत:च म्हणत की, मी बुद्धिप्रामाण्यवादी असून इतिहासकार आहे. मराठी धातूंच्या शोधात ते वेदच नव्हे तर वेदपूर्वकालीन भाषेच्या उत्तरसीमेपर्यंत पोचले. हे काम करण्याच्या निमित्ताने भाषा, वाङ्मय, अध्यात्म, शास्त्रे आणि कला सर्वच क्षेत्रात कार्यकारणभावाने ते संगती लावीत. ज्ञानेश्वरीतील सर्व शब्दांचा व त्यांच्या धातूंचा स्वतंत्र कोश तयार करण्याचेही त्यांनी सूतोवाच आणि पद्धतही तयार करून ठेवली होती.

त्यांच्या महान कार्याचा परिचय मर्यादित जागेत घेणे कठीण आहे. त्यांच्या निर्याण शताब्दीनिमित्ताने मी फक्त या विषयाला वाचा फोडली इतकेच.

# साप्ताहिक राशिभविष्य

रविवार, दि. १८ जानेवारी २०२६ ते शनिवार, २४ जानेवारी २०२६

मिलिन्द माधव ठेंगडी/ज्योतिष शास्त्री, ८६००१०५७४६

## सुरुवातीस खर्चवाढ संभव

मेष

हा आठवडा आपणास संमिश्र स्वरूपाचा जाण्याची शक्यता आहे. थोड्या खर्चिक घटनांनी सुरुवात होणार असली, तरी आठवड्याच्या मध्यात काही आर्थिक लाभ होऊन स्थिती सुधारेल. आपला राशिस्वामी मंगल दशम कर्म स्थानात रवीसोबत असून बुध व धनेश शुक्राप्रमाणेच अस्तंगत आहे. शनीची धनस्थानावर दृष्टी आहे. तोही आपली आवक काहीशी बिघडवू शकतो. चंद्र मात्र भाग्य स्थानातून भ्रमण सुरू करणार आहे. या सप्ताहात महत्त्वाची कामे वेग धरतील. सुख व शांतीचे वातावरण निर्माण होईल. मित्रांचा पाठिंबा राहील. काहींना मात्र वारशाच्या मुद्यावरून भावंडात वितुष्ट निर्माण होण्याचे अनुभव मिळू शकतात. व्यवसाय-नोकरीत वातावरण काहीसे बिघडलेलेच राहील. अनावश्यक खर्च टाळा.

**शुभ दिनांक - १८, २०, २१, २३.**

## इच्छित कामांमध्ये यश

वृषभ

या आठवड्यात आपली काही इच्छित कामे यशस्वीपणे पूर्ण होतील. दुसरीकडे आर्थिक आवक-जावकचा ताळमेळ प्रयत्नपूर्वक जमवावा लागणार आहे. आपला राशिस्वामी शुक्र भाग्य स्थानात रवीसोबत असून बुध व मंगळाप्रमाणेच अस्तंगत आहे. लाभातील शनीची आपल्या राशीवर दृष्टी असून तो काहीसा उपद्रवकारी ठरणार आहे. चंद्रही अष्टम या पीडादायक स्थानातून भ्रमण सुरू करणार आहे. या सप्ताहात दैनंदिन खर्चाला अनेक वाटा फुटलेल्या असतील. शिवाय आर्थिक फसवणूक, अचानक मोठे खर्च, एखाद्याचे हॉस्पिटलायझेशन करावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. आठवड्याच्या मध्यानंतर मात्र काहीसा दिलासा निश्चित मिळेल.

**शुभ दिनांक - १९, २०, २१, २४.**

## संमिश्र योगांचा अनुभव

मिथुन

हा आठवडा आपणास संमिश्र स्वरूपाचा जाण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या सुरुवातीला सरकारी कामे तसेच कोर्टाची कामे रेंगाळत असल्याचे दिसू शकेल. आपला राशिस्वामी बुध अष्टम स्थानात रवीसोबत असून तो मंगळ व शुक्रासोबतच अस्तंगत आहे. दशम कर्म स्थानात शनी आहे. चंद्र सप्तम स्थानातून भ्रमण सुरू करीत आहे. सप्ताहाच्या सुरुवातीच्या टप्प्यात पैशाला अनेक पाय फुटून खर्च वाढेल. काहींना प्रवासाचे योग येतील. मात्र शेवटी-शेवटी आर्थिक स्थैर्य लाभेल. व्यावसायिक कामात ज्येष्ठांचा सल्ला घेणे लाभदायक ठरेल. काहींना आरोग्याच्या तक्रारी उद्‌भवू शकतात. जोडीदाराच्या प्रकृतीची चिंता राहील. आपल्या कर्म स्थानात आणि कुटुंबात काही कुरबुरी निर्माण होण्याची शक्यता आहे.

**शुभ दिनांक - १८, २१, २२, २३.**

## कार्यक्षेत्री दबदबा राहील

कर्क

या आठवड्यातील ग्रहस्थिती आपल्याला सुरुवातीला अधिकच उत्साहवर्धक ठरावी. नोकरी-व्यवसायातील रेंगाळलेल्या कामांना गती देता येईल. आपला राशिस्वामी चंद्र सहाव्या कर्म स्थानातून भ्रमण सुरू करीत आहे. या सप्ताहाच्या बव्हंश भागात त्याचे हे भ्रमण लाभदायक ठरावे. आपल्या राशीत गुरू आहे. यामुळे कार्यक्षेत्रात आपला दबदबा निर्माण होण्यास मदत होईल. कुटुंबातील, समाजातील दर्जा उंचावेल. शेवटी शेवटी मात्र काहींना शारीरिक, मानसिक अस्वास्थ्य निर्माण होण्याचे भय राहील. सावधगिरी म्हणून फार दगदग, धावपळ टाळायला हवी. आपली नियमित औषधी-पथ्ये सांभाळावीत. सप्तमातील रवीसोबत अस्तंगत झालेल्या बुध, शुक्र व मंगळाची उपस्थिती काहीशी त्रासदायक ठरण्याची शक्यता आहे.

**शुभ दिनांक - १८, १९, २०, २४.**

## भावनेच्या भरात चुका

सिंह

या आठवड्यात लाभलेले ग्रहमान पाहता विरोधकांचा उपद्रव, कमालीची स्पर्धा, काहींना सहकाऱ्यांपासून मनस्ताप असे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. आपला राशिस्वामी रवी सहाव्या कर्म स्थानात असून त्यासोबत असलेले मंगळ, बुध व शुक्र अस्तंगत आहेत. अष्टम या पीडादायक स्थानात शनी आहे. चंद्र पाचव्या शुभ स्थानातून भ्रमण सुरू करीत आहे. या सप्ताहात भावनेच्या भरात काही निर्णय चुकण्याची शक्यता राहील. त्यामुळे सावध असावे. मध्यात काहींना प्रवास, भ्रमंती, तीर्थाटन यांसाठी उपयुक्त स्थिती राहील. कलावंत व साहित्य क्षेत्रातील व्यक्तींना आर्थिक लाभ व्हावा. संततीच्या उन्नतीचे योग यावेत.

**शुभ दिनांक - १८, १९, २०, २२.**

## सर्वत्र सावधगिरी आवश्यक

कन्या

या आठवड्यात आपले काही आर्थिक व्यवहार वादाच्या भोवऱ्यात जाळ्यात सापडण्याची शक्यता आहे. काही आर्थिक अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. आपला राशिस्वामी बुध पाचव्या शुभ स्थानात असला तरी तो रवीच्या सानिध्यात अस्तंगत आहे. तेथेच शुक्र व मंगळही अस्तंगत असल्याने बलहीन आहेत. शनीची आपल्या राशीवर सप्तमातून दृष्टी आहे. चंद्र चतुर्थ सुखस्थानातून भ्रमण सुरू करीत आहे. या सप्ताहात एखादे नसते बालंट मागे लागू शकते. त्यामुळे विशेषतः महिला सहकाऱ्यांबाबत, मैत्रिणींसोबत अत्यंत सावधगिरीचे धोरण बाळगावयास हवे. महिलांनी पुरुष सहकाऱ्यांपासून जरा सावधच राहावयास हवे. आर्थिक व्यवहार सांभाळून करावेत.

**शुभ दिनांक - १८, २०, २२, २४.**

## कुटुंबात गैरसमज टाळावेत

तूळ

प्राप्त ग्रहस्थिती पाहता या आठवड्याची सुरुवात फारच उत्तम राहणार असली, तरी मध्यात मात्र काही त्रासदायक अनुभव येऊ शकतात. आपला राशिस्वामी शुक्र रवीच्या सान्निध्यात मंगळ व बुधाप्रमाणेच अस्तंगत आहे. शनी सहाव्या स्थानातून आरोग्याच्या कुरबुरी निर्माण करू शकतो. चंद्र पराक्रम स्थानातून भ्रमण सुरू करीत आहे. पंचमात राहू आहे. या सप्ताहात संततीकडून काही धक्कादायक बातम्या कळू शकतात. काही विचित्र अनुभव आपले मन कलुषित करतील. जोडीदाराशी मतभेद, कुटुंबातील एखाद्याच्या आरोग्याची चिंता निर्माण होणे असले अनुभव येऊ शकतात. काहींची आर्थिक कोंडी होऊ शकते. कोर्टाच्या कामात वेळ, पैसा वाया जात असलेले जाणवेल.

**शुभ दिनांक - १९, २१, २२, २४.**

## मोठा घटनाक्रम संभव

वृश्चिक

या आठवड्याच्या सुरुवातीला कुटुंबातून, मित्रमंडळींकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. नोकरी-व्यवसायात आपण एखादी मोठी घटना घडण्याची शक्यता आहे. आपला राशिस्वामी मंगळ स्वतःच्या उच्च राशीत असून सध्या तो रवीच्या सान्निध्यात अस्तंगत आहे. त्याच्यासोबतच बुध व शुक्र अस्तंगत आहेत. शनी शत्रू असला तरी तो पंचम शुभ स्थानात असल्याने काहीसा मवाळ होऊ शकतो. चंद्र धनस्थानातून सप्ताहाचे भ्रमण सुरू करीत आहे. काही चांगल्या आर्थिक घटना संभव आहेत. काहींना नोकरीच्या कामामुळे बाहेर जावे लागेल. व्यवसायात स्पर्धा वाढून दगदग, धावपळ करावी लागू शकते. या काळात आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. आपसातील आर्थिक व्यवहार सुस्पष्ट असावेत.

**शुभ दिनांक - १८, २०, २२, २४.**

## आळस, अनिच्छा टाळावी

धनू

हा आठवडा आपणास अतिशय सुखदायक ठरावा; तरीही आपली कामे काहीशी रेंगाळत आहेत, असा अनुभव येऊ शकतो. आळस, अनिच्छा काही काम करू देत नाही, अशी स्थिती निर्माण होऊ शकते. आपला राशिस्वामी गुरु सप्तमातून राशीला बळ देत आहे. धनस्थानात रवी व त्याच्यासोबत असल्याने अस्तंगत झालेले मंगळ, बुध व शुक्र आहेत. चंद्र आपल्याच राशीतून सप्ताहाचे भ्रमण सुरू करीत आहे. दशम कर्म स्थानावरील शनीच्या दृष्टीमुळे आपली गाडी पुढे सरकत नाही, अशी स्थिती असू शकते. मात्र या स्थितीवर प्रयत्नपूर्वक मात करावी लागेल. आळस झटकून कामाला लागा. विलंब टाळावा. बसल्या जागी कामे होणार नाहीत. आरोग्याच्या काही छुप्या कारणांनी काही मंडळी त्रस्त असू शकतात.

**शुभ दिनांक - १८, १९, २०, २२.**

## आर्थिक आवक वाढेल

मकर

विशेषतः सरकारी नोकरीत असणाऱ्यांना हा आठवडा चांगला जावा. त्याचप्रमाणे स्वतःच्या तसेच भागीदारीत व्यवसाय करणाऱ्यांनाही उत्तम लाभ मिळेल. राशिस्वामी शनी पराक्रम स्थानातून भाग्य स्थानाला बळ देत आहे. आपल्या राशीत रवी असून त्याच्या सोबतीने अस्तंगत झालेले मंगळ, बुध व शुक्र हे तीन ग्रह आहेत. चंद्र व्यय स्थानातून भ्रमण सुरू करीत असला तरी सप्ताहाचा बराच काळ तो आपल्या राशीत व धनस्थानात राहील. व्यवसायात वाढ, आर्थिक आवक वाढण्याचे योग आहेत. बेरोजगारांचे नोकरी-व्यवसायाबाबतचे प्रश्न सुटू शकतील. महिला वर्गाकडून सहकार्य मिळेल. काहींना आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**शुभ दिनांक - १८, २०, २१, २३.**

## संततीकडून शुभवार्ता कळतील

कुंभ

या आठवड्यात आपल्याला संततीकडून काही शुभवार्ता कळू शकतात किंवा मुलांच्या संदर्भात काही शुभ घटनाक्रम घडू शकतो. आपला राशिस्वामी शनी धन स्थानात असून राशीत राहू बसला आहे. चंद्र लाभ स्थानातून या सप्ताहाचे भ्रमण सुरू करीत आहे. संततीचे स्थान असलेल्या पंचमात गुरू विराजमान आहे. यामुळे संततीच्या नोकरी, व्यवसाय, विवाह या अनुषंगाने काही हालचाली या सप्ताहात अवश्य घडतील. आठवडाअखेर काही मंडळींना आरोग्याच्या किरकोळ कुरबुरी निर्माण होऊ शकतात. कौटुंबिक जीवनात तणाव निर्माण होऊ शकतो. जोडीदाराशी मतभेद टाळा. कुटुंबात वारसा हक्काच्या संबंधातून भावंडात वादविवाद, मानसिक चिंता निर्माण होऊ शकतात.

**शुभ दिनांक - १८, २०, २१, २२.**

## कौटुंबिक जीवनात आनंद

मीन

नोकरी करणाऱ्यांना हा आठवडा उत्तम ठरू शकतो; मात्र जबाबदारी वाढवून तो दगदग, चिंता वाढवू शकतो. सध्या आपला राशिस्वामी गुरू सुख स्थानात विराजमान असून आपल्या राशीत शनी बसला आहे. चंद्र दशम स्थानातून या सप्ताहातील भ्रमण सुरू करीत आहे. आठवड्याच्या मध्यात काहीशी खर्चवाढ संभव आहे. आठवडाअखेर कौटुंबिक जीवनात आनंद निर्माण होईल. जोडीदाराशी एकमत झाल्याने काही कौटुंबिक कामे तडीस नेता येतील. कुटुंबात मंगलकार्य ठरावे. हवामानातील बदल त्रासदायक ठरू शकतो. सध्या आपणास साडेसाती सुरू आहे. हा काळात सावधपणे वागणे, मोठे व्यवहार सतर्कपणे करणे आवश्यक असते. ती खबरदारी बाळगली पाहिजे. आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. पथ्ये पाळा.

**शुभ दिनांक - १८, २०, २३, २४.**

गाथा पर्यावरणाची

# सौदी अरेबियात बर्फवृष्टी; चिंता भारताला

मिलिंद बेंडाळे

उष्ण वारे आणि वाळवंटी हवामानासाठी ओळखल्या जाणाऱ्या सौदी अरेबियातील हवामान झपाट्याने बदलत आहे. आता वाळवंटी भागात पाऊस पडत आहे. शिवाय, बर्फवृष्टी झाली. सौदी अरेबियाच्या अनेक भागात बर्फवृष्टी, मुसळधार पाऊस आणि तापमानात घसरण यामुळे लोकांना आश्चर्य वाटले. हवामान बदल आता त्यासाठी तयार नसलेल्यांवरही परिणाम करीत आहे. त्याचा भारतावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.



अलिकडच्या काळात सौदी अरेबियाच्या अनेक भागांमध्ये हिमवृष्टी दिसून आली आहे. सौदी अरेबियाच्या उत्तरेकडील ताबुक प्रांताच्या पर्वतांमध्ये मुसळधार हिमवृष्टी झाली. अनेक भागात बर्फाची पांढरी चादर दिसते. जेबेल अल-लॉजमधील २,६०० मीटर उंचीवर असलेल्या ट्रोजनामध्ये पावसासह हलकी हिमवृष्टी झाली. हेल प्रांतात अनेक ठिकाणी हिमवर्षाव झाला. येथे हिमवर्षाव दुर्मिळ आणि असामान्य मानला जातो. बर्फवृष्टी आणि पावसामुळे येथील अनेक भागांमध्ये तापमान गोठणबिंदूपेक्षा खाली गेले होते. उंचावरील अनेक भाग बर्फाच्या चादरीने झाकले आहेत. थंडीची लाट आली. हिमवर्षावाव्यतिरिक्त पाऊसदेखील आश्चर्यकारक आहे. बीर बिन हरमास, अल-ऐना, अम्मर, अल-उला आणि शकरा येथे हलका पाऊस पडला, तर रियाध, कासिम आणि पूर्वेकडील भागात मुसळधार पाऊस पडला. पूर्वी वाळवंटात व्यापलेला सौदी अरेबिया अलिकडे बर्फाच्या चादरीने झाकला गेला. सौदी अरेबियाच्या राष्ट्रीय हवामान केंद्राच्या (एनसीएम) मते, रियाधच्या उत्तरेकडील अल-मजमाह आणि अल-घाट येथे हिमवर्षाव झाला. तिथे मोकळे भाग आणि उंचावरील भाग बर्फाने झाकलेले होते. थंड हवेचा मोठा भाग मध्य आणि उत्तरेकडील भागात स्थलांतरित होऊन पाऊस पडणाऱ्या ढगांमध्ये मिसळल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. अल-मजमाह आणि अल-घाट येथे हिमवर्षाव पाहण्यासाठी लोकांची गर्दी जमली होती. हवामानात अचानक झालेल्या बदलामुळे चिंता निर्माण झाली. केवळ सौदी अरेबियामध्येच नाही, तर संयुक्त अरब अमिराती (यूएई) मध्येही हवामान बदलत आहे.

अलिकडच्या काळात दक्षिण आशियामध्ये उष्णतेच्या लाटा विक्रम मोडत आहेत. मध्य पूर्वेमध्ये अचानक आलेला पूर आणि युरोप आणि उत्तर आफ्रिकेच्या काही भागात झालेल्या बर्फवृष्टीमुळे हे दिसून आले आहे की, हवामान बदलामुळे जगभरात हवामान अधिकाधिक अनपेक्षित बनत आहे. सौदी अरेबियासारख्या वाळवंटी देशात बर्फवृष्टी ही एक दुर्मिळ घटना मानली जाते; परंतु या हिवाळ्यात देशाच्या उत्तरेकडील भागात घडले, ते असामान्य आणि चिंताजनक होते. ताबुक आणि आसपासच्या पर्वतीय भागात तापमान अचानक घसरले. पर्वत आणि वाळवंट बर्फाच्या चादरीने झाकले गेले. त्यामुळे अधिकाऱ्यांना हवामानविषयक इशारा देणे भाग पडले. अशी परिस्थिती सामान्यतः थंड देशांमध्ये दिसते; मध्य पूर्वेतील वाळवंटांमध्ये नाही. वाळवंटातील बर्फवृष्टीचे व्हिडीओ 'सोशल मीडिया'वर झपाट्याने व्हायरल झाले. लोक त्याकडे फक्त सुंदर दृश्ये म्हणून पाहत होते; परंतु त्यामागील संदेश अधिक गंभीर होता. वाळवंटातील बर्फवृष्टी दर्शवते की, पृथ्वीच्या हवामान प्रणालीमध्ये मूलभूत बदल होत असून त्याचे परिणाम आता स्पष्टपणे दिसत आहेत. या घटनेवरून हे स्पष्ट होते की, हवामान बदल आता दूरची किंवा काल्पनिक समस्या नाही. हा बदल आपल्या डोळ्यांसमोर आणि कधी कधी इतिहासात कधीही न पाहिलेल्या पद्धतीने घडत आहे. हवामान बदल फक्त तापमानवाढ नाही. हवामान बदल म्हणजे तापमानात वाढ होणे असा अर्थ होतो. शास्त्रज्ञांच्या मते, वास्तव उलट आहे.


पृथ्वी गरम होते, तेव्हा वातावरणात जास्त आर्द्रता आणि ऊर्जा साठवली जाते. यामुळे दीर्घकालीन हवामान पद्धतींमध्ये व्यत्यय येतो आणि अचानक, तीव्र आणि असामान्य हवामान घटना घडतात. म्हणूनच आपण आज जगभरात, विशेषतः भारतात आपण तीव्र उष्णतेच्या लाटा, अचानक मुसळधार पाऊस किंवा थंडीचा अनुभव घेत आहोत. अगदी अशा ठिकाणीही हे घडते जिथे असे काही घडण्याची अपेक्षा नसते. या वर्षी भारताने हवामान बदलाचे धोकादायक संकेत प्रत्यक्ष अनुभवले. उत्तर आणि मध्य भारतात उष्णतेच्या विक्रमी लाटा आल्या. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. त्यानंतर उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि सिक्कीममध्ये विनाशकारी ढगफुटी झाली. त्यामुळे व्यापक विनाश झाला. दरम्यान, काही राज्यांमध्ये तोच मान्सून उशिरा आणि अनियमितपणे आला, तर इतर भागांमध्ये प्राणघातक पूर आला. या घटना केवळ योगायोग नाहीत, तर तणावाखाली असलेल्या हवामान प्रणालीची स्पष्ट चिन्हे आहेत. भारतासाठी हा इशारा हिमवृष्टीसारख्या असामान्य घटनांपुरता मर्यादित नाही, तर संपूर्ण परिसंस्था अस्थिर होत असल्याचे संकेत देतो. भारतात, कृषी चक्र, पाणी व्यवस्थापन, शहरी नियोजन आणि विजेची मागणी हे सर्व निश्चित हवामान पद्धतींवर आधारित आहे. हे नियम मोडतात, तेव्हा नुकसान वाढते. पिकांचे नुकसान, शहरी पूर, अतिउष्णतेमुळे होणारे मृत्यू आणि आर्थिक नुकसान अशा परिणामांना सामोरे जावे लागते. उष्णतेला अनुकूल शहरांचे नियोजन, मजबूत पूर्वसूचना प्रणाली, पूर-सुरक्षित पायाभूत सुविधा, हवामान बदल रोखण्याचे प्रयत्न आवश्यक आहेत; परंतु अनुकूलन आता अपरिहार्य आहे.

सौदी अरेबियातील हिमवर्षाव केवळ व्हायरल बातम्या म्हणून नाकारता कामा नये. हे अशा जगाचे आणखी एक लक्षण आहे, जिथे हवामान अधिकाधिक अस्थिर आणि धोकादायक होत चालले आहे. पृथ्वी गरम होत जाईल, तसतशा अशा तीव्र हवामान घटना वारंवार घडतील. संकट आता दाराशी नाही, ते आधीच आत आहे. संदेश केवळ भारतासाठी नाही, तर संपूर्ण जगासाठी स्पष्ट आहे. हवामान संकट आता एक भयानक धोका नाही, तर सध्याचे वास्तव आहे. ते आता आपले दार ठोठावत नाही, तर आपल्या जीवनात आधीच प्रवेशले आहे. सौदी अरेबियातील ही घटना जागतिक दक्षिणमध्ये उदयास येणाऱ्या एका मोठ्या पॅटर्नचा भाग आहे. आग्नेय आशियामध्ये वारंवार येणाऱ्या पुरामुळे लाखो लोक विस्थापित झाले आहेत. आफ्रिकेतील अनेक भाग दुष्काळ आणि मुसळधार पाऊस झेलत आहेत. त्यामुळे शेती उद्ध्वस्त झाली आहे. दक्षिण अमेरिकेतील असामान्य तापमानाचा परिणाम परिसंस्था आणि वीज पुरवठ्यावर झाला आहे. हे स्पष्ट होत आहे की, विकसनशील देशांना सर्वात जास्त त्रास सहन करावा लागत आहे. कारण लोकसंख्या दाट झाली आहे. पायाभूत सुविधा कमकुवत झाल्या आहेत. उपजीविका हवामानावर अधिक अवलंबून आहे. अल्पकालीन हवामानातील अडथळेदेखील मानवीय आणि आर्थिक संकटात बदलू शकतात. या वर्षी ब्राझीलमधील बेलेम येथे झालेल्या कोप ३० हवामान शिखर परिषदेतही हा मुद्दा चर्चेचा केंद्रबिंदू होता.

जगभर हवामान बदलाचे गंभीर परिणाम पाहायला मिळत आहेत. कुठे दुष्काळाची परिस्थिती आहे, कुठे पूरस्थिती आहे तर अनेक भागांमध्ये अनैसर्गिक घटना घडताना दिसत आहेत. सौदी अरेबियामध्ये हिमवृष्टी होणे, ही तशी दुर्मिळ बाब आहे; परंतु या हिवाळ्यात देशाच्या उत्तर भागात विलक्षण आणि चिंताजनक दृश्य पाहायला मिळाले. अशा घटना सहसा थंड हवामान असलेल्या देशांमध्येच पाहायला मिळतात. सौदी अरेबियातील बर्फवृष्टी हा भारतासाठीही एक गंभीर इशारा मानला जात आहे. वाळवंटातील या हिमवृष्टीने जगाला संकेत दिला आहे की, पृथ्वीच्या हवामान प्रणालीमध्ये काही तरी मूलभूत बदल होत आहेत. त्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत. हवामान बदल ही केवळ भविष्यातील किंवा काल्पनिक भीती राहिलेली नाही, हे या घटनेने स्पष्ट केले आहे. पृथ्वी तापत आहे, तसतशी वातावरणात आर्द्रता आणि ऊर्जा साठवण्याची क्षमता वाढत आहे. त्यामुळे हवामान चक्रांचा समतोल बिघडत आहे. याच कारणामुळे भारतासह संपूर्ण जगाला तीव्र उष्णतेच्या लाटा, अतिवृष्टी आणि अनपेक्षित ठिकाणी अचानक येणाऱ्या थंडीच्या लाटांचा सामना करावा लागत आहे. भारतासाठी हा इशारा बर्फाच्या वादळांबाबत नसून ढासळत चाललेल्या परिसंस्थेबाबत (इको सिस्टिम) आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करणे जितके गरजेचे आहे, तितकेच बदलत्या हवामानाशी स्वतःला जुळवून घेणे गरजेचे झाले आहे. सौदी अरेबियातील हिमवृष्टीकडे केवळ एक कुतूहल म्हणून पाहून दुर्लक्ष करता येणार नाही. उष्णता वाढत जाईल, तसतशा अशा विचित्र घटना वारंवार घडतील. त्यासाठी आता तयार राहावे लागेल.

*(लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)*

## रविवारचे महाशब्दकोडे ५३१



*आडवे शब्द:-* 1) खडतर; कष्टप्रद, 3) गळणे, 5) मोडी लिपीचा उल्लेख जुन्या काळी ××××× असा केला जात होता, 8) क्रूर, 10) श्रीखंडाचे दही, 11) ठीक; छान, 12) एका वाचकाचे मत आहे: 'महाराष्ट्राच्या गल्लीबोळांतही कवींचा सुळसुळाट झालेला आहे! आणि चिंताजनक बाब ही की, प्रत्येक कवी स्वतःला थेट कुसुमाग्रजी ×××× समजत असतो', 14) अग्रज; गुंड, 15) वैगुण्य; पुष्कळ पायांचा सरपटणारा प्राणी, 16) पुढे उत्कर्ष पावेल असे ज्याच्याबद्दल वाटते असा हुशार व प्रगतिपर, 19) सलग बारा वर्षे, 21) नर्मदेचे उगमस्थान, 23) शक्तिमान; सडेतोड, 26) प्रामाणिक; गरीब, 28) विशिष्ट झाडाच्या चिकापासून 'हा' बहुउपयोगी पदार्थ तयार होतो, 30) बोहल्यावरील उपवधू, 31) एक पांघरुण, 33) उल्लेखनीय, 35) मोहक स्त्री, 38) आजोळ म्हणजे 'ही'च्या बापाचे घर, 39) अटोळी म्हणजे फणस, खारीक, जांभूळ यांसारख्या ×× फळांतील बी, 40) बळ; हिंमत, 42) स्त्री; वधू, 44) अंतर्भाव, 46) अर्धांगवायू, 48) वाणीची अधिष्ठात्री देवता, 49) रम्य, 52) छलांग, 53) कीर्ती; होडी, 54) मेवाडच्या राजघराण्यात जन्मलेली एक स्त्री-संत, 56) विळा, 57) शिस्त; वक्रता; रीत, 58) समुद्राची अधिष्ठात्री देवता, 60) हुंगण्यासाठी तंबाखूची पूड, 62) मकई, 64) अफरातफर, 66) गोदाम, 67) एक पक्षी, 68) गोंधळलेला, 69) एकत्रित, 70) सारासारविचार, 71) एक पशू, 73) प्रदाता; हाताचा पंजा; महसूल, 74) इंग्रजीत चिखल (संदर्भ: चिखल उडू नये म्हणून सायकलच्या चाकां- वर असणारा भाग), 75) चिन्ह, इशारा, 76) आताचा, 78) वर काटे व आत गरे असणारे फळ, 80) डोकेबाज, 81) कृतांत, 84) ताठा, 85) एक नृत्यप्रकार, 87) एक संख्या, 90) नक्राश्रू गाळणे म्हणजे ×××× दुःख प्रदर्शित करणे, 92) मृदू सुताचे व बारीक विणीचे पातळ (वस्त्र), 93) बूट, खुबीदार नवी कल्पना, 94) मिठाईवाला, 96) गोंगाट, 98) चश्मा, 99) कोवळा असल्यामुळे न वाजणा-या नारळाचे विशेषण, 100) पौष्टिक (पदार्थ), 102) डोंगा, 103) संघर्ष, 105) अनिष्टचिंतन, 106) जखम, 108) उकाडा, धग, 109) गोव्याची व्यावसायिक, सांस्कृतिक आणि धार्मिक राजधानी असलेले शहर, 112) वर्तमान, 114) बेपत्ता, 115) पूर्वीचा एक वर्ण, 116) धाव-पळ, 118) अनोळखी, 119) भिक्षेत मिळालेली वस्तू, 120) बेचैनी; घोटाळा, 121) समुद्री लाटांचा घनगंभीर आवाज.

*उभे शब्द:-* 1) रागाचा झटका, 2) हक्क सांगणारा, 3) दरशेकडा, 4) कुपुत्र, 5) पाठीमागचा भाग, 6) धड-धडीत, 7) शेतमाल, 8) चतकोर 9) पैज, 10) पाणीदार; चकचकीत, 11) सूर्याचा सारथी, 13) भव्य, 14) मूल्य, 15) छावणी; काठाची शिवण, 16) सकारात्मक उत्तर, 17) उणीव, 18) ददात, 20) मुंबईचे एक उपनगर, 21) विलक्षण, 22) इंग्रजीत बेकार किंवा नष्ट, 24) एक वाद्य, 25) अनुवाद, 26) हळू, 27) बरोबरी, 29) आचारी, 32) पिता, 34) एक वाद्य, 36) चाकर, 37) लग्नासाठी मुलगी द्या असे म्हणणे, 38) हल्ली, 41) तपकिरी, 43) एक अष्टमांश भाग, 44) प्रपंच नसल्यामुळे एकटी, 45) मोहल्ला, 46) अविलंब, 47) हत्ती, 48) शिक्षा, 50) संपत्ती, 51) झुंड, 52) उतावीळ, 55) निरोप, 57) वरचढपणा, 59) अबोला, 61) मुद्दाम, 63) अंगमेहनत, 64) अंधाधुंदी, 65) दुःखाचा तळतळाट, 67) सारखेपणा, 69) जाडगेला, 72) भाईचारा, 73) दरिद्री, 77) पहारा, 79) जोराने, 82) मका, 83) निकटपणा, 84) पूर्वीचा, 86) अवाढव्य, 88) तोडीस तोड, परस्परसमान, 89) भोंगळ; ढिला, 91) उत्कट इच्छा, 92) तळे, 94) अर्धचंद्र, 95) एक कोकणी गाव, 97) योजना; जुळणी, 98) आर्थिक सामर्थ्य, 100) टीकाकार, 101) प्रसंग; मोसम; जमाना; वेळ, 104) आचरट, फाजील आणि उलाढाली स्त्रीचे विशेषण, 105) भलेबहाद्दर; वाहवा, 107) धट्टाकट्टा; धडधाकड, 110) बेसावध, 111) डुलकी, 113) एक रास, 116) संघ; मंडळ; समूह; पर्ण; चमू, 117) विश्वासघात. *(उत्तर: पुढील अंकात)*

*मागील शब्दकोड्याचे उत्तर*



AMRITA BHASKAR NANDANWAR 9822568532, 8329510310

## कोणे एके काळी

**स्वाती काळे (कोलारकर)**
swatimak@gmail.com





# लावणी मध्ययुगाची सावली

'लावणी' या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. लावणी या शब्दाची लवण म्हणजे मीठ किंवा चवीपासून उत्पत्ती झाली. त्यामुळेच लावणी म्हणजे शृंगारिक गीत असाही एक अर्थ काढला गेला आहे. पण केवळ शृंगारिक स्वरूपाची वर्णने म्हणजे लावणी ही लावणीची व्याख्या खरी नाही. मराठ्यांच्या १७ व्या शतकातील उत्तरेकडील स्वाऱ्यांमुळे मराठी घरांमध्ये पूर्वीपेक्षा जास्त चैनीची राहणी आली. घराण्यातील स्त्रिया अंगावर दागिने मढवून बाजारहाटीला जाऊ लागल्या. त्यामुळे शाहिरी लेखणीत पराक्रमाप्रमाणेच साजशृंगारही अभिव्यक्त होऊ लागला. याही काळात अनेक शाहिरांनी हिंदू देवदेवतांवर, तीर्थक्षेत्रांवर, सामाजिक परिस्थितीवर लावणी रचली आणि ही लावणी पुढील काळात इतिहासाचे महत्त्वाचे साधन बनली. लावणीचा उगम १४ व्या शतकात मानला जातो. या लावण्यमयी लोकगंगेचा हा खळाळता प्रवाह जनसामान्यांपर्यंत पोहोचला तो पेशवाईच्या काळातच. सवाई माधवराव पेशवा (इ. स. १७७४-१७९५) आणि दुसरा बाजीराव पेशवा (इ. स. १७९५ ते १८१८) या दोघांनीही लावणीला राजदरबारी सन्मानाने वागवले. पेशव्यांच्या सांगण्यावरूनच होनाजीबाळाने लावणीला रागतालाचे मोतीहार घातले. कथा रूपातली लावणी आता घुंगरांच्या तालावर थिरकू लागली.

होनाजी बाळा (इ.स. १७५४-१८४४), राम जोशी (इ. स. १७६२-१८१२), अनंत फंदी (इ. स. १७७४-१८१९), सगनभाऊ (इ. स. १७७८-१८४०), प्रभाकर (इ. स. १७६९-१८४३) हे सर्व समकालीन शाहीर पेशवाई काळातलेच. त्यांच्या प्रतिभेला दाद द्यायला हवीच; विशेष म्हणजे या सर्व शाहिरांनी त्या काळच्या समाजाचा आरसपानी तळही लावणीतून दाखविला आहे. काही लावण्यांमधील वर्णने आणि पेशवे दफ्तर नोंदी यात खूप साम्य आहे. म्हणूनच लावणी प्रकाराकडे इतिहासाचे एक साधन म्हणून बघणे अतिशय उद्‌बोधक ठरते. होळी, दसरा, दिवाळी कोणताही सण असो, पेशवा दरबारात अनेक शाहीर हजर होत. त्यांना १० ते १५ रुपये एवढी बिदागी मिळायची. उत्तरेकडे अनेक राजकीय स्वाऱ्या पहिल्या बाजीराव पेशव्याच्या काळापासून झाल्या आहेत. छत्रसाल बुंदेला राजाला बाजीरावाने लष्करी संरक्षण दिले. त्या बदल्यात छत्रसालाने आपल्या राज्यातील काही प्रदेश तर दिलेच; पण बाजीरावाला बुंदेलखंडमधील काही हिऱ्यांच्या खाणींचेही अधिकार दिले. गोविंदपंत या बुंदेलखंडी प्रांताचे सुभेदार होते. हिऱ्याची वसुलीही तेच करायचे. मध्यप्रदेशाहूनदेखील नानासाहेब पेशव्यांनी अनेकदा सोन्या-चांदीचे दागिने, रत्न, मोती तेथील आपल्या सरदारांकडून मागवले आहेत. मध्यप्रदेशातून उंची तलम वस्त्रे, वाळ्याचे पडदे, हस्तिदंत मागवण्याची रीत नानासाहेब पेशव्यांनी पाडली. सर्व मुघल राजे फळबागा आणि फुलबागांचे चाहते होते. जेव्हा औरंगजेब आपला मुलगा अकबर (दुसरा) याचा माग काढत दक्षिणेत आला तेव्हा उत्तरेतील डाळिंबे, मोसंबी, संत्री, फळाफुलांच्या बागा बऱ्हाणपूरमध्ये निर्माण केल्या गेल्या. पेशव्यांनाही फळाफुलांच्या बागांचा मोह आवरला नाही आणि त्यांनी अनेक रोपे तेथून मागितली. या सर्व समृद्ध ऐतिहासिक गोष्टींची झलक त्यावेळच्या लावण्यांमध्ये दिसते त्यामुळे लावण्यांकडे इतिहासाचे एक साधन म्हणून बघितले गेले पाहिजे.

उदाहरणच द्यायचे झाले तर प्रभाकर या शाहिराच्या एका लावणीत फळाफुलांची उधळण झालेली दिसते. अननस, बदाम, डाळिंबे, खजूर, सीताफळ इत्यादी फळे तर गुलाब, मोगरा, गुलदावरी, सुवर्णचंपक, गुलछबू, शेवंती अशी वेगवेगळी सुगंधित फुले प्रभाकरच्या लावणीत येतात आणि त्यांचे समकालीन सगनभाऊंच्याही लावण्यांमध्ये फळाफुलांची रसदार आणि सुगंधित वर्णने येतात. गंमत म्हणजे १८१३ च्या दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दीमधील कागदपत्रात असलेल्या फळाफुलांच्या नोंदींशी लावणीतील फळाफुलांची नावे जुळतात. या ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये उल्लेख आहेत की, संत्री, डाळिंबे, द्राक्षे, खजूर आणि मोतिया, गुलाब, वेलीया, मदनबाण ही सर्व झाडे बाजीरावांच्या बगीच्यात होती.

शाहिरांच्या लावण्यांमध्ये सुवर्णालंकारांनी वाकलेल्या ललनांची रसाळ वर्णने आहेत. त्यांच्या दागदागिन्यांमध्ये 'होरमुजी' मोत्याचा उल्लेख हमखास सापडतो. मध्यपूर्वेमधील 'होरमुझ' या बंदराजवळील आखाती प्रदेशात तयार होणारा हा पिवळसर तेजाळ मोती सुरतेला बाजारात आणला जाई. तो गुळाच्या रंगाचा म्हणून 'गुळधवा' असेही म्हटले जाई. पेशवे आपल्या मुकुटासाठी आणि त्यांच्या स्त्रिया गळ्यातील सरींसाठी किंवा नथीसाठी 'गुळधवा मोती' मागवायचे. लावणीत होरमुजी मोतियांचे वर्णन असले तर समजायचे की उच्च प्रतीचे मोती आहेत. हे मोती सुरतहून यायचे त्यामुळे त्यांना 'सुरती मोती' म्हटले जायचे. पोवळी, माणिक, पाचू, इंद्रनील यांच्या नोंदी पेशव्यांच्या रोजनिशीत सापडतातच; पण लावण्यांमध्येदेखील स्त्रियांच्या दागिन्यांच्या वर्णनात या सर्व रत्नांची वर्णने केली आहेत.

मध्ययुगीन काळात बऱ्हाणपूरला आणि पैठणला कापडाची मोठी व्यापारपेठ होती. आजही बऱ्हाणपुरात फिरताना अनेक घरांमध्ये हातमाग यंत्रांचा धडधड आवाज येत असतो. महमुद्या, गजनी हे कपडे बऱ्हाणपूरहून मागवले जात. गजनी प्रकारात एक धागा सुताचा आणि एक जरीचा वापरला जात असे. 'अंगावाणी' म्हणजे फुलांचा कशिदा काढलेले अंगरख्याचे सुती कापड होते. हा कपडा बऱ्हाणपुरहूनच यायचा. शाहीर विश्वनाथ यांच्या लावणीतील शब्दांमध्ये पेशवेकालीन कपड्यांचा तलमपणा उतरलेला दिसतो.

'बराणपुर पैठण थेट पोशाख आणिले तेथून ।
अंगावाणी चंदेरी महमद्या सांगितल्या म्या आतून ।'

महादजी शिंदे यांच्या काळात इ. स. १७९३ च्या चैत्र महिन्यात रंगोत्सव सुरू झाला. होळीचा सण महाराष्ट्रात सुरू झाला, ही ऐतिहासिक नोंद अनेक लावण्यांमध्ये आलेली आहे.

'शके सत्राशेपंधरा चैत्रनामप्रमादीसंवत्सरे ।
अती आदरे पहा रंग खेळले ।'

होळीचे रंग शृंगाररसात मिसळले आणि होनाजी बाळा, कवी मार्तंड या शाहिरांनी होळीच्या रंगात रंगुनी शृंगारिक लावण्या लिहिल्या. १६ व्या शतकाच्या पूर्वार्धात विजयनगरच्या साम्राज्यानंतर तंजावरचे 'नायक' राजे तेथील राजे झाले. छत्रपती शिवाजी महाराजांचे पिता शहाजीराजे तेव्हा विजापूर दरबारात होते. नंतर त्यांची नेमणूक दक्षिणेला झाली. पुढे शहाजीपुत्र व्यंकोजीने 'नायक'चा दारुण पराभव करून तंजावर जिंकले आणि कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा या प्रांतात आपली मऱ्हाठी संस्कृतीही पोचली. व्यंकोजीराजाने साहित्याला तसेच मराठी लोककलांना उत्तेजन दिले. शहाजीराजे (दुसरे), एकोजी (दुसरे), राजे प्रतापसिंह, राजे शरफोजी उर्फ सरफोजीराजे भोसले या राजांनी अनेक मराठी नाटके आणि लावण्या तामिळ लिपीत लिहिल्या आणि तेथील दक्षिणात्य जनतेला आपलेसे केले. या तंजावरी लावण्या शृंगारिक आणि आध्यात्मिकही आहेत. सरफोजी राजे भोसले यांनी तीर्थयात्रेची लावणी लिहिली. श्रीकृष्ण गोपीच्या थट्टामस्करीचे वर्णनही तंजावरी लावणीत येते.

'सोडी रे, सोडी रे, पदर श्रीकृष्णा कसं नाही मनाची चाड....'

दूर लष्करात असणाऱ्या पतिविरहाचे वर्णन तंजावरी लावणीत सापडते. त्याकाळी बहुतांशी मराठे लष्करी छावण्यांमध्येच असायचे. त्यांच्या स्त्रियांची विरहाची तगमग लावण्यांमध्ये उमटली.

'पतिराज गेले लष्करा गं ।
मला विसर पडेना जरा गं ॥
झाले महिने बारा तेरा गं ।
एक खबर धाडेना घरा जी ॥
माझ्या सौभाग्याचा दोरा गं ।
नाकी नत मोत्याचा हीरा गं ॥'

चांदा जिल्ह्यात 'कुरुमार' नावाचे मेंढ्यांची लोकर कापून घोंगडी विकणारे आदिवासी लोक राहतात. त्यांनी सणासुदीच्या दिवशी सादर केलेल्या दंडारमध्ये लावणीला मोठे स्थान आहे. शृंगारिक लावणीचे पाखंडी, लस्करी, सिनगारी असे तीन भाग दंडारमध्ये आपण बघतो. लस्करी लावणीमध्ये-

'पती गेले लस्करात माझे परदेशा बाई ।
रात्र जाते वैऱ्याशीन मला झोप येत नाही ॥'

अशा अर्थाचे पत्नीचे विरहगीत येते. दंडारी लावणीत रामायणी, ऐतिहासिक, गतकालीन लावणी असेही प्रकार येतात. ऐतिहासिक लावणीत प्रामुख्याने महाभारताचे वर्णन असते आणि 'गतकालीन' लावणीत पेशवाईतील घटना, शिवाजी महाराज, टिळकांना झालेली शिक्षा, गांधीजींची 'चले जाव' चळवळ अशा स्वातंत्र्यपूर्व काळातील ऐतिहासिक नोंदी गुंफलेल्या असतात.

'बर्डीवरूनी तोफ डागली, इंग्रज हो आला,
तोफ काढुनी सलामी दिली, बत्ती दिली तोफेला ।'

काही लावण्यांमध्ये इंग्रजांनी केलेल्या सुधारणांचेही वर्णन येते. विशेषकरून इंग्रजांनी निर्माण केलेल्या आगगाडीचे कोडकौतुक गतकालीन दंडारी लावण्यांमध्ये झालेले दिसून येते. १८ व्या शतकाच्या सुरुवातीला दक्षिणेकडे मोठा दुष्काळ पडला होता. त्याबद्दलच्या दुष्काळी लावण्या राम जोशी आणि अनंत फंदी यांनी लिहिल्या आहेत. नर्मदेच्या पुराचे विदारक वर्णन दंडार लावणीत आले आहे.

'मनी आनंदली नर्मदा, हासे खदखदा ।
मग आली उल्लासात, दनादना खेळे फुगड्या ।
ठोके मग उड्या, थडीच्या वर्त...॥'

शाहिरांना ऐतिहासिक सत्याचे भान निश्चितच होते आणि त्याचे प्रतिबिंब लावणीत उतरले आहे. अनेक राजांनी पदरी नाटकशाळा बाळगल्या होत्या. अनेक पेशव्यांच्या नाटकशाळा होत्या. या वास्तविकतेचे पडसाद लावण्यांमध्ये पडले आहेत. अनेक गावांना ऐतिहासिक महापुरुष लाभलेला असतो. गोंदिया जिल्ह्यातील नवेगावबांधला 'कोलू पाटील' हा कर्तृत्ववान महापुरुष लाभला होता. त्याबद्दलची लावणी नवेगावबांधची लावणी म्हणून प्रसिद्ध आहे.

'नवेगाव बांध आहे गुलजार की रस्ता वाहे,
गावाच्या बाहेर राहे केवड्याचा बन ।
कोलू चिमन पाटील डोंगरवार,
बांध बांधिले कवडी कवडीन ॥'

मराठ्यांनी लावणीचे रोपटे दक्षिणेकडे रुजवले. दक्षिणेप्रमाणे ग्वाल्हेर, बडोदा, इंदूर, धार ही देखील काही काळ मराठी राज्याची केंद्रे होती. येथील राजे मराठी भाषिक असल्याने राजभाषा मराठी होती. त्यामुळे महाराष्ट्राबाहेर लावणी 'मराठ्यांची खरी गाणी' म्हणून ओळखली जात असे. भरतमुनी म्हणतात,

'रसा भावा ह्याभिनया धर्मीवृत्तीप्रवृत्तयः ।
सिद्धिः स्वरास्तथातोद्यं गानं रंगश्च संग्रहः ॥'

प्रयोगसिद्धीकरिता आठ रस, एकोणपन्नास भाव, चतुर्विध अभिनय, द्विविध धर्मी, चार वृत्ती, चार प्रवृत्ती, द्विविध सिद्धी, स्वर, आतोद्य, गान नाट्यसंगीत आणि त्रिविधरंग म्हणजे रंगभूमी हा नाट्यसंग्रहाचा पूर्णानुभव आहे आणि लावणी या प्रकारात हा पूर्णानुभव रसिकाला अनुभवायला मिळतो. या परिपूर्ण लावणीला मध्ययुगीन इतिहासाचे प्रभावी साधन म्हणून बघितले तर भूतकाळातील अनेक गुपिते आपल्याशी हितगुज करू लागतात.

## संस्कारांच्या देशा

**डॉ. रमा गोळवलकर**
९४२२११४६२०

# नामकरण - १

गर्भाधान, पुंसवन, सीमंतोन्नयन, जातकर्म हे चार संस्कार जि/ज्याच्यावर झालेले आहेत ती/तो जन्मजात सनातनी असतो. अशाला 'अभिजात' म्हटल्यास वावगं ठरू नये. हे सगळे संस्कार म्हणजे ति/त्याला एक उत्तम व्यक्ती, सुसंस्कृत सुदृढ सुघड कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्त्वाची/चा करण्याचा केलेला संकल्प. ते व्यक्तिमत्त्व पुढे या समाजाचा घटक म्हणून वावरणार आहे. त्याच्यामुळे हा समाज घडणार आहे, याची जाणीव ठेवून केलेला प्रयत्न सफल झाला की, एक सनातनी बाळ जन्माला येतं. ती/तो समाजाचाच एक भाग असला, तरीही ति/त्याचं म्हणून काही स्वतंत्र अस्तित्व असणार आहे. कुटुंबात, समाजात त्याची स्वतंत्र ओळख निर्माण होणार. ती देण्याची पहिली पायरी म्हणजे ति/त्याचं नाव! या सगळ्याचा विचार करूनच त्या व्यक्तीला नाव देण्याची प्रथा अनादिकालापासून आजतागायत सुरू आहे.

भारतीय परंपरेनुसार बाळाचं बारसं बाराव्या दिवशी करण्यात येतं. दहा दिवस वृद्धी-सोयाराचे असतात. त्या काळात आई आणि बाळ दोघेही स्थिरस्थावर होण्याच्या प्रयत्नात असतात. तेवढा वेळ त्यांचा म्हणून त्यांना द्यायलाच हवा. त्यानंतरचा म्हणजे अकरावा दिवस शुद्धिकरणादि कामात जातो. त्यानंतर लगेचचा दिवस म्हणून बाराव्या दिवशी कोणताही मुहूर्त न बघता पाळण्यात घालण्याची पद्धत आहे. आई, तेलपाणी करणारी बाई, आजी वगैरेच्या हातांवर, कुशीत, मांडीवर वाढणाऱ्या बाळाची स्वतःचं असं स्थान म्हणजे पाळणा. त्यात घालून मग त्याच्या कानात त्याचं नाव सांगायचं ही प्रथा आपण पाळतो.

नाव हे विशेषनाम असावं असा सनातनी प्रघात आहे. आजकाल तो पाळला जातोच असं नाही. कारण सध्याच्या इंटरनेटच्या युगात सर्च इंजिनच्या माध्यमातून चित्रविचित्र आणि निरर्थक प्रसंगी अनर्थक नावं शोधून ठेवण्याचा सपाटाच नवीन आईबापांनी लावलेला आहे. तरीही अर्थगर्भ, सार्थ आणि विशेषतः देवी-देवतांची नावं मुला-मुलींना ठेवण्यात येतात. त्याचं कारण म्हणजे बाळात त्या त्या नावाप्रमाणे गुणधर्म उत्पन्न व्हावेत आणि त्याचं व्यक्तिमत्त्व दैवी अंश असलेला व्हावा. शिवाय, मुलांना जो कोणी हाक मारेल त्याच्या तोंडी आपसूकच देवाचं नाव येईल.

विशेष नाव म्हणजे काय ते समजावून घेऊ. कृष्ण म्हणजे काळा हा झाला सर्वसामान्यांना माहीत असलेला एक अर्थ. पण



'कोणी गोविंद घ्या कोणी गोपाळ घ्या...'

'कृष्ण' म्हणजे ओढणे / आकर्षून घेणे या धातूपासून सिद्ध झालेला असल्यामुळे जो सर्वांना आपल्याकडे आकर्षून घेतो तो 'कृष्ण' असा या शब्दाचा अर्थ होतो. तर, शंकर (शं करोति) म्हणजे कल्याण करणारा असा होतो. वसुंधरा हे नाव पृथ्वीचं आहे. कारण वसु म्हणजे सोन्यासह इतर सगळी संसाधनं आणि मौल्यवान रत्नं-धातू इत्यादी जी धरून ठेवते ती. दुर्गतीचा नाश करणारी ती 'दुर्गा.' अशा व्याकरणदृष्ट्या अचूक आणि आशय समृद्ध नावांची सूचीच आपल्या पूर्वजांनी तयार करून ठेवलेली आहेत. देवी-देवतांची सहस्रनामावली! आजकाल त्यातही भेसळ होऊन विविध बाबा, साधू, माता, अम्मा इत्यादींच्या नावाच्या व्याकरणदृष्ट्या सदोष असलेल्या शत किंवा सहस्रनामावळ्याही प्रसिद्ध होत आहेत.

भारतीय संस्कृतीत नाद म्हणजे ध्वनी (नादब्रह्म), शब्द म्हणजे सार्थ उच्चार (शब्दब्रह्म) आणि भाषिक शुद्धते (वैखरी) ला अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आलेलं आहे. साहजिकच बाळाचं नाव हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचं अभिन्न अंग असतं, ज्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाला आभा अर्थात झळाळी प्राप्त होईल असंच सार्थक नाव निवडावं, असं धर्मशास्त्रकार सुचवतात. बाळाच्या नावांची यादी प्रसिद्ध करणारी पुस्तकं असोत की वेबसाईट्स त्यातली बहुतांश नावं व्याकरणदृष्ट्या चूक आणि अर्थ विपर्यास करणारी असतात, हे एक प्रमाणित सत्य आहे. त्यामुळे अशा याद्यांच्या आहारी न जाता संस्कृत विद्वान/विदुषीचं मार्गदर्शन घेऊन मगच बाळाचं नाव निश्चित करावं, असं नव्या पिढीच्या आईवडिलांना सुचवावंसं वाटतं.

नामकरण विधीत बाळाला एकूण चार नावं ठेवावीत, असं 'धर्मसिंधू' या ग्रंथात सांगण्यात आलेलं आहे. त्यातलं पहिलं नाव देवतासंबंधी नाम, दुसरं मासनाम, तिसरं नक्षत्रनाम आणि चौथं व्यवहारनाम. सर्वसाधारणपणे मातापित्याच्या किंवा कुटुंबाच्या आराध्य देवतेचं नाव आणि त्या पुढे भक्त किंवा दास यासारखं उपपद लावून ठेवलेलं नाव ते देवतासंबंधी नाव.

मासनाम म्हणजे ज्या सनातनी कालगणनेच्या ज्या महिन्यात बाळाचा जन्म झाला त्यानुसार ठेवलेलं नाव ते मास नाम. चैत्रापासून फाल्गुनापर्यंत अनुक्रमे ही नावं आहेत - वैकुंठ, जनार्दन, उपेंद्र, यज्ञ पुरुष, वासुदेव, हरी, योगीश पुंडरीकाक्ष, कृष्ण, अनंत, अच्युत आणि चक्री. त्यानंतर ज्या नक्षत्रावर जन्म झाला त्यानुसार ठेवलेलं नाव ते नक्षत्र नाम. हे नाव बाळाच्या आईवडिलांना माहीत असावं. कारण याच नावाचा उपयोग करून जारण-मारणासारखे वामाचारी तंत्रविद्येचे प्रयोग केले जातात. मौंजीबंधनाच्या वेळी हे नाव बालकाच्या कानात सांगावं, असं शास्त्रकार सांगतात. माता-पिता आणि गुरूला नमस्कार करताना याच नक्षत्रसंबंधी नामाचा मनातल्या मनात उल्लेख करावा.

चौथे नाव व्यवहारात वापरायचं असल्यामुळे ते कसं असावं, याचेही काही ठोकताळे देण्यात आलेले आहेत. त्यातले काही व्याकरणाशी संबद्ध आणि काहीसे क्लिष्ट आहेत. जिज्ञासूंनी 'धर्मसिंधू' हा ग्रंथ मुळातून वाचावा. त्यातले दोन नियम मात्र सुगम आहेत. ते असे - पुरुष नावं समसंख्येच्या अक्षरांची आणि स्त्री नावं विषम संख्येच्या अक्षरांची असावी. प्रतिष्ठेची इच्छा असेल तर दोन अक्षरी नाव ठेवावं आणि ब्रह्मतेजाची अपेक्षा असेल तर चार अक्षरी असावे. नावाच्या शेवटी रेफ किंवा लकार नसावा. पुरुषाच्या वर्णाप्रमाणे नावाच्या शेवटी पदान्त असावं - शर्म किंवा देव ब्राह्मणांसाठी, वर्म किंवा राज क्षत्रियांसाठी, गुप्त किंवा दत्त वैश्यांसाठी आणि दास शूद्रांसाठी अशी विभागणी करण्यात येते. नावावरून व्यवसायाची ओळख पटणे ही पद्धत अन्य देशांतही आढळते. उदाहरणार्थ 'स्मिथ' म्हणजे धातूचे काम करणारा - गोल्डस्मिथ, ब्लॅकस्मिथ इत्यादी.

नामकरण संस्कारांविषयी अधिक जाणून घेऊ या, पुढच्या भागात...

## काव्यनाद

### शहाणी आजी

थोडं काही शिका मित्र हो
शहाणी आहे माझी आजी
ग्राहकांची करते रोज सेवा
ताजी ताजी विकते भाजी...

स्टीलच्या कपात पिते चहा
स्वतःची पण करते काळजी
शहर ठेवते सहज स्वच्छ
अशी माझी शहाणी आजी

काय फायदा घेऊन डिग्री
डोळे तुमचे नाही उघडत
स्वतःच्या जिवाशी खेळता
आमंत्रण कॅन्सरला देता

तुमच्या बेताल वागण्याने
अर्धी शहरे झाली प्रदूषित
तुमच्या नावे बोंबलतील
श्वास घेतील जेव्हा दूषित

माझ्या एकट्याने काय होणार
करंटा करू नको विचार
स्वतःपासून कर सुरुवात
शहर स्वच्छ नक्की होणार

प्लॅस्टिक वरती खाऊ नको
मंत्र साधा हा ठेव ध्यानात
असू दे माया या वसुंधरेवर
शहाणी आजी जपून ठेव मनात

**बाबा देशपांडे**
९४२३६१३२२६



### फाटले आभाळ आता

येत होते जात होते,
ते कुणाला ज्ञात होते?
सोसले आघात ज्यांनी
तेच ते ध्यानात होते.


लाख केल्या वल्गना,
भास त्यांनी निर्मिले,
जे जसे आम्हास दिसले.
तेच प्रत्यक्षात होते.

लुटलेली मालमत्ता,
ठेविली ती दूरदेशी,
राहिली ना लाज त्यांना,
नागडे जोमात होते.

फास लावूनी गळ्याला,
सोडले रे प्राण त्यांनी,
वेदनेचे काय तुम्हा,
काय तुमचे जात होते?

मी आता आश्वस्त कैसा,
होऊ रे तूच सांगना,
फाटले आभाळ आता,
जे कधीचे शांत होते.

**डॉ. रमेश जलतारे**
९५६१५९५०९५



### संत क्षमाशील...

संत चरणाचा । स्पर्श झाला जेथे ।
सौख्य शांती तेथे । निरंतर ॥
संत क्षमाशील । संत उपकारी ।
सत्य सदाचारी । साधू संत ॥
तयांची संगत । तारेल जीवास ।
मिटेल हव्यास । संपत्तीचा ॥
संतांना वाचून । विचार रुजवू ।
विकार मिटवू । मनातील ॥
देवावरी सत्ता । संत महात्म्याचा ।
कल्याण जगाचा । त्यांच्यामुळे ॥
कोमल आतून । बाह्यतः कठोर ।
सर्वांहून थोर । संतजन ॥
नाही स्वार्थवृत्ती । नाही कावेबाज ।
संपूर्ण समाज । प्रिय त्यांना ॥
सदैव संतांचे । चरणी नमावे ।
त्यांचे गुण घ्यावे । थोडेतरी ॥
अजू म्हणे संत । सत्याचे पूजक ।
संकट नाशक । बोल त्यांचे ॥

**अजय रमेश चव्हाण**
८८९५८३६२०७

### लाघव



विकायचं होतं पण
राखून ठेवलं मी
दुःख भर्जरी माझं
झाकून ठेवलं मी!

श्रीराम भेटे शेवटी,
सांगून शबरी गेली;
दुःख म्हणून यार
चाखून ठेवलं मी!

झुंजलो खूप मी
या दुनियेशी पण
हृदय तुझ्यापुढे
वाकून ठेवलं मी!

जा सोडून पाखरा
दूरदेशी मला तू
वर्तुळात मला रे
आखून ठेवलं मी!

सरेल अंधार पण
दृष्टी नसेल तेव्हा
भविष्यच तसं हे
भाकून ठेवलं मी!

फुटेल बांध आणि
जाईल वाहून सारं
धरण जरी आज
रोखून ठेवलं मी!

कवितेच्या रूपानं
गजल दारी आली
लाघवच इतकं बघ
घोकून ठेवलं मी!

**पुंडलिक आंबटकर**
९८८१७१६०२७

### तू नसताना...

तू नसताना घरात,
आताशा कसेसेच होते...
सवय तुझ्या चाहुलीची,
मन आता काकुळते...
सैरभैर होते मन,
सूने सूने वाटते...
शोधताना डाळ तांदूळ,
भंबेरी माझी उडते...
खेकसू कोणावर,
तूच सांग ना सखे....
धडधडते हृदयात,
जेव्हा आजारी तू पडते...
दाखवत नसलो चेहऱ्यावर,
पण पंढरी माझी घाबरते...
जीव होतो कावराबावरा,
मन देवाकडे धावते...
अस्तित्व अर्धांगिनीचे,
जगण्याची संजीवनी असते...
कोणी काहीही म्हणो,
बायको ही प्रेमळच असते...
असेच झेलत राहू,
एकमेकांचे रुसवे फुगवे...
चाळीस वर्षांचे सहजीवन,
म्हणजे मुरलेले लोणचे...
चव त्याची जन्मभर,
जिभेवर घोळू दे....
संगीतमय होते घर,
जेव्हा बांगडी तुझी
किणकिणते...
घरातला वावर तुझा,
उदासीचे औषध असते...
तू नसताना घरी, कसेसेच वाटते...
वाटले आज अचानक लिहावेसे...

**शिरीष मुंजे**
९८२२९५६५६३



### रोज नवा श्वास..!

उजळल्या दिशा आता
निनादला सूर
देवळांच्या दारामध्ये
भावनांचा पूर!

रोज नवा श्वास आणि
पायवाट नवी,
गेल्या साऱ्या क्षणांतून
शिकवण नवी!

गेले जुने काही दूर
नको हुरहूर,
ठसे तेही पुसू या रे
व्यर्थचे काहूर!

पावलांच्या पुढे दिसे
भविष्याच्या वाटा,
वादळाला भिडू या की
उसळू द्या लाटा!

चला लिहू नवी गाथा
वर्ष आले नवे
आभाळाला भिडतील
पाखरांचे थवे!

**शशी त्रिभुवन**
७०६६७६५९२७

### असे कधी होईल का?

मनामनांतील द्वेष विसरून
एक सारे होतील का?
बंधुत्वाची शिकवण
साऱ्या तनामनात रुजेल का?
तुझ्यापेक्षा मी श्रेष्ठ,
भावना लयास जाईल का?
आपुलकीची प्रेमभावना
मनामनांत वाढेल का?
गरीब, श्रीमंत भेद,
जगात कधी विरेल का?
पोटापाण्यास किती लागते,
प्रत्येकास उमजेल का?
मार-काट, लूट, बलात्कार
कधी लयास जाईल का?
धर्म म्हणजे काय,
तनामनास कळेल का?
अंधारलेली रात्र संपून
सूर्य कधी उगवेल का?
प्रकाशाचे दिव्यकिरण,
जगास या उजळेल का?

**मोरेश्वर बेलसरे**
९८९०६६४६६१



तरुण भारत // आसमंत

www.tarunbharat.net

## लोकायन

**सुधीर पाठक**
८८८८३९७७२७

**महाराष्ट्रातल्या २९ महापालिका निवडणुकांमध्ये भाजपाने दणदणीत विजय मिळवून सर्वत्र नवीन समीकरणे स्थापन केली आहेत. मुंबई महापालिकेतून उबाठाची सत्ता संपुष्टात आली आहे. तसेच पिंपरी-चिंचवडमध्ये आणि पुण्यातदेखील अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला व त्यांनी हातमिळवणी केलेल्या शरद पवार गटाला जबर दणका बसला आहे.**

# महापालिका निवडणुकीत भाजपाची लाट

महाराष्ट्र राज्यातील २९ महापालिकेच्या निवडणुका पार पडल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे ३१ जानेवारीपूर्वी या निवडणुका व्हायलाच हव्या होत्या. १५ तारखेला मतदान आणि १६ तारखेला मतमोजणी झाली. आता २० तारखेपर्यंत सर्व महापालिकांत महापौर बसतील. त्या अर्थाने नव्याने आघाडी आणि युतीची फेर जुळवणी होईल. साधारणपणे मतमोजणी झाली की निकाल स्पष्ट होतो. कोणाचे बहुमत आहे आणि कोणाला विरोधात बसावे लागणार आहे, हेही स्पष्ट होते. या निवडणुकीनंतर मात्र पुन्हा एकदा एकत्र येणे आणि दूर जाणे याची नव्याने समीकरणे सिद्ध होत आहेत. एका अर्थाने बघायला गेले तर सत्ताधारी आणि विरोधक ही दोन्ही पदे आपल्याकडेच राहावीत, अशी व्यूहरचना करून ही महापालिका निवडणूक झाली. विरोधकही आपलेच राहतील याची काळजी घेतली गेली असे मानण्यात हरकत नसावी, असे बोलले जात आहे.

या महापालिका निवडणुकीत सर्वच राजकीय पक्ष रिंगणात उतरले होते. व्यापक दृष्टीने बघता महाराष्ट्रात युती आणि आघाडी असे दोन महत्त्वाचे घटक पक्ष आहेत, पण यावेळी महापालिका निवडणुकीत युतीमधील चारही पक्ष एकत्रपणे लढले आणि परस्पराविरोधात लढलेले कोण कोणासोबत आहेत, हे राजकीय अभ्यासकांनाही सांगता येत नव्हते तर बिचाऱ्या मतदारांना काय उमगणार? काही महापालिकेत भाजपा आणि शिवसेना एकत्र लढले तर काही ठिकाणी ते परस्पर विरोधात होते. राष्ट्रवादी कधी कुठे सेनेसोबत होता तर कुठे भाजपासमवेत, कुठे शरद पवार यांच्या पक्षाबरोबर त्यांनी युती केली होती. असेच काहीसे चित्र महाआघाडीचे होते. उद्धव ठाकरे आणि त्यांचे बंधू राज ठाकरे हे या निवडणुकीत एकत्र आले, हे या निवडणुकीचे वेगळेपण अधोरेखित करणारे आहे. वास्तविक या दोघांनी एकत्र येण्याचा निर्णय खूप आधी घेतला होता. आम्ही एकत्र आहोत ते सांगूनही टाकले होते. पण निवडणुका जिंकण्याच्या दृष्टीने काही महिने काहीच केले नाही.व ाया घालविले, तर इकडे मनसे उद्धव ठाकरेंबरोबर आलाय म्हणून काँग्रेस पक्षाने एकट्यानेच लढविण्याचे ठरविले. एकूणच काय तर निवडणुकीपूर्वी राजकीय पक्षांची जेवढी 'परम्युटेशन-कॉम्बिनेशन' होऊ शकते तेवढी झाली.

ते कमी होते म्हणून की काय, नगरपालिका नगरपरिषदेच्या निवडणुकांचा निकाल घोषित होताच भाजपा-काँग्रेस, भाजपा-एमआयएम असेही नगराध्यक्ष पदासाठी एकत्र आलेत. लागलीच भाजपाने असे कुठलेही एकत्र येणे मान्य होणार नाही, असा खुलासा केला. तसे एकत्र येण्याचा प्रयत्न हाणून पाडला.

या निवडणुकीचे दुसरे वैशिष्ट्य होते की, सदैव निवडणूक मोडमध्ये असणारे भाजपासारखे पक्ष विरुद्ध क्वचितच मतदारांसमोर जाण्यासाठी सिद्ध असणारे यातील ही लढाई होती. मनसेचे वैशिष्ट्य असे सांगता येईल की, सातत्य नसणारा असा हा पक्ष आहे. कधी पवार तर कधी फडणवीस असे करता करता तब्बल २० वर्षांनी ते उद्धव ठाकरे यांच्या समवेत आले. या दोन बंधूंच्या एकत्र येण्याने मनसेत नाराजी होतीच. खाजगीत मनसेचे नेते सांगत होते की, मुंबई महापालिकेत आमचे आठ नगरसेवक होते; निर्वाचित झालेले होते, पण त्यांना उबाठाने त्यावेळेला पळविले. सहा जण उबाठात गेले. आज मुंबईत आमचा एकही नगरसेवक नाही. दोघेही बंधू एकत्र आले खरे; पण कोण किती जागा लढविणार, याची गोष्ट जाणून घेण्यासाठी आम्हालाही प्रचंड वेळ लागला. हे दोघे एकत्र आल्याने काँग्रेस पक्ष वेगळा झाला. खरं म्हणजे काँग्रेस पक्ष आणि उबाठा एकत्र राहिले तर जागांचे गणित त्यांना अधिक अनुकूल राहिले असते. मनसे आणि उबाठा यांनी किती जागा मिळविल्या, हे १६ तारखेला स्पष्ट होणारच आहे. उबाठाची कार्यशैली वेगळी आहे. त्यांच्या नेत्याला जनतेत येणे रुचत नाही. ते मातोश्रीवरूनच सोंगट्या हलविण्यात धन्यता मानतात. आता एका अर्थाने ते जीवन-मरणाची लढाई लढत आहेत, पण विजयी होण्याची जिद्द त्या पक्षात जाणवत नव्हती.

त्यापेक्षा भाजपाची स्थिती फारच वेगळी आणि बळकट होती. प्रमोद महाजन यांच्या काळापासून भाजपात वॉररूम ही संकल्पना आली आहे. त्या ठिकाणी पूर्ण राज्यातील मतदारसंघाचा अभ्यास केला जातो. त्याची वर्गवारी अ ब क ड अशा चार वर्गात होते आणि त्यातूनच क आणि ड जागांसाठी अधिक मदत पुरविली जाते. यामुळे आणि सदैव निवडणुकीत सज्ज राहण्यातून भाजपा महाराष्ट्रात नंबर एकचा पक्ष ठरलेला आहे. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने सदैव जागृत असणारा, अभ्यासू, विविध कल्पना साकारणारा मुख्यमंत्री लाभला आहे. ते शर्थीने आणि जिद्दीने प्रचार करतात. नवनवीन कल्पना राबवितात. यावेळी त्यांनी शिवतीर्थावर झालेल्या सभेत 'लाव रे व्हिडीओ' ही राज ठाकरे यांची शैली वापरून त्यांची गोची केली. त्या सर्व प्रचारात सर्व सहकारी नेते यांनाही बरोबर घेतात. नागपुरात आपण पाहिले की देवेंद्रच्या सभा झाल्या तशा सभा नितीनजींच्याही झाल्यात. माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेही मागे राहिले नाहीत. त्यांनी सभा, रोड शो, बैठका, संपर्क याचा धडाका लावला होता तर शेवटच्या दिवशी मोटरसायकलवर देवेंद्र फडणीस यांची बाईक रॅली निघाली होती. नगरपरिषदेच्या निवडणुकात जे नुकसान झाले होते त्याच्या डॅमेज कंट्रोलचाही प्रयास झाला; पण त्याहीपेक्षा नको त्या विधानांनी महापालिका निवडणूक गाजली. त्या त्या गावाच्या निवडणुका त्या त्या वक्तव्याभोवती फिरत राहिल्यात. या सर्वात अडचणीचे आणणारे विधान लातूरमध्ये प्रदेश भाजपा अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले. खरं म्हणजे चव्हाण यांचे वक्तव्य काहीसे अनवधानाने झाले होते, पण अनवधानाने झाले तरी त्यांनी व्हायचे ते नुकसान मात्र नक्कीच झाले. महाराष्ट्राच्या राजकारणात कै. विलासराव देशमुख यांची एक वेगळी प्रतिमा आहे. अतिशय मृदू शब्द, वावरताना सर्वांना बरोबर घेत असणारे विलासराव हे खरे राजकारणी होते. त्यांनी राजकारणात राहतानाही आपला अन्य पक्षांसोबतचा स्नेह कायम ठेवला होता. विलासराव देशमुख आणि भाजपाचे गोपीनाथराव मुंडे यांचे मैत्र तर जगजाहीर होते. मुंडे यांचा रेणापूर हा मतदारसंघ लातूरला लागून होता. लातूरचा काही भाग रेणापूर मतदारसंघात येतो. गोपीनाथराव यांच्या विजयात विलासरावांचा हातभार नेहमीच असायचा. विधानसभेत सभागृहांमध्ये दोघेही परस्परांवर कठोर टीका करत; सभागृहाबाहेर आल्यावर मात्र कशी तुझी खिल्ली उडविली म्हणून एकमेकाची टिंगलही करत. विलासरावांनी लातूरला विकासाची एक दिशा दिली. विलासराव आता जगात नसले तरी त्यांच्या नावाने राजकारण लातूरमध्ये चालते. अशा गावात प्रदेशाध्यक्ष बोलून गेले- विलासरावांची स्मृती आम्ही मिटवून टाकू. हा एक सेल्फ गोल होता. पुढे त्यांनी आपले शब्द मागे घेतलेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनीही लागलीच खुलासा केला, पण तरी लातूरची निवडणूक याच वक्तव्याभोवती फिरत होती.

तसाच काहीसा भाग कृपाशंकर यांच्या वक्तव्यातून पसरविण्यात विरोधकांना यश आले. वास्तविक मुंबईला लागून असलेल्या मीरा-भाईंदरमध्ये कृपाशंकर यांना कोणीतरी विचारले- इथे उत्तर प्रदेशचा महापौर होऊ शकतो काय? कृपाशंकर उत्तरले- तेवढ्या संख्येत उत्तर भारतीय निवडून आले तर तसे होऊ शकते. पण लागलीच ते वक्तव्य मुंबईच्या संदर्भात वापरला गेले आणि तसे सर्वत्र पसरविले गेले. प्रत्यक्षात त्यावर आधारित प्रश्न एका मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांना विचारला गेला. त्यावेळी त्यांनी स्पष्ट केले की, हा सगळा संवाद मुंबईबाबत नाही तर मीरा-भाईंदरबाबत होता. कृपाशंकर उत्तर भारतीय असले, तरी छान मराठी बोलतात. मराठी येत असल्याचा त्यांना अभिमानही आहे. तसेच तामिळनाडूतील भाजपाचे एक नेते अण्णामलाई मुंबईला आले. मुंबईचे कौतुक करताना त्यांनी सांगितले की, हे शहर एक वैश्विक शहर आहे. लागलीच त्यातून अर्थ काढला गेला की, मुंबई वैश्विक आहे म्हणजे मराठी माणसांची नाही. त्याचाही खुलासा मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी केला. ते म्हणाले- एखादे शहर वैश्विक पातळीचे आहे, याचा अर्थ त्या शहराचा गौरव करणे असा होतो. ते शहर मराठी माणसाचे नाही असा मुळीच होत नाही. आयआयटी बॉम्बे आहे, यावरही हरकत घेतली गेली. आयआयटी मुंबई का नाही, असा प्रश्न विचारला गेला. त्यावरही फडणवीस म्हणाले- आपणही चेन्नईला जातो त्यावेळी प्रत्येक वेळी चेन्नईच म्हणतो असे नाही तर मद्रासही बोलून जातो. लहानपणापासून आपण चेन्नई शिकलो नाही, मद्रास शिकलो आहे. त्याचा हा परिणाम आहे.

मनसे म्हणजेच ठाकरे बंधूंनी ठाकरे ब्रँडचा आणि नंतर मराठीपणाचा प्रश्न या निवडणुकीत उभा केला. मराठीपणाची व्याख्या करताना राज ठाकरे म्हणून गेले की- मुंबईत जन्मला तोच खरा मुंबईकर. हे समीकरण अनेक मराठी भाषकांना दुखावून गेले. ठाकरे परिवारातील शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व त्यांचे पिताश्री प्रबोधनकार ठाकरे हे देखील मुंबई जन्मलेले नाहीत. उद्धव आणि राज यांचा जन्म मुंबईतील आहे, पण शिवसेना उबाठाला पाठिंबा देणारे सगळे शिवसैनिक या व्याख्येनुसार खरे मुंबईकर ठरत नाही. शिवसेनेतील अनेक जण हे कोकणातून मुंबईत आलेले आहेत. ते शिकायला आणि नोकरी-धंदा करायला उद्योगपाण्यासाठी मुंबईला आलेत आणि मुंबईकर झालेत. त्यांचा जन्म मुंबईतील नाही म्हणून त्यांना मुंबईकर न मानणे हा त्यांच्यावर अन्याय होईल. अनेक मराठी भाषक मुंबईत जन्मले नाहीत, पण मुंबई ही त्यांची कर्मभूमी आहे. ते मराठी भाषिक मानले जाऊ लागले. त्यांच्या मराठी अस्मितेला राज ठाकरे यांनी त्यांच्या नवीन व्याख्येने एक जबरदस्त तडाखा दिला.

देवेंद्र फडणवीस यांनी बरोबर थेट अनुत्तरित करणारा प्रश्न विचारला- शिवसेनेने किती मराठी माणसांना राज्यसभेत पाठविले आहे? एखाद्या नगरीचा उपमहापौर मराठी करणे वेगळे आणि राज्यसभा सदस्य त्यासाठी मराठी माणूस न देणे हे वेगळे. शिवसेनेने प्रारंभी तर एकही मराठी भाषक राज्यसभेत पाठविला नव्हता. महापालिकांची ही निवडणूक २२ व्या शतकातील होऊन भाजपा लढत होती. नवनवीन तंत्रे वापरत होती तर मुख्य प्रतिस्पर्धी असलेले उबाठा- मनसे- काँग्रेस वगैरे १९ व्या शतकातील शस्त्रांसह लढत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध वाहिन्यांना प्रदीर्घ मुलाखती दिल्यात. त्यांच्या विविध कार्यक्रमांत हजेरी लावून पक्षाची भूमिकाही मांडली. याशिवाय तर्री-पोहे विथ देवेंद्र, चना-पोहा विथ नितीनजी हा देखील प्रयोग झाला. अनेक शहरातून तो राबविला गेला. सामाजिक जीवनात कार्यरत असणारा व समाजभान असणारा अभिनेता तसेच सामाजिक चळवळीत वावरणाऱ्या मराठी अभिनेत्री अशा जोडीने देवेंद्र आणि नितीनजी तसेच बावनकुळे यांच्याही मुलाखती घेतल्या. त्यात स्पृहा जोशी, भारत गणेशपुरे, तेजश्री प्रधान, गिरिजा ओक- गोडबोले, प्रसाद ओक, अमृता खानविलकर यांचा समावेश होता. या मुलाखती घेताना त्यात स्थानिक एखाद्या साहित्यिक-सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांचाही समावेश झाला असता तर त्याला स्थानिक अस्मितेचाही गोड रंग लाभला असता. विरोधकांना असा संवाद साधता आला नाही.

काँग्रेस पक्षाला तर संघ-भाजपा यांना शिव्याशाप देण्यावाचून काही सुचत नाही. पूर्वी जे महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष होते ते नाना पटोले यात आघाडीवर होते. वर्तमान अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे जरा वेगळ्या वळणाचे आहेत. त्यांना सौजन्य माहीत असेल असे वाटत होते. पण अध्यक्ष झाल्यापासून त्यांनी आपला पूर्वधर्म त्यागून नवीनच आक्रस्ताळी शैली अंगीकारली आहे. त्यातून त्यांची प्रतिमा, पक्षांची प्रतिमा उजळून निघेल असे नाही. उलट त्यांच्याजवळ संघ-भाजपाला शिव्याशाप देण्याखेरीज नवीन काहीही सांगण्यासारखे नाही, असे जनमानसात ठसले. यातून काँग्रेसचा फायदा झालेला दिसत नाही.


या निवडणुकीने खूप गमती-जमती केल्या. अमरावतीत नवनीत राणा या भाजपाबरोबर होत्या तर त्यांचे पती रवी राणा हे त्यांच्या संघटनेबरोबर होते. नागपूरला माजी महापौर अर्चना डेहनकर या भाजपा सांभाळत होत्या. आपले पती विनायकराव डेहनकर यांनी उमेदवारी अर्ज भरू नये म्हणून त्या माहेरीही निघून गेल्या होत्या. विनायकराव डेहनकर यांनी अपक्ष म्हणून फॉर्म भरला आणि त्यांच्यावर पक्षाने सहा वर्षासाठी पक्षातून काढून टाकण्याची कारवाई केली. भाजपाने जवळजवळ २२-२३ जणांवर अशी कारवाई करून त्यांना पक्षातून सहा वर्षांसाठी बाहेर काढले. त्याचवेळी भाजपा-सेनेचे ४० च्या जवळपास नगरसेवक अविरोध निवडून आले. त्यालाही न्यायालयात आव्हान देण्यात आले. फक्त भाजपाचे नगरसेवक अविरोध झाले असे नाही तर अन्यही अविरोध आलेत; या सगळ्यांना न्यायालयात आव्हान देण्यात आले. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे जेव्हा दिल्लीला संरक्षण मंत्री म्हणून गेले होते, त्यावेळेला नाशिक लोकसभेतून त्यांची अविरोध निवड झाली होती. आज केंद्रीय मंत्री असलेले नितीन गडकरी देखील नागपूर पदवीधर मतदारसंघातून एक वेळा विधान परिषदेवर पोहोचले होते. उबाठाचे नेते आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेही परिषदेवर विरोध निर्वाचित झालेले आहेत. प्रत्येक वेळी अविरोध निर्वाचित होताना साम-दाम-दंड-भेद याचा वापर होतोच असे नाही, पण या संदर्भात प्रकरण न्यायालयात गेले हे चांगले झाले. या संदर्भातील याचिका न्यायालयाने फेटाळून लावली. यामुळे भविष्यात अविरोधवर होणारी टीका तरी थांबेल. अविरोध निर्वाचित झालेल्यांना 'नोटा'शी झुंज द्यावी लागेल, असे आज तरी म्हणता येत नाही.

आपल्या पराभवासाठी कारणांचा शोध घेणे हे प्रचार सुरू असतानाच सुरू झाले होते. राज ठाकरे यांनी आपल्या शैलीत एक पुडी सोडून दिली. युतीचा उमेदवार उभा झाला की त्याच्यासाठी अडीच हजार मते ईव्हीएममध्ये टाकलेली असतात. त्यांनी दाखला दिला की, पिंपरी चिंचवडमध्ये बोलताना अजितदादांनी आपल्या कार्यकर्त्यांना तसेच सांगितले. पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडण्याची ही एक खेळी आहे. मुळात ते वाक्य होते जेव्हा तुम्ही पक्षाच्या अधिकृत चिन्ह घेऊन लढता तेव्हा काही मताची बेगमी आधीच झालेली असते. अपक्षाला मात्र शून्यापासून सुरुवात करावी लागते. याचा अर्थ असा कधीही होत नाही की, पक्षाच्या उमेदवाराला तेवढी मते त्याच्या मतपेटीत कोणी आणून टाकलेली असतात किंवा ईव्हीएमवर तेवढी मते दाबलेली असतात. या निवडणुकीत मुंबई वगळता सर्व महापालिकेत प्रभाग पद्धती आहे. त्यामुळे एकेका मतदाराला चार चार मते टाकावी लागतात. चारदा ईव्हीएमची कळ दाबली नाही तर मतच नोंदविले जात नाही. त्यामुळे अवैध मतांची संख्या ही वाढलेली दिसून येऊ शकते.

हा मजकूर आपण वाचत असणार त्या वेळेला निकाल घोषित झालेले असतील आणि नव्याने युती आघाडी आणि एकत्र येण्याचे किंवा काही ठिकाणी विलग होण्याचे खेळ सुरू झाले असतील. एक नक्की आहे की, १८, १९, २० या तीन दिवसातच या संदर्भाचा निकाल लागणार आहे आणि त्यातूनच आपला महापौर कोण, हे त्या त्या महापालिकांना समजणार आहे. आता पुढचे लक्ष्य जि. प. व पंचायत समिती निवडणूक हेच आहे. या निवडणुका १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समितीमधील निवडणुकांचे मतदान ५ फेब्रुवारी तर मतमोजणी ७ फेब्रुवारीला होईल. १६ जानेवारीपासून निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे.

## दुर्ग जिज्ञासा

**प्राची श्रीकांत पालकर**
९८२३०४९१९८



# वारुगड



महाराष्ट्रातील सातारा जिल्हा, अप्रतिम निसर्ग सौंदर्याने नटलेला, ऐतिहासिक महत्त्व असलेला आणि समृद्ध संस्कृतीने परिपूर्ण असा परिसर आहे. या परिसरातील वारुगड हा गिरिदुर्ग सुमारे ३००० फूट उंचीचा असून सातारा जिल्ह्यातील फलटणजवळ वसला आहे. माणगंगा आणि बाणगंगा नदी जिथे उगम पावते, त्या सीताबाईच्या डोंगरात हा किल्ला आहे. वारुगडावर जायचे असल्यास प्रथम फलटण गाठावे. तेथून गडावर जाण्यास अनेक मार्ग आहेत. फलटण ते गिरवी एसटी सेवा आहे. तेथून पाच कि. मी. अंतरावर जाधववाडा हे वारुगडाच्या पायथ्याचे गाव आहे. गावातून वारुगडाच्या माचीवर जाण्यास अंदाजे दोन तास लागतात. वारुगड माची आणि बालेकिल्ला अशा दोन भागात विभागला गेला आहे. गडाच्या माचीवर घोडेवाडी नावाची वस्ती आहे. माचीवरून बालेकिल्ल्यात जायला साधारण अर्धा तास लागतो. जाधववाडा मार्गाने वारुगडावर जाता येते तसेच घोडेवाडीतूनदेखील गडावर जायला रस्ता आहे. या मार्गाने जायचे असल्यास फलटण-दहिवडी रस्त्यावरील मोंगळ फाटा गाठावा. या फाट्यावरून एक रस्ता गडाच्या माचीवरील घोडेवाडीत घेऊन जातो. मोंगळ ते घोडेवाडी हे साधारण १५ कि. मी. चे अंतर आहे. फलटण-दहिवडी रस्त्यावर बीजवाडी नावाचे गाव आहे. या गावातूनही गडाच्या माचीवरील वस्तीत म्हणजे घोडेवाडीत जाता येतं. गड चढायला सोपा असून स्वतःचे वाहन थेट घोडेवाडीत गेल्यावर वेळ आणि श्रम दोन्हीही वाचतात.

वारुगडाच्या माचीवर गेल्यावर गडाचा अफाट विस्तार दिसतो. किल्ल्याची माची संपूर्ण तटबंदीने वेढलेली आहे. अजूनही बांधकाम बरेच चांगल्या परिस्थितीत आहे. पूर्वी माचीत प्रवेशासाठी पाच दरवाजे होते, पण आता जाधववाडी मार्गाने येणारा एक दरवाजा आणि घोडेवाडी मार्गाने येणारा एक दरवाजा असे दोन दरवाजे शाबूत आहेत. माचीवर वाड्यांचे अवशेष दृष्टीस पडतात. त्यावरून गडावरचा त्याकाळी असलेला राबताही लक्षात येतो. माचीवर पाण्याच्या सोयीसाठी तलाव आणि टाकी बांधलेली आहेत. भैरोबाचे जीर्णोद्धार केलेले मंदिर माचीवर असून तेथे दर्शन घेऊन विश्रांती घेता येते. मंदिर प्रशस्त आहे त्यामुळे अडचणीच्या वेळी येथील धर्मशाळेत राहण्याची सोय होऊ शकते. संपूर्ण माचीला फेरफटका मारण्यास दोन तास लागतात इतका माचीचा घेरा आहे. माचीवरून पुढे १५ मिनिटे चढत आपला बालेकिल्ल्यात प्रवेश होतो. बालेकिल्ल्याच्या दरवाजा आणि तटबंदी बुलंद आहे. आत प्रवेश करताच समोर सदरेची इमारत आहे. येथेही पाण्याचे टाके आणि विहीर आहे. बालेकिल्ल्यातून समोरचा परिसर पाहिला की लक्षात येते की, हा किल्ला अगदी मोक्याच्या ठिकाणी वसलेला आहे. समोर सीताबाईचा डोंगर तसेच महादेव डोंगररांग दिसते. वारुगडाच्या माथ्यावर भन्नाट वाऱ्याचे सुख अनुभवता येते. येथील वाऱ्याचा उपयोग करून घेण्यासाठी या परिसरात अनेक पवनचक्क्या उभारल्या आहेत. वातावरण ढगाळ नसेल तर येथून पुरंदर आणि वज्रगड दृष्टीस पडतात.

शिवाजी महाराजांनी या किल्ल्याचे मोक्याचे स्थान ओळखले आणि किल्ला बांधून घेतला. विजापूरहून होणाऱ्या हल्ल्यांना पायबंद घालण्यासाठी हा किल्ला महत्त्वाचा होता. या किल्ल्याचे किल्लेदार परभू होते. सह्याद्रीच्या पर्वतरांगेतील प्रत्येक जागेचा महाराजांना नीट अभ्यास होता. त्यांनी अत्यंत बारकाईने विचार करून स्वराज्यातील गडकोट मजबूत बांधून घेतले. स्वराज्य स्थापनेच्या काळात तसेच स्वराज्य राखताना याच किल्ल्यांचा उपयोग शत्रूला नामोहरण करण्यासाठी झाला. या दुर्गांची खंबीर साथ होती म्हणून महाराष्ट्रात इतकी मोठी स्वराज्य क्रांती घडून आली. छत्रपती संभाजी महाराजांच्या काळातदेखील वारुगड स्वराज्यात होता; मात्र पुढे औरंगजेबाने हा किल्ला आपल्या ताब्यात घेतला. पेशवाईच्या नंतर इतर किल्ल्याप्रमाणे हाही किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला.

वारुगडाला भेट देताना तुमच्याकडे अधिकचा दिवस असेल तर भैरोबाच्या मंदिराच्या बाहेरील धर्मशाळेत मुक्काम करता येतो. मात्र, मुक्काम करायचा असल्यास अमावास्या टाळून कार्यक्रम आखावा. कारण अमावास्येच्या दिवशी संपूर्ण पंचक्रोशीतील लोक मंदिरात येतात. त्या दिवशी मंदिरात भंडारा असतो आणि रात्रभर भजन चालते, त्यामुळे त्या दिवशी धर्मशाळेत जागा नसते. मुक्काम केल्यास दुसऱ्या दिवशी जवळच असलेल्या शिखर शिंगणापूरचे मंदिरात जाता येईल. मंदिराचे भव्य प्रवेशद्वार, या परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांनी बांधलेला तलाव, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती राजाराम महाराज यांचे समाधी मंदिर नक्की पाहून घ्यावे. वारुगडापासून साधारण २५ किलोमीटर अंतरावर असलेला महिमानगड हा किल्लादेखील पाहता येतो. सीताबाईच्या डोंगरावरील सीतेच्या मंदिरात दर्शनास जाता येईल.

फलटण आणि माण तालुक्याच्या सीमेवर असलेल्या सीताबाईच्या डोंगरावर सीतेच्या मंदिरात मकरसंक्रांतीचा सण उत्साहात साजरा करतात. या मंदिरात मोठ्या प्रमाणात महिला संक्रांतीच्या दिवशी सीतामाईला सौभाग्याचे वाण देण्यासाठी येतात. येथील लोकांची अशी मान्यता आहे की, गर्भारपणात सीतेचे या डोंगरावर वास्तव्य होते. त्यावेळी सीतेची तहान क्षमवण्यासाठी लक्ष्मणाने डोंगरावर बाण मारून पाणी काढले, तेव्हाच बाणगंगा आणि माणगंगा नद्यांचा उगम झाला. माणगंगा नदी माण तालुक्यातून तर बाणगंगा नदी फलटण तालुक्यातून वाहते. येथे चैत्र वद्य सप्तमीला लव-कुश जन्मोत्सव साजरा करतात तसेच ज्येष्ठ आणि आषाढ अमावास्या, नारळी पौर्णिमा, मकरसंक्रांत या दिवशीही उत्सव साजरा करतात. येथे मार्गशीर्ष वद्य द्वितीयेला सत्पुरुष बालब्रह्मचारी महाराज सारंगदास गुरू हरिनामदास महाराज यांची पुण्यतिथी साजरी केली जाते. सत्यनारायण पूजा आणि अन्नदान परंपरा अखंडित चालावी यासाठी १२ गाव मिळून १२ महिन्यांच्या पूजा ठरवून घेतल्या जातात. ग्रामीण भागातील लोकांनी या परंपरा पूर्वापार जपल्या त्यामुळे येथील वातावरणात अनामिक शांतता आणि प्रसन्नता जाणवते.

ट्रेकिंगची आवड असेल तर एका गडावरून दुसऱ्या गडावर जाणे किंवा सलग काही दिवस आसपासच्या परिसराची भटकंती करणे असे कार्यक्रम आखले जातात. संतोषगड ते वारुगड या मार्गावर ट्रेकिंग अनेक लोक करतात. सह्याद्रीतील या वाटा चालणे हे ट्रेकर्सचे आवडते काम आहे. संतोषगड ते वारुगड ही वाट सीताबाईच्या डोंगरातून येते. ट्रेकिंगची आवड असणाऱ्यांना ही वाट नक्कीच आवडेल. मात्र, या डोंगररांगात फिरताना स्थानिक वाटाड्या जरूर सोबतीला असावा. गडावर खाण्याची काहीही सोय नसून ती आपली आपणच करावी. गडावर बारमाही पाण्याची टाकी आहेत, पण पुरेसे पिण्याचे पाणी सोबत असल्यास सोयीचे होते. गडकिल्ले फिरताना सोबत असलेल्या पाण्याचा नियोजनपूर्वक वापर अत्यंत आवश्यक आहे. ट्रेकिंग करताना सोबत असलेले पाणी कधीच पूर्ण संपवू नये. निवासाच्या ठिकाणी पोहोचेपर्यंत पाणी पुरवावे, असा नियम आहे. ट्रेकिंगचे काही लिखित आणि काही अलिखित नियम आहेत. आपल्याला सुरक्षित तसेच सुखकारक भटकंती करायची असल्यास नियम अवश्य पाळावे. वारुगड किल्ला शिवकालीन इतिहासाचा साक्षीदार आहेच आणि या परिसराला निसर्गाचे वरदान लाभले आहे. भटकंतीची आवड असल्यास सातारा-फलटण परिसरातील वारुगडावर नक्की जाऊन या तसेच जास्तीचा वेळ असल्यास आसपासच्या निसर्गरम्य परिसराच्या भटकंतीचाही आनंद घेता येईल.

## मुक्तचित्र

**डॉ. संतोष पाठारे**
९८२०३७४०९३

नुकत्याच पार पडलेल्या आशियाई चित्रपट महोत्सवात भारतातील विविध राज्यांतील, वेगवेगळ्या बोलीभाषांमधील चित्रपट पाहताना पुण्याच्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे माजी संचालक पी. के. नायर यांचे 'Indian cinema is a complex phenomenon' हे विधान वारंवार आठवत होते. भारतीय सिनेमा नेमका कसा आहे? व्यावसायिक हिंदी सिनेमापेक्षा त्याचा आशय कशा प्रकारे वेगळा आहे? आणि या सिनेमावर कोणकोणते घटक प्रभाव टाकतात? या प्रश्नांचा विचार केला असता, नायर यांनी उल्लेख केलेली गुंतागुंत अधिक स्पष्टपणे समजते.

भारतीय सिनेमाची सुरुवात 'राजा हरिश्चंद्र' या पौराणिक कथेपासून झाली. तत्कालीन समाजाच्या मनोरंजनाची संकल्पना यामागे होती. पौराणिक नाटके आणि आख्याने पाहून सवयीचा झालेला सामान्य प्रेक्षक अशाच स्वरूपाच्या मनोरंजनाची अपेक्षा करणार, याची जाणीव दादासाहेब फाळकेंना होती. कलात्मक दृष्टीसोबतच व्यावहारिक शहाणपण असलेल्या फाळकेंनी प्रेक्षकांची मानसिकता अचूक ओळखून चित्रपट निर्मिती केली. आजही व्यावसायिक चित्रपटसृष्टी 'मागणी तसा पुरवठा' या तत्त्वावर चालताना दिसते.




प्रेक्षकांना जे आवडते तेच आम्ही दाखवतो, असे म्हणणारे निर्माते-दिग्दर्शक आजही मोठ्या संख्येने आहेत. त्यामुळे भारतीय चित्रपटाच्या इतिहासाचा अभ्यास करताना प्रेक्षक हा घटक दुर्लक्षित करता येत नाही. काळानुसार प्रेक्षकांची अभिरुची बदलत गेली आणि त्याचा थेट परिणाम चित्रपटांच्या आशयावर झाला.

स्वातंत्र्यपूर्व काळात गांधीजी व आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांच्या विचारांचा प्रभाव असलेले चित्रपट तयार झाले. 'अछूत कन्या', 'शेजारी' यांसारखी चित्रपटांची शीर्षकेच त्यांचा सामाजिक आशय स्पष्ट करतात. ४० च्या दशकात स्टुडिओ पद्धतीचा प्रभाव कमी होऊ लागला. दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या काळ्या पैशामुळे इतर व्यवसायांतील अनेक लोक चित्रपट निर्मितीकडे वळले. त्यांचा मुख्य हेतू नफा मिळवणे हाच होता. परिणामी, स्टुडिओ काळातील कलात्मक निष्ठेपेक्षा गीत-संगीत आणि भावनिक नाट्याला अधिक महत्त्व दिले जाऊ लागले.

हिंदी चित्रपटसृष्टीची एक ठरावीक चौकट तयार होत असताना प्रादेशिक चित्रपट आपली स्वतंत्र शैली शोधत होते. मराठीत याच काळात कुटुंबप्रधान आणि ग्रामीण पृष्ठभूमीवर आधारित तमाशापट निर्माण झाले. दक्षिण भारतात मात्र प्रेक्षकांचे पूर्ण मनोरंजन करणारे चित्रपट मोठ्या प्रमाणात तयार झाले. १९४० ते १९५० या काळात २४१ तमिळ चित्रपट तयार झाले. मराठी चित्रपटांची संख्या केवळ ९७ होती. यावरून दक्षिण भारतात सिनेमाने किती लवकर भक्कम स्थान मिळविले, हे लक्षात येते.

दक्षिण भारतात मातृभाषेतून चित्रपट निर्माण करण्याची आणि प्रेक्षकांनी त्याला प्राधान्य देण्याची परंपरा सुरुवातीपासूनच निर्माण झाली. विशेष म्हणजे दक्षिणेत सुपरहिट ठरलेला पहिला हिंदी चित्रपट राज कपूर यांचा 'बॉबी' होता. "Make your hobby to see Bobby" अशी पोस्टर्स तेव्हा तामिळनाडूमध्ये झळकत होती. प्रादेशिक चित्रपटांना मिळणारा प्रचंड प्रेक्षक पाठिंबा हेच त्यांच्या यशाचे मुख्य कारण ठरले. कौटुंबिक कथा, भडक मांडणी आणि लोकप्रिय राजकीय नेत्यांचा सिनेमातील सहभाग ही दक्षिण भारतीय सिनेमाची वैशिष्ट्ये राहिली.

महाराष्ट्रात मात्र हिंदी चित्रपटसृष्टीने मुंबईत आपले बस्तान बसवल्यामुळे मराठी सिनेमाला दुय्यम स्थान मिळाले. पुणे-कोल्हापूर भागातील मराठी सिनेमा ग्रामीण स्वरूपाचा राहिला, तर विदर्भात निर्मिती आणि वितरण या दोन्हींचा अभाव दिसून आला. परिणामी तिथला प्रेक्षक मराठी सिनेमापासून दूर राहिला.

स्वातंत्र्यानंतर नेहरूंनी पाहिलेल्या आधुनिक भारताच्या स्वप्नांना पूरक असे चित्रपट निर्माण झाले. 'हम हिंदुस्तानी', 'मेरा जूता है जापानी' यांसारख्या गीतांतून राष्ट्रप्रेमाची रोमँटिक भावना व्यक्त झाली. मात्र, वास्तवापेक्षा पलायनवाद हा त्या काळातील सिनेमांचा स्थायीभाव ठरला. आज हे चित्रपट प्रामुख्याने त्यांच्या मधुर संगीतामुळेच लक्षात राहतात; त्यांच्या आशयावर फारशी चर्चा होत नाही.

हिंदी सिनेमाने संपूर्ण देशातील प्रेक्षकांचा विचार केल्यामुळे त्यातील प्रादेशिक ओळख हळूहळू नष्ट झाली. ठरावीक गावांची नावे, सर्वसाधारण नायक-नायिकांची नावे आणि साचेबद्ध पोशाख यामुळे सुलभीकरण झाले. दक्षिणेकडील कलाकारांचा हिंदी सिनेमापासून दूर राहण्याचा आग्रह, काहींना आलेले अपयश, मराठी कलाकारांना मिळालेल्या दुय्यम भूमिका आणि पंजाबी संस्कृतीतून आलेल्या दिग्दर्शकांचे वर्चस्व यामुळे हिंदी सिनेमातील प्रादेशिकतेचा अभाव अधिक वाढला. समांतर चळवळीतील 'अंकुर', 'मिर्च मसाला' यांसारख्या चित्रपटांनी मात्र काही प्रमाणात ही ओळख पुन्हा मिळवून दिली.

प्रादेशिक चित्रपट मर्यादित प्रेक्षकांपर्यंत पोहोचत असल्याने कमी भांडवलात निर्मिती करावी लागली. त्यामुळेच भव्य, अवास्तव मनोरंजनापेक्षा स्थानिक मातीतील, सामान्य माणसांच्या कथा सांगणारे चित्रपट प्रादेशिक सिनेमात सातत्याने निर्माण होत राहिले. १९५२ साली झालेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाने अनेक भारतीय चित्रपटकारांना आशयप्रधान सिनेमा निर्माण करण्याची प्रेरणा दिली. मात्र त्याचा प्रभाव त्या काळातील मराठी सिनेमावर फारसा दिसत नाही. व्ही. शांताराम यांसारख्या दिग्गजांनी सुरुवातीला मराठीत महत्त्वाचे चित्रपट दिले; नंतर हिंदीकडे मोर्चा वळवला. १९७० नंतरच्या समांतर चळवळीने केवळ हिंदी सिनेमालाच नाही, तर प्रादेशिक सिनेमालाही स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची दिशा दिली.

गेल्या काही वर्षात हिंदीप्रमाणेच प्रादेशिक चित्रपटांत समांतर आणि व्यावसायिक यातील सीमारेषा पुसत झाल्याचे लक्षात येत आहे. चित्रपट केवळ पैसा कमावण्यासाठी करायचा नाही, पण त्यातून फक्त आपलीच कलात्मक भूक भागवायची नाही, याचं भान या तरुण चित्रपट दिग्दर्शकांना आहे, याची जाणीव त्यांच्याशी चर्चा करताना आली. महाराष्ट्रात सरकारतर्फे ज्याप्रमाणे चित्रपट निर्मितीला आणि चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर प्रोत्साहनपर योजना आहेत, त्या योजनांचा अभाव इतर काही राज्यांमध्ये आहे. तरीही ही मंडळी प्रयोगशील चित्रपट निर्माण करीत आहेत. त्यांच्या या प्रयत्नांना पाठबळ देण्यासाठी, प्रेक्षकांसमोर आणण्यासाठी महाराष्ट्रात आयोजित केले जाणारे आशियाई , पिफ्फ, अजंता एलोरा हे चित्रपट महोत्सव मोलाची कामगिरी बजावत आहेत. या महोत्सवात दाखल झालेल्या काही दर्जेदार प्रादेशिक चित्रपटांचे रसग्रहण पुढील लेखात करू.

*(लेखक प्रसिद्ध चित्रपट समीक्षक आहेत.)*